REGISTERD NO 7, 1874.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ | अकोला, रविवार ता० ५ माहे जुल सन १८७४ इ० | अंक २७

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

रु.
वर्षाचे अगाऊ ५
साहअखेर ७
फुटकळ अंकास ०४
डाकहशील.
वर्षाचे अगाऊ १०८
,,अखेर १

### नोटिसीबद्दल.

मराठी, दर ओळीस ०१०६
तीच नोटिस दुसरे खेपेस ०१
इंग्लिश लिपींत दर ओळीस ०४
,,दुसरे खेपेस ०२

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचे असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणे पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

### लेखक पाहिजेत.

शिळाप्रेसाचे कामाकारितां दोन लेखकांची जरूर आहे. ज्यांचीं मोडी व बाळबोध अक्षरें चांगलीं असतील आणि ज्यानां प्रेसासंबंधी माहिती चांगली असेल त्यांनीं आह्मांकडे अर्ज करावे पगार १२ रुपये पासून २० रुपये पावेतो लायकी पाहून मिळेल. कळावे तारीख २० माहे जून सन १८७४ इसवी

खंडेराव बाळाजी फडके
व० स०चे मालक

### जाहिरनामा,

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं कोणतेही गावीं पत्रें वाटणारा शिपायी पत्रें वाटण्यास आला ह्मणजे आपण आपलीं बाहेर गावीं रवाना करण्याचीं पत्रें असतील तीं सदरहू शिपायाच्या गळ्यांत असलेले पेटींत टाकित जावींत. त्या पेटीस पोष्टमास्तरचें कुलफ लागलेलें असतें यामुळें सदरहू शिपायी त्या पत्रांची अफरातफर करूं शकणार नाहीं. सदरहू शिपाया जवळ पत्रास लावण्याचीं टिकिटें विक्रीकरितां असतात, गरज लागल्यास विकत घेत जावीं.

आपणाकडे नाटपेड पत्रें येतील त्याबद्दल हाशील त्या पत्रावर लिहिल्या प्रमाणें किंवा पत्रें वाटणाराजवळ असलेल्या बुकांत लिहिल्याप्रमाणें देत जावें. त्यापेक्षां ज्यास्ती देऊ नये. त्यानें ज्यास्ती घेतल्यास त्याबद्दल आह्मांकडेस पत्राचे पाकिटासह फिर्याद केली असतां त्याबद्दल आह्मी योग्य तजवीज करूं.

फार उशीरानें व हयगयीनें शिपायी आपले गावीं पत्रें घेऊन येतो असा बोभाटा कोणाचा असेल तर त्यांनीं तशा पत्राचे पाकिटसह आम्हाकडे लिहावें. म्हणजे त्याचा बंदोबस्त होईल. सर्वांस कळावें तारीख १ माहे जुलै सन् १८७४

GOPAL NARAYEN
पोस्टाकडील सबइन्स्पेक्टर
पश्चिम वऱ्हाड

## नोटिसा.

नोटिस— राघु वल्लद लक्ष्मण खडके वस्ती तुलंगे बुजरूख तालुके बाळापूर जिल्हे अकोले. यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तू मजला रुपये २०० देण्याचे कबूल करून मजजवळून सर्वे नंबर दोन ९२।९३, बैल जोडी १, व हैस १ असे खरीदखतात लिहून देऊन दस्तैवज रजिष्टर करून घेतला व रुपये आजपर्यंत दिले नाहींत. खरीदखत लिहून घेतल्यास सुमारे दोन महिने झाले. दररोज मी रुपये मौजे मजकूरचे पाटील व पांडे यांचे समक्ष मागत असतां टेक दिलाऊ करितोस व तू माझा सख्खा वडील भाऊ आहेस सबब ज्यास्त मजला बोलतां येत नाहीं व तुझे कपट ही मजला समजले नाहीं. आतां उघड रीतीनें कपट दसून आले सबब नोटिशीने कळवितें कीं खरीदखतात लिहिल्या प्रमाणे सर्व शेते वगैरे माझ्याच ताब्यांत आहेत मात्र कागद तुजजवळ आहे त्यावरून आतां शेतावर वगैरे तुझी मालकी अगदीं नाहीं. तुजकडून जेव्हां आजपर्यंत रुपये खरीदखताप्रमाणे पोहोंचले तेव्हा सदरहू शेते वगैरे मी दुसऱ्यास देऊन रुपये लवकर घेतले आहेत तू आतां माझ्या शेतात येशील अगर तंटा करशील तर ते सर्व खोटे आहे. मी मजकडून पाहिजे त्यास पेरणीस अगर पाहिजे ते करण्यांस शेतांत मनुष्य पाठवीन तर तू हरकत न करावी जर हरकत करशील तर विनाकारण फौजदारी मुकदम्यास पात्र होशील. शिवाय मी बायकोची जात समजून तू कपटाने खरीदखत करून घेतलेस त्यावर गाववाल्याची साक्ष वगैरे नसून पर गावचे साक्षी आहेत व लिहिण्याचाही प्रकार मजला अगदीं समजला नाहीं. असो. तुमचे असलेले खरीदखत अगदीं खोटें आहे व त्या प्रमाणें आतां मी अगदीं कोणतीही गोष्ट कबूल करीत नाहीं हे खात्रीनें समजावे मी आज दोन महिने झाले निकेसारखे रुपये मागितले असतां तू दिले नाहींस सबब ही नोटिस देऊन तुजला कळविले आहे. कळावे तारीख २६ माहे जून सन १८७४ इसवी.

(सही) सावित्रीबाई मर्द संभुजी रहाड वस्ती मौजे तुलंगे तालुके बाळापूर जिल्हे अकोले.
निशाणी खुद

नोटिस—राजश्री त्रिंबकराव हणमंतराव देशमुख रहाणार कसबे हिवरखेड तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमचेकडे संवत १९३० चीं खालेबाकी साल मंदीबद्दल व त्याचे व्याजासुद्धां रुपये ३००० मागत असतां करार करिता परंतु रुपये देत नाहीं. यास्तव ही नोटिस देण्यांत येते कीं, आज तारखे पासून एक महिन्याचे आंत सदरहू रुपयांचा फडशा करून द्यावा. न केल्यास शिरस्त्याप्रमाणें फिर्याद करून नोटिशीचा व कोर्टाच्या खर्चासुद्धां सर्व रुपये भरून घेण्यांत येतील कळावे. तारि ३० माहे जून सन १८७४ इसवी.

(सही) मगनीराम तनसुकदास साहू दुकान तेल्हारे वहिवाटदार शिवलाल मुरलीधर

नोटिस —सोनाजी वल्लद रामाजी हायसने राहणार मौजे गावंडगाव तालुके दर्यापूर जिल्हा इलीचपूर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी तारीख २४ माहे मे सन १८७४ इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्राचे अंकात मजला नोटिस दिली त्याचे उत्तर खालीं लिहिलेप्रमाणे — तुह्माला दोष आहे व यावरून पंक्तीव्यवहार नाहीं असे तुमचे गावांतील सखाराम ठाकरे हा मौजे आबो येथे येऊन साधो शिरसकार, मंगाजी शिरसकार, व मठाजी शिरसकार यांचे जवळ बोलला कीं, सोनाजी हायसणे आमचे गावांतील हा कमी जातीचा आहे. सबब झालेली सोयरीक न करितां फिरवावी आणि तसाच गावाकडे जाऊन पुन्हा तुह्मी व तो बरोबर येऊन सदर्हू सोयरीक तोडली. व तुह्मीही त्या वेळेस आपले अंगीं दोष असल्याचे कबूल केले. ते व्हां तुरखेड, काळगव्हाण, धुदकी, गावंडगाव, दर्यापुर, अकोलखेड, आंधाड, इतके गावचे लोक पंचायतीचे वेळेस पंच होते. त्या पंचानीं व तुमचे येथील सखाराम ठाकरे यांणीं तुह्मास जो दोष दिला तो तुह्मी कबूल केला, त्यावरून लग्नसंबंधी व्यवहार तुटला. व लागलीच मुलीचे अंगावर घातलेले सर्व डागिने पंचानुमतें तुह्मी घेऊन गेले. असे असून तुह्मीच आह्मास उलटे खर्चांत घालून बुडविले व उलटी नोटिस देता यावरून फार आश्चर्य वाटतें. तर तुह्मी अशी खोटी नोटिस मला दिली याचे कारण काय? तुमचेमध्ये काहीं कमीपणा आहे, व त्या मुळें लग्न तुटले अशी जर तुह्मास मोठी खात्री झाली असेल तर तुह्मी आपले गावांतील सखाराम व आणखी सर्व गाववाल्यांकडून चांगले होऊन शुद्धपणाचा शद्ब लाऊन घ्यावा. व तुह्मास दोन तीन मुले आहेत त्यापैकीं एका मुलास गावांतील मुलगी अगाऊ करून नंतर तुह्मी आमची मुलगी करण्याचे मनांत आणावे ह्मणजे आह्मीही लाजून देण्यास तयार होऊं. तसे न करितां वरचेवर नोटिशीनें आह्मास चेंदता तर अशा तुमच्या दिलेल्या नोटिशीचा मी भितो असें नाहीं. तुह्मी डागिने नेले, लग्नसंबंध तोडला व तुह्मी दोष लाऊन घेतला, अशाबद्दल मी दहा गावचे साक्षीदार देतो. आधीं तुह्मी वर दर्शविलेले इसमापासून लिहिले करून घ्यावयाचे होतें. तसा प्रकार न होतां वेडेपणानें एकदम नोटिस दिली; आणि विनाकारण मजला खर्चांत घातले. या बद्दल मीच आपण होऊन, या नोटिशीचा जबाब येईपावेतो वाट पाहून नंतर योग्य कोर्टांत या नोटिशीचे खर्चासुद्धा फिर्याद करणार आहो हे पक्कें समजावे. कळावें तारिख ३० माहे जून १८७४ इ.

(सही) रावजी वल्लद लक्ष्मण भाडे रहाणार अकोलखेड तालुके अकोट निशाणी खुद.

नोटिस—राजश्री मंगळचंद जगदेव मारवाडी साहू दुकान मौजे सोनाळे तालुके जळगाव यांस खालीं सही करणार याजकडून अशी नोटिस देण्यांत येते कीं, तुमचेकडे संवत् १९३० साली खाते बाकी ऐन रुपये व त्याचे व्याज मिळून अजमासे रुपये १५०० येणे असून तुह्मी देत नाहीं. याजकरितां या नोटिशीनें कळविण्यांत येत कीं, आजपासून

१६ दिवसांचे आंत रुपये यावे. सदरहू मुदतींत रुपये वसूल न आले तर या नोटिशीचे खर्चासहित तुह्मावर फिर्याद करून कोर्टखर्चासुध्दां सर्व भरून घेण्यांत येतील. कळावे तारीख ३० माहे जून सन १८७३ इसवी.

(सही) मगनीराम तनसुकदास
साहु दुकान शेगांव
वहिवाटदार जिल्हा
मुरलीधर.

नोटिस— राजे मानसिंगराव जाधवराव जमेदार अज्ञान पालन करणार राणी आहिल्याबाई नवरे बाजीराव जाधवराव जमिदार सरकार दौलताबाद व मालक संस्थान पेठ देऊळगाव राजा यांस हरजिवनदास जगजिवनदास मुनीम निजवत कादरभाई महमदअली साहु याजकडून देण्यात येते ती अशी:—

तुह्मी आह्मांकडेन कर्ज घेऊन दस्तैवज करून दिला. व आमचे कर्ज व दुसरे आणखी लोकांचें कर्ज जे देऊळगाव पेठेचे बालाजीचे संस्थान संबंधी आहे त्याची फेड करण्या... पेठ देऊळगावचे संस्थानाचे ... वहिवाटीकरितां स्वाधीन ... आमचे कबजांत दे... करून संस्थानचा खर्च भागत नाही बाकी जो रकम बचत राहील ती सरकीकाम प्रमाणे कर्जदारास वाटून देत जावी वगैरे शर्तीचा दस्तैवज करून दिला असून संस्थानचा मालवगैरे सर्व आमचे ताब्यांत दिला परंतु दस्तैवज रजिस्टर करून न देतां आपण मोगलाई इलाख्यांत निघून गेले त्यामुळें कन्दपालक पर्णी देवाचे दागिने वगैरे जप्त करविले ते जप्ती खुली करण्याविषयीं अर्ज करण्यास किंवा त्याचे रुपये देण्याची तजवीज करण्यास अडचण आल्याकारणानें आम्ही तो दस्तैवज रजिस्टर करण्यास दाखल केला असतां अद्याप तुह्मी हजर होऊन रजिस्टर करून न देतां उलट आमचेकडील वहिवाट काढण्यासाठीं डिप्युटी कमिशनर साहेबांकडे अर्ज केला. हल्लीं यात्रेचा समयही जवळ येत चालला आहे. तेव्हां असा बखेडा रहाणें ठीक नाहीं. असें जाणून तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं, ही नोटिस पोचल्यापासून तीस दिवसांचे आंत तुम्ही सदरहू करारनामा जो करून दिला आहे तो रजिस्टर करून देऊन जो माल तुह्मी परभारे अर्ज करून डिप्युटी कमिशनर साहेबांकडून घेतला तो सर्व आमचे ताब्यांत द्यावा. असे तुह्मास अनुकूळ नसल्यास आमचे कर्जाचे रुपये व्याजासुद्धा व करारनाम्यांत लिहिल्याप्रमाणें तकरूर वगैरेचा खर्च व हिशाब खर्च संस्थान संबंधी झाला. त्या बद्दल एकंदर हिशेब करावा. याशिवाय यात्रेचे पूर्वी वहिवाट आह्मांकडून काढल्याबद्दल नुकसानीचे पांच हजार रुपये असे एकंदर रुपये आमचे आह्मास द्यावे. असे न झाल्यास कायदेशीर उपाय करण्याकरितां जो आह्मास खर्च करावा लागणार तो या नोटिशीचे खर्चासुध्दां तुमचे माथां पडेल.

संस्थानचे दागिण्याची पेटी आमचे ताब्यांत असोन आह्मांपासून त्याजेपट्टी वर तुह्मी सही करून घेतली असोन ती पेटी ... आह्मी पेटींतील ... ला आमचे देखत न घेतां परस्पर ... तून घेतल्या आतां त्यांत कमी जिनस निघाल्यास त्याची जबाबदारी आह्मावर नाहीं हें समजावे तारीख २ माहे जुलई सन १८७४ इसवी.

(सही) हरजीवनदास जगजीवनदास
निशाणी कादरभाई
दस्तुर खुद

## जाहिरात.

आम्ही खाली सही करणार सर्व लोकांस विनयपूर्वक कळवितो कीं, आम्ही हल्लीं उमरावतीहून इकडे येऊन वकिलीचें काम सुरू केलें आहे. ज्या कोणाची आह्मास काम देण्याची मर्जी असेल त्यांणीं आह्मास रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचाराचे मालक यांचे घरी येऊन भेटावे.

मुक्काम अकोले तारीख २ जुलाई सन १८७४ } सदाशिव नारायण वकील प्रांत वऱ्हाड.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असे समजू नये

जन्मदारिद्र्याविषयीं.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० मागील पत्रांत सांगितल्या प्रमाणें जन्मदारिद्र्यास त्याच्या दुर्वृत्तपणामुळें अंगावर वाजू आल्यावर कोणीही उपयोगी पडावयाचे नाहीं. सर्व सुखाचे वाटेकरी आहेत. प्रसंगी त्या अनाथांस दिनानाथ परमेश्वराखेरीज कोणी आप्तवर्ग, सोयरे धायरे, मित्र बांधव उपयोगी पडत नाहींत इत्यादि सुविचाराच्या गोष्टी कळू लागतात. आणि मग सन्मार्ग धरण्याची इच्छा होते. आतां अशा प्रकारचे अघोर प्रसंग जन्मदारिद्र्यास वैभव प्राप्त झाले असतांनाच सर्वकाळ घडतात असे नाहीं. मोठमोठ्या कुलीनावर व विद्वानतावर कालानुसार असे प्रसंग येतात. तथापि दरिद्र्याच्या हातून मुद्दाम ते घडण्याचा विशेष संभव आहे. याकरितां त्यांस उद्देशून मी खाली उपदेशपर दोन ओळी लिहिल्या आहेत त्या वाचून त्यापासून हित करून घेण्याकरितां सर्वांनी प्रयत्न करावा एवढी माझी करद्वय जोडून प्रार्थना आहे.

असें आहे कीं या जगतांतील मनुष्यांस श्रीमंती, मध्यमावस्था, आणि दारिद्र्य या तीन स्थितीपैकीं कोणत्या तरी एका स्थितींत आपले आयुष्याचे दिवस काढावे लागतात. आतां रहाट गाडग्या प्रमाणें किंवा रथचक्रा प्रमाणें कुलीन जे असतात ते कालमानानें नीच दशेस प्राप्त होतात, नीच जे आहेत ते कुलीनावस्थेप्रत जातात. असें जरी आहे तरी नीच दशेप्रत जाणाऱ्या कुलीनांनीं किंवा उच्च पदाप्रत चढणाऱ्या दरिद्र्यांनीं खेद किंवा संतोष किमपि मानू नये कारण या भवचक्राचा फिरविणारा तो अनाद्यंत निराकार षड्गुणैश्वर्य जगदीश्वर आहे त्याच्या कृपेनें आह्मी सर्व लोक या भवचक्राचे रथें खालींवर फिरतो तस्मात उच्च पदाप्रत चढणाऱ्या दारिद्र्यांना पदभ्रष्ट झालेल्या कुलिनांचा हेवा किंवा मत्सर करण्यास काहीं एक अधिकार नाहीं. प्रत्येकानें समजू लागल्यापासून माझें कर्तव्यकर्म काय आहे याचा अहोरात्र विचार करावा आणि ईश्वरप्रेरित बुद्धि जिला सदसद्विचार शक्ति असें ह्मणतात, जी चांडालांच्या कठोर अंतःकरणापासून अत्यंत दयाळु ज्ञानवान साधु लोकांच्या अंतःकरणांत वास करिते, तिच्या विचारानुरूप तिच्या सल्ल्यानें व तो लागेल तसें प्रत्येकानें वर्तन करावें. इच्यापासून कोणाला कोठेंही दुःख होणार नाहीं असा सार्वजनिक सिद्धांत आहे. मोठमोठ्या प्राचीन इतिहासावरून असें समजतें कीं या बुद्धीला अनुसरण्याकरितां कित्येकांनीं आपले प्राणही बळी घातले आहेत. सर्व काळ चित्ताला स्वास्थ्य व सुख देणारी ही बुद्धि आहे, इच्यापासून कोणाचे कादीमात्र ही वांकडें व्हावयाचें नाहीं. या करितां कोणत्याही स्थितींतील मनुष्यास वैभव प्राप्त झाले असतां त्यानें मद मत्सरादि षड्रिपूंनीं गर्विष्ठ न होतां या बुद्धीला अनुसरून या जगीं कालक्रमण करावें अशा प्रकारें जो आपले दिवस काढितो तो मनुष्य या जगांतील सर्व लोकांस काय परंतु परमेश्वरासही प्रिय होतो. अशा प्रकारें वर्तन न करितां जो मनुष्य पापमार्गाचें आचरण करून अनाथास विना कारण दंडितो, गाई ब्राह्मणांचा छळ करितो, पतिव्रता स्त्रियांचे पातिव्रत्याचा भंग करण्यास प्रवृत्त करितो, आपल्या दुष्ट कार्याचे उदाहरण दुसऱ्यास दाखवून त्यांची मनें अपवित्र करितो, त्याला या जगतामध्यें कादीमात्र सुख होत नाहीं. उलट त्याचा छळ होतो व मृत्यु नंतरही नाना प्रकारच्या यातना सोसाव्या लागतात, परमेश्वराची अवकृपा होते व शेवटीं नरकवास भोगावा लागतो याकरितां बांधवहो जेणेंकरून तुह्मापासून दुसऱ्यास कादीमात्रही त्रास होणार नाहीं, जेणेकरून सर्वसाक्षी आणि सर्वशक्तिवान् ईश्वर तुह्मावर संतुष्ट होईल अशा मार्गानें वर्तन करण्यास निरंतर प्रयत्न करा.

श्लोक.

गर्वानें मिळले धुळीस जन हे त्याच्याच योगें हरी ॥
आम्ही आचरितो कुमार्ग अवघे कांहीं दया ना करी ॥
प्रीती दुर्विषयांत नित्य गमते तीं तूं समूळा हरी ॥
त्राता ना तुजवाचुनी नच दुजा आह्मास पृथ्वीवरी ॥ १ ॥
आधीं जन्म असे जया लघुकुळीं त्याला सुदैवें मिळे ॥
हुद्दा मान तथापि कांहि न घडे सत्कृत्य आच्या बळें ॥
त्याला सद्गुण नावडे अवगुणीं प्रीती बहू तो धरी ॥
तेणें कीर्ति बुडूनि लोकपुसिची ॥ छीथू उडे त्यावरी ॥ २ ॥

एक हिंदु इच्छिणारा.

## पत्रें पाठविणारांस.

रा. रा. सुंदर दामोदर यांनीक कविता पोहचल्या तसेच 'देशहितेच्छु, मु० पिंपळनेर', 'आपला अंनादास' 'एक बुद्धा जईफ मूर्तिनापूरकर' यांची पत्रें पोंचलीं पुढील अंकांत प्रसिध्द होतील.

वऱ्हाडसमाचार

मिती अधिक आषाढ वद्य ६ शके १७९६

## पोलिसपट्टीविषयीं सुवार्ता.

वऱ्हाड प्रांतामध्यें पोलिसपट्टी नावाचा एक कर बऱ्याच वर्षांपासून स्थापित झालेला आहे तो मोठा त्रासकारक आहे. व कित्येक ठिकाणीं कित्येक लोकांवर प्रति वर्षीं तो वाढतही आहे. आणि याविषयीं गाऱ्हाणीं केलीं, असतां बाजाराण्यासारखा इन्साफही कोठें होत नाहीं. यामुळे फार वाईट वाटतें. या कराचें स्वरूपच विलक्षणपणाचें आहे व त्याला कांहीं अडाख किंवा धरबंद अथवा सर्वत्र सारखा नियम कोठें आढळत नाहीं. या गोष्टीचे खात्रीकरितां एकच उदाहरण सांगतो तें पहावें. उमरावतीस व्यापार मोठा व पोलिसपट्टीचें उत्पन्नही मोठें. सुमार तीस हजारावर तेथें जमा होते. असें असतां तेथें व किल्लेवर पहिल्या प्रतीची पोलिसपट्टी ३० रुपये आहे व अकोल्यास व्यापार कमी आणि पोलिसपट्टीही कमी ह्मणजे सारी पांच सहा हजार रुपये आहे पण येथें व किल्लेवर पहिला क्लास १०० रुपये व त्याखालीं ७५।६०।५० अशी पोलिसपट्टी आहे, तेव्हां हा केवढा अनियमितपणा आहे? सर्वांस चांगलें ठाऊक असेल कीं व्यापारी लोकांनां जितकी शत्रूची चाड असती तितकी दुसऱ्या कोणाला नसेल; परंतु कित्येक व्यापारीही या पोलिसपट्टीला त्रासून जाऊन त्यांनीं आपल्या जिनगीवर जप्तीची वारंटेंही आणून घेतलीं. व कित्येक व्यापारी गाव सोडूनही निघून जातात. हे मोठ्या सुखानें जात असतील, किंवा मोठे व्यापारी हौसेनें आपल्या जिनगीची विल्हेवाट होऊ देत असतील असें सरकारास वाटतें कीं काय? असें वाटत तर नसेल, पण सरकार या कामीं विचार कादीमात्र करीत नाहीं असें दिसून येतें. प्रजेला सुख देणें, व्यापार सुरळीत चालू ठेवणें, व जुलमाची दाद घेणें या गोष्टी सरकारच्या कर्तव्यकर्मांतील आहेत ह्मणून त्यांनीं त्या पहाणें अवश्य आहेत. आतां आह्मी इतका वेळ सरकार सरकार जे ह्मणत आलों त्याची व्याप्ती बहुत कामदार मिळून आहे. त्यांत मुनसिपल कमिट्या, तहशिलदार, डिपुटी कमिशनर, व कमिशनर इत्यादि कर बसविणारे, तो पास करणारे व त्या वरील अपिलें ऐकणारे इतके येतात. निदान आमचे मतें गृहीत आहे परंतु आह्मास लिहिण्यास फार संतोष वाटतो कीं सदरील अधिकाऱ्यांत सर्वांच्या वरचे अधिकारी ह्मणजे कर्नल मेभार्ड साहेब रिवेन्यूकमिशनर हे फार दयाळू सरदार

आहेत. त्यांच्या पुढें या पोलिसपट्टीच्या जुलमाचे कित्येक अर्ज गेले तेव्हां त्यांस त्याविषयीं फार कळवळा येऊन यांनीं रेसिडेंट साहेबाकडे एक रिपोर्ट केला आहे. व त्यावरून त्यांना मोठी उमेद आहे कीं पोलिसपट्टी लवकरच कमी होईल. व त्याबद्दल यांनीं अकोल्यास आल्यावेळीं म्युनिसिपालिटीस सांगितलें कीं आम्ही सदरहू प्रकारची तजवीज केली आहे याविषयीं अर्जदार लोकांना समज द्यावी. व रेसिडेंट साहेबाकडून पोलिसपट्टी कमी होण्याचा ठराव आल्याबरोबर ज्या ज्या लोकांची पट्टी कमी होण्याची ती केली जाईल त्यांनीं स्वस्थ असावें असेंही त्यांस कळविल्याविषयीं नेभार्ड साहेबांनीं मुद्दाम कमिटीस सांगितले या त्यांच्या अगत्याबद्दल व त्यांनीं या का[illegible] विशेष मन पुरविल्याबद्दल लोकांनीं त्यांचे आभार मानिले पाहिजेत.

दुसरी एक आनंदाची गोष्ट अशी समजली आहे कीं सरकारी लोकांवर या साली पोलिसपट्टी बसविलेली आहे ती अजीबाद माफ झाली. हें फार चांगलें झालें. प्रथमच वर्षी त्यांवर पोलिसपट्टी बसविली व ती वसूल करण्या पूर्वींच माफ झाली इतकी त्याची तारायंत्राबारणें झटपट तजवीज लागल्याबद्दल व्यापारी लोकांस मोठा अचंबा वाटेल यांत संशय नाहीं. कारण ते कित्येक वर्षें ही जुलमी पट्टी देत आहेत, व अर्ज करीत आहेत पण त्यांची दाद बहुतकालपर्यंत लागली नाहीं आणि सरकारी नौकर लोकांची दाद फारच लवकरचे मानली; तथापि सरकारी नोकरांत साहेब लोक आहेत व त्यांतही ही पट्टी द्यावी लागणार होती हा विचार मनांत आणिला ह्मणजे ती लवकर माफ झाल्याचें विशेष आश्चर्य मानण्या जोगें नाहीं. अस्तु. तें कसेंही असो. साहेब लोकांस पट्टी माफ झाल्यानें त्यांचे हाताखालचे कामगारास व कारकुनांस ती माफ झाली तर त्याच प्रमाणें त्यांच्या आश्रयानें रहाणार सर्व ग्रामस्थांसही ती माफ व्हावी अशी ग्रामस्थांची इच्छा आहे. व ती रेसिडेंट साहेबानीं दयाळू होऊन पुरवावी अशी आमची त्यांस शिफारस आहे.

## वऱ्हाड.

आज १९ दिवस होऊन गेले पावसाचा थेंब नाहीं. तेणेंकरून लोक हवालदिल होण्याच्या बेतास आले आहेत. इतक्यांत पाऊस पडेल तर फार चांगलें; नाहीं पेक्षा काळजीची गोष्ट खरी!

—ooo—

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं कर्नल नेभार्ड साहेब वऱ्हाडचे रिविन्यु कमिशनर आपले पत्नीसहवर्तमान गेल्या बुधवारीं येथें येऊन दोन दिवस राहिले व शुक्रवारीं दोन प्रहरीं उमरावतीस परत गेले— त्यांचे आदरार्थ क्या० मेकंजी साहेब डिपुटी कमिशनर यांनीं रेल्वे स्टेशनावर उत्तम तयारी केली होती. इनफंट्रीचे १०० लोक व पोलिसची एक तुकडी त्यांचे सलामी करितां स्टेशनावर नेली होती त्या शिवाय गावांतील सभ्य लोक, म्युनिसिपालिटीचे मेंबर व सरकारी मोठमोठे कामदार यांस स्टेशनावर जाण्याविषयीं फर्मास केली होती ते व सर्व युरोपियन लोक स्टेशनावर गेले होते त्यामुळें नेंभार्ड साहेबाचे आगमनाची एक अपूर्व शोभा दिसून आली. साहेब बहादूर गाडींत बसून लोकांचे सलाम घेत घेत जु० कमिशनर साहेबाचे बंगल्यावर गेले. गुरुवारीं सकाळीं गाव पहाण्याकरितां रिविन्यु कमिशनर साहेब डिपुटी साहेबाबरोबर बाहेर निघाले होते. ते टौनहाल, मार्केट, नदीचा पूल, व गाव पाहून टेपलकगीच्याकडे गेले व तिकडून परत गेले. दोन प्रहरीं कित्येक लोक त्यांच्या भेटीस गेले होते त्यांशी उत्साहपूर्वक त्यांनीं भाषणें केलीं रात्रीं मोठ्या मेजवानीचा व नाचाचा थाट झाला. नंतर शुक्रवारींही स्टेशनावर यांना पोचविण्याकरितां कित्येक युरोपियन लोक, नेटिव कामगार, व म्युनिसिपल मेंबर गेले होते. जातांना त्यांनीं म्युनिसिपालिटीस सांगितले कीं एथील लोकांवर पोलिसपट्टी जास्त बसल्याचा बोभाटा आहे. व आह्मी एकंदर वऱ्हाडांत पोलिसपट्टी पुष्कळ अशी कमी होण्याविषयीं रेसिडेंट साहेबास लिहिले आहे व तिकडून ती कमी होऊन येईल अशी आह्मांस उमेद आहे. अशा विषयीं लोकास आपण समज द्यावी ह्मणून सांगितले. नंतर सर्वांचे सलाम घेऊन गाडींत बसून उमरावतीकडे गेले.

—ooo—

क्या० रेनिक साहेब बदनेऱ्याचे असिस्टंट कमिशनर विलायतेस जाणारे त्या ज्या रजेवर गेले त्यांचे जागेवर इकडून मि० डनलप साहेब जाणार असें वर्तमान आहे.

—ooo—

चिखलीचे नायब तहशिल्दार रा. रामचंद्र आपाजी यांस थर्ड क्लास माजि० चा अधिकार मिळाला.

—ooo—

दोन्ही कमिशनर आफिसांतील कांहीं नेमणुकांविषयीं रेसिडेंट साहेबांकडून हिंदुस्थान सरकाराकडे लिहून गेलें होते त्या नेमणुका कमिशनरसाहेबांनीं लिहिल्याप्रमाणें मंजूर होऊन आल्या त्या अशाः—

मि० कीससाहेब रिविन्यु कमिशनरचे हेडक्लार्क यांस ४०० रुपये पगार झाला व तिकडील क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. भास्कर सखाराम जयवंत यांस जुडिशियल कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट नेमिले. व रा. रा. माधवरावहरी सहस्रबुध्धे यांस अकोला डिपुटी कमिशनरचे क्लार्कआफ धिकोर्ट नेमिले. व त्या जागेचा पगार १९० रुपये आहे ह्मणून त्यांस दरमहा ६० रुपये परसनल अलावन्स देण्याचा ठराव केला. तसेच अकोला डि० कमि० चे क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. विष्णु सखाराम बापट यांस उमरावती डिपुटिकमिशनर अफिसांत नेमिले. व तेथील हल्लीचे काम करणार रा. रा. केशव जयकृष्ण देशपांडे यांस रिविन्यु कमिशनर आफिसांत १०० रुपये पगारावर तीन महिने प्रोबेशनरी क्लार्क अफ धि कोर्ट नेमिलें.

—ooo—

स्यानिटरी कमिशनर आफिसांतील हेडक्लार्क मि० फाल्कर हे नोकरीचा राजीनामा देऊन पुण्याकडे गेले त्यांचे ८९ रुपयांचे जागेवर तूर्त मि० बापुजी यादव अकोला व्याक्सिनेशनचे सुप्रिंटेंडेंट यांस नेमिलें आहे. व त्या प्रमाणें त्यांस कायम केल्यास नवीन सुप्रिंटेंडेंट कोण होतात पाहावें.

व्याक्सिनेशन खात्यांत सहा जिल्ह्यांना सहा सुप्रिंटेंडेंट आहेत त्यांत मि० बापुजी यादव हेच चांगले शिकलेले गृहस्थ आहेत व बाकीचे पोपट पंची आहेत. त्यांत ही मुसलमान गृहस्थ जे तीन च्यार आहेत. त्यांच्या विद्वत्ता मोठ्या गहन ऐकण्यांत येतात. बरें ते विद्याशत्रू असतील का? पण मेडिकल कालेजांत कांहीं किताब मिळविले असतील ह्मणावे तर त्यांस दुसरे कांहीं किताब नाहींत. फक्त ढ द्वित्त ढ गसे किताब दिले तर शोभतील असे ह्मणतात. असल्या अप्रयोजक लोकांना एवढ्या मोठाल्या हुद्याच्या व पगाराच्या जागा देण्यांत त्यांच्या वरिष्ठांनीं काय अधिक पाहिले असेल तें असो.

—ooo—

एस अपाकटी मुदलियार यांस पश्चिम वऱ्हाडांत प्रोबेशनरी फर्स्ट ग्रेड ओव्हरसियर नेमिले.

—ooo—

मि० पिकन्स अकोल्याच्या सरकारी शेतांवरील सुपरिंटेंडेंट यांस ३ महिन्याची हक्काची रजा मिळाली.

—ooo—

बुलढाणें जिल्ह्यांतील सेशन कोर्टाकरितां उद्या सोमवारीं जुडिशियल कमिशनर साहेब मलकापुरास जाणार आहेत.

—ooo—

मि० सदाशिव नारायण मुंबईकर वकील यांनीं अकोल्यास आपले काम चालविण्याबद्दल दुसरे पृष्ठावर जाहिरात दिली आहे. हे गृहस्थ मुंबईस सालिसिटरचे क्लार्क कित्येक वर्षें होते व यांस इंग्रजी येतअसून कायदाकानूची माहिती चांगली आहे असे समजतें.

—ooo—

येथील डिपुटी कमिशनर साहेबापुढें एका कसाबिणीनें येका पोलिस शिपायाचा विषप्रयोग केल्याबद्दल तिजवर मुकदमा चालला होता त्याविषयीं क्या० मेकंजी साहेब यांनीं जागच्या जागीं जाऊन बारीक चौकशी केली व च्यार्ज ठेविल्यानंतर ही पुरावा नाहीं ह्मणून खटला सोडून दिला.

—ooo—

मोर्शीस एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरचें कोर्ट केलें व त्यावर मि० नागोराव जयकृष्ण असिस्टंट काटन कमिशनर यांस नेमिलें.

—ooo—

वाशीम (मित्राकडून) तारीख २ जुलाई आरद्रा नक्षत्र लागल्यापासून पावसानें आपला अगदी गाशाच गुंडाळा आहे. पाण्याचा एक थेंबही या १० १२ दिवसांत पडला नाहीं मृगनक्षत्रांत पाऊस चांगला झाल्यामुळें लोकांनी पेरण्या वगैरे केल्या परंतु आलिकडे बिलकुल पाऊस नसल्यामुळें नुक्तीच वर आलेलीं पिकें वाळत चालली आहेत. सध्या उष्णता तर इतकी जबर वाटू लागली आहे कीं सकाळचे आठ वाजल्यावर घराचे बाहेर निघावेसे वाटत नाहीं तरी पाऊस लौकर पडेल असें वाटतें.

येथील कायमचे तहशिलदार मि० सादत मीरसा तीन महिन्याचे हक्काचे रजेवरून परत येऊन काल रोजीं आपले कामावर रुजू झाले. त्यांचे आक्टिंग काम पहाण्यांत आलेले शावासखान हे आतां कोठें जातात पहावें.

लोकलफंडइंजिनियरची जागा रिकामी होती तीवर मि० नसरवानजी डोराबजी यांची नेमणूक होऊन ते पुण्याहून आले.

## वर्तमानसार

आनरेबल द्वारकानाथ मित्र कलकत्ता हायकोर्टाचे जडज मरण पावल्याचे वर्तमान स्टेट सेक्रेटरी यांस विलायतेस समजलें तेव्हां त्यांनीं अत्यंत दुःख दर्शित केले.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं बडोद्याची राज्यव्यवस्था सुधारण्याचे पंथास लागत चालली आहे. दिवाण मि० दादाभाई नवरोजी त्या कामीं फार मेहनत घेत आहेत. व काजी शाबुदीन रिविन्यु कमिशनर प्रांतांत न्यूनाधिक पाहाण्याकरितां गेले होते त्यांनीं पाचच्यार महाल पाहिले. व त्याबाबदींत सविस्तर रिपोर्ट केला त्यावरून पुढील सालीं शेत साऱ्या बाबतींत सरकारच्या व रयत लोकांच्याही सुखावह अशी कांहीं नवीन व्यवस्था करण्याचा दिवाणांनीं बेत केला आहे. रयतेच्या मनांतूनही राजेसाहेबाविषयीं आतां विशेष प्रेम उत्पन्न होत चाललें आहे. तसेंच मिस्तर बळवंतराव गंगेश बागळे हायकोर्टाच्या चीफजष्टीसचे काम फार उत्तम रीतीनें व निष्पक्षपातानें करितात त्यामुळें त्यांचीही तेथें मोठी चहा आहे.

मुंबईहून गेल्या मे महिन्यांत अडीच लक्ष गठ्ठे ह्मणजे सवालक्ष खंडी कापूस किंमत रुपये २४८९९९२७चा बाहेर प्रांतीं गेला.

तात्याटोपी सन १८५७ सालांतील बंडवाल्याचे कमांडर इनचीफ याचे बंधु बाबाटोपी ब्रह्मावर्ताहून पुण्यास आले आहेत व सदाशिवपेठेंत राहिले आहेत.

दुष्काळाच्या बंदोबस्ताकडे ७०री कामदार लाविले होते त्यांपैकीं १६ कामदारांची गरज नाहीं ह्मणून त्यांस त्यांचे पहिले कामावर पाठविले.

मि० कृष्णाजी लक्ष्मण यांस कच्छचे राव यांणीं १५०० रुपये पगार करून आपले दिवाण नेमिले आहेत. व त्यांच्या नोकरीची गरज नाहींशी होईल तेव्हां त्यांस पेनशन मिळावें ह्मणून एक लाख रुपये बंकेंत व्याजी ठेविले आहेत असें समजते.

असें वर्तमान आहे कीं, बडोद्याचे श्रीमंत मल्हारराव गायकवाड यांणीं मुंबई सरकाराकडे एक लक्ष रुपये पाठवून त्यांस असे कळविले कीं या रुपयांचा सरकारणीं आपण व्यय करावा. त्यावरून मुंबई सरकारानें ते रुपये त्यांकडे परत पाठवून त्यांस उपदेश केला कीं, या रुपयांचा आपण आपले राज्यांतच चांगला उपयोग करावा.

मुंबईच्या सिनियर माजिस्ट्रेटची जागा मि० कुपर साहेब यांस मिळाली व मि० डोसाभाई सेकंड व मि० नाना मोरोजी थर्ड माजिस्ट्रेट झाले.

हिंदुस्थानांतील सर्व रेलवेला गुदस्त साली ३२६०५९८० रुपये उत्पन्न झाले. हें तिगस्तपेक्षां ५७ लक्षांनी अधिक आहे.

विलायतेंतील वर्तमानपत्रांच्या मालकांचा धाडसपणा चमत्कारीक आहे. लंडन टैम्सच्या मालकांनीं पारिसपासून आपल्या हापिसापर्यंत स्वतंत्र तारायंत्र चालू केलें व त्या योगानें बातमीदारांचीं मोठमोठीं पत्रें येऊन प्रसिद्ध होतात असें स्पेक्टेटरवरून समजतें. इं. प्र.

## वऱ्हाड प्रांत व निजाम सरकार.

( सुबोधपत्रिकेवरून )

हैदराबादचे निजाम यांस वऱ्हाडप्रांत परत मिळावा किंवा न मिळावा याविषयीं इंग्लिश वर्तमानपत्रांतून बरीच चर्चा चालली आहे. व असें खचित दिसतें कीं, हा विषय थोडे दिवसांत सर सालरजंग हे पार्लमेंट सभेपुढें आणवितील. वऱ्हाड प्रांत इंग्रेज सरकारास निजामानें देण्याचें कारण असें झालें कीं, सन १८०० मध्यें या उभय राज्याधिकाऱ्यांमध्यें परस्परांशी मित्रत्वाबद्दल तह होऊन त्यांत असें ठरलें कीं, निजाम यांच्या मुलखाच्या संरक्षणार्थ त्या प्रांतांत इंग्लिशांनीं पांच हजार पायदळ व दोन हजार घोडेस्वार इतकी फौज ठेवावी; व त्या फौजेचा व तत्संबंधी दारूगोळा वगैरे सामानाचा खर्च द्यावा. याप्रमाणें व्यवस्था १८५३ पर्यंत चालत आली. परंतु या फौजेच्या लोकांचा पगार वगैरे वेळच्यावेळेवर मिळत नव्हता म्हणून या सालीं हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लार्ड डालहौसी यांहीं निजामाशीं असें बोलणें लाविलें कीं, सदरील सैन्याच्या खर्चानिमित्त तुम्ही इंग्रेज सरकारास कांहीं मुलूख द्यावा. या मुलखाच्या उत्पन्नांतून वर लिहिलेल्या फौजेचा पगार, आपा देसायी यांच्या चौथाईबद्दलचा पैसा, महिपतराम व दुसरे कितीएक मराठे पेनशनर यांची पेनशनें, व ईस्टइंडिया कंपनीस निजामानें देणें असलेल्या पैशाचे मुद्दल व त्यावर ६ टक्केप्रमाणें व्याज; इतक्या रकमा खर्च कराव्या. या वेळेस निजामानें इंग्लिश सरकारास सुमारें २० लक्ष रुपये देणें होतें. यावर सांगितलेल्या सर्व खर्चाबद्दल वऱ्हाडप्रांत व रायचोर दुआब इतका मुलूख इंग्लिशांच्या हवालीं करण्यांत आला; व असें ठरलें कीं, या सर्व प्रांताची व्यवस्था हैदराबाद एथील इंग्लिश सरकारचा रेसिडेंट याच्या मार्फत व्हावी. सदर्हु प्रांत इंग्लिशांस फक्त कंटिंजेंट फौज वगैरेच्या खर्चाबद्दल दिला होता. केवळ फरोक्त करून दिला नव्हता, हें उघड असून ज्या अर्थी त्याची व्यवस्था रेसिडेंटच्या मार्फत व्हावी असें होतें त्या अर्थी निजाम सरकारचा त्याशीं नेहमी संबंध राहावा असा तहकर्त्यांचा इरादा होता असें खचित दिसतें. असो. १८५७ सालीं हिंदुस्थानांत बंड झालें, त्यावेळीं निजाम इंग्लिशांशीं फार मित्रत्वानें वागले सबब १८६० सालीं नवीन तह होऊन जुनें कर्ज निजामास माफ केलें गेलें व रायचोर दुआब प्रांत परत देण्यांत आला. १८५३ सालीं वऱ्हाड प्रांताचें उत्पन्न सरासरी ४० लक्ष रुपयांचें होतें व सांप्रत सुमारें ६० लक्ष होत आहे असें म्हणतात. सदर्हु तहांत आणखी असें लिहिलें होतें कीं, वऱ्हाड प्रांताच्या उत्पन्नाचा वगैरे इंग्लिश सरकारानें कांहीं हिशेब देऊं नये व कंटिंजेंटचा वगैरे खर्च भागून कांहीं जास्त पैसा उरल्यास तो पैसा निजामास द्यावा किंवा त्याचा इंग्रेज सरकारानें पाहिजे तसा उपयोग करावा. सांप्रतच्या उत्पन्नांतून बरीच शिलक राहत आहे हें उघडच आहे; परंतु त्या शिलकीचा व्यय कसा होतो हें कळत नाहीं. हा प्रांत फारच सुपीक असून यांत कापूस फार उत्पन्न होतो; तेव्हां असा उत्कृष्ट मुलूख आपणाकडे परत यावा असें सर सालरजंग यांस वाटलें यांत नवल नाहीं. तेव्हां हा प्रांत सोडवावा म्हणून बडोद्याचे कुलीन सावकार गोपाळराव मैराळ यांजवळून ९ कोट रुपये घेऊन ते इंग्रेज सरकारास द्यावे व त्यांच्या व्याजांतून त्याहीं कंटिंजेंट फौजेचा वगैरे खर्च करावा असें सालरजंग यांहीं बोलणें लावलें आहे अशी कांहीं दिवसांपासून अफवा निघाली आहे. परंतु असें म्हणतात कीं, सालरजंग यांचे म्हणणें कबूल करूं नये असा आपल्या सरकारचा विचार आहे. खरेंच आहे; असा सुपीक व भरभराटीस आलेला व मांचेस्टरच्या लोकांकरितां कापूस उत्पन्न करणारा प्रांत आपल्या हातून जावा असें कोणास वाटेल? व इंग्लिश सरकारास तर वाटणार नाहींच. सालरजंग यांचे म्हणणें अगदीं रास्त आहे. कंटिंजेंटच्या खर्चाकरितां जर सदर्हु प्रांत दिला होता तर त्यानिमित्त रोख पैसा दिला असतां इंग्लिश सरकार वऱ्हाडप्रांत निजामास परत कां देणार नाहीं हें अगदी समजत नाहीं. सर सालरजंग हे आपल्या सरकारचे परम मित्र आहेत; याकरितां ते अशा प्रकारची तकरार करणार नाहींत वगैरे स्तुतीनें त्यांस हल्लीं चण्याच्या झाडावर चढवीत आहेत; परंतु ते चढले न जातां आपला खरा पक्ष सोडणार नाहींत असें वाटतें. कदाचित ते स्वस्थ राहिल्यास हैद्राबादचे लोक त्यांस निश्चळ राहूं देतील याचा संशय आहे. पुढें काय होतें तें पहावें.

## वऱ्हाड प्रांताविषयीं.

( ज्ञानप्रकाशवरून )

निजामाचे राज्यांत इंग्लिशाचे कंटिंजेंट लष्कर असतें त्याचा पुष्कळ दिवसांचा पगार तुंबून शेवटीं ती रकम सुमारें पन्नास लाखपर्यंत वाढली. सन १८५३ सालांत लार्ड डालहौसी हिंदुस्थानचे गवरनर जनरल होते. त्यांस सर्व हिंदुस्थान इंग्रजी अमलांत आणण्याचें वेड लागल्याप्रमाणें होऊन त्यांनीं थोडी सबब मिळाली कीं, मुलूख आपले ताब्यांत आणण्याची संधी कधींच दवडली नाहीं, त्याच वेळेस निजामाचें राज्यांतून कांहीं मुलूख आपले ताब्यांत घेण्यास ही वेळ चांगली आहे असें वाटून त्यांनीं निजामास पैसा देण्याविषयीं लकडा लाविला. त्या वेळीं निजामाचे राज्यांत चांगली हल्लीं प्रमाणें व्यवस्था नसून फार घोंटाळा होता. व जिकडे तिकडे लोटिंग बादशाही होती तेव्हां तेथून इंग्रजाचे लष्कराचा तुमलेला पगार ५० लाख रुपये मिळण्याचें नांव घ्यावयासच नको. तेव्हां डालहौसी साहेबांनीं निजाम सरकारशीं बोलणें लावलें कीं, ज्या अर्थी तुम्हास पैसा द्यावयास मिळत नाहीं व कदाचित आज तुम्ही पैसा कसेंही करून दिला तरी ही पगाराची नेहेमीं अडचण पडणार तर ती दूर होण्याकरितां तुम्ही पगाराचे उत्पन्नाइतका मुलूख आम्हास तोडून द्यावा म्हणजे सर्व अडचणी मिटून जातील. निजामास इंग्रज सरकारचें ऐकल्याशिवाय दुसरा रस्ताच नवता. तेव्हां त्यांचे राज्यांतील उत्तम मुलूख वऱ्हाड हा इंग्रज सरकारानें त्यांजपाशीं मागितला. हाच प्रांत मागण्याचें कारण इतकेंच कीं, येथें कापूस चांगला पिकतो व इंग्रज लोकांना कापसाची जरूरी फार असल्या मुळें हा प्रांत ताब्यांत आला म्हणजे कापसाची चांगली सोय होईल. निजामानीं हा प्रांत इंग्रज सरकारचे ताब्यांत देण्याचें कबूल केल्यावर दोघांचा तहनामा झाला. आतां वाघ आणि शेळी यांचा तहनामा होऊं लागल्यास त्यांत कोणाचे सोईचीं कलमें येतील हें सांगावयास नको. निजाम आणि इंग्रज सरकार यांच्यामध्यें जो तहनामा झाला त्यांत एक कलम असें होतें, कीं, ह्या प्रांतांत जें कांहीं अधिक उत्पन्न होईल त्यांत निजामानें मन घालूं नये. या नंतर आणखीही पुढें तहनाम्यांत फेरफार झाले. १८५७ सालांत जें बंड झालें त्या वेळीं निजाम सरकारानें इंग्रज लोकांस मदत केली व ते बंडांत मिळाले नाहीं यामुळें इंग्रज सरकार खुष होऊन त्यांनीं कर्ज माफ केलें व निजामाचा कांहीं मुलूखही परत दिला. आतां फक्त लष्कराचा चालू पगार देण्याची मात्र तजवीज करणें राहिलें. तितका पुरता पैसा ठेवून बाकी वर्षाचे अखेरीस जी शिलक राहील ती निजाम सरकाराकडे जमा करतात असें आमचे ऐकिवांत आहे. हल्लींचे निजामचे दिवाण सर. सालरजंग हे काम काजांत फार हुशार असून यांनीं राज्याचा चांगला बंदोबस्त ठेविला आहे. तेथें जे दांडगे व अडाणी अरब वगैरे लोक होते त्यांस चांगले समजूत आणून ठेविले आहे. शिवाय इंग्रज सरकारची व त्यांची फार दोस्ती आहे. कितीएक मोठमोठे साहेबांस त्यांनीं आपले नोकरीस ठेविलें आहे. असे हुशार मनुष्य आपला मुलूख इंग्रज सरकारचे हातीं उगीच राहूं देतील असें कोणासही वाटत नवतें. आजपर्यंत पुष्कळ तऱ्हेच्या गप्पा उडाल्या होत्या. कोणी म्हणत कीं, इंग्रज सरकार वऱ्हाड प्रांत देण्यास खुषी नाहीं. त्याचे बदला दुसरा मुलूख देण्यास कबूल आहे. सर सालरजंग पुणें व पुण्याचे आसपासचा मुलूख मागतात, अशी गप्पही उडाली होती. याप्रमाणें निरनिराळ्या गप्पा आज वर्ष दीड वर्षापासून ऐकण्यांत येत आहेत. त्यांत खरें काय हें समजण्यास मार्गच नव्हता. हल्लीं तेविसाने तारखेचे टैम्स आफ इंडियांत याविषयीं कांहीं मजकूर छापला आहे व त्या वर्तमान पत्रास दुसऱ्या पेक्षां अधिक खरें समजण्याचे मार्ग आहेत. यावरून त्याचें लिहिणें भरवसा ठेवण्यासारखें आहे असें वाटतें. बडोद्याचे प्रसिद्ध सावकार गोपाळराव मैराळ यांचे चिरंजिवांनीं दक्षिण हैद्राबादेस आपले पेढीची एक शाखा नुकतीच स्थापन केली आहे. टैम्सचे म्हणण्याप्रमाणें ही शाखा स्थापन करण्याचा उद्देश असा दिसतो कीं, इंग्रज सरकारापाशीं वऱ्हाड प्रांत परत मागण्यापूर्वीं लष्करचा पगार महिन्याचे महिन्यास बरोबर मिळेल याची तजवीज निजामसरकारास लावून ठेविली पाहिजे. ती तजवीज लावीपर्यंत इंग्रज सरकारापासून मुलुख परत मागण्यास रस्ता नाहीं. सर सालरजंगाचा असा उद्देश आहे कीं, गोपाळराव मैराळाचे चिरंजिवापासून नऊ कोट रुपये कर्ज काढून ते रुपये इंग्रज सरकारचे स्वाधीन करावेत म्हणजे त्याचे व्याजाचे पैशानें लष्कराचा पगार देत जावा. असें केल्यानें पगाराची हलकी अडचण मिटवून इंग्रजसरकारापाशीं आपला मुलूख परत मागावा. तहनाम्याप्रमाणें इंग्रज सरकारानें तो मुलुख निजामाचा म्हणून अद्यापि ठेविला आहे. खालसात करून घेतला नाहीं. तेव्हां पगाराचा बंदोबस्त झाल्यावर मुलुख परत देण्यास सयुक्तिक अशी कांहीं अडचण हा खचित येणार नाहीं. आतां गोपाळराव मैराळचे पेढीची शाखा याच कामाकरतां सर सालरजंगानीं नेली आहे किंवा व्यापाराकरतां गोपाळराव मैराळाचे चिरंजिवानीं ती तेथें घातली आहे हें आमच्यानें खात्रीनें सांगवत नाहीं. इतकें मात्र वाटतें कीं, वऱ्हाडप्रांत निजाम सरकार परत घेणार म्हणून जी आज वर्ष दीड वर्ष वदंता ऐकूं येत असे तींत कांहीं खरेपणा आहे. निजाम सरकारानें हे प्रकरण सुरू केलें आहे किंवा लवकरच करणार आहे असें दिसतें. कितीएक इंग्रजी पत्रांचें म्हणणें आहे कीं, सर सालरजंग व इंग्रज सरकार यांचा फार स्नेह आहे तेव्हां सर सालरजंगानी हे प्रकरण काढूं नये म्हणजे ही गोष्ट काढल्यास इंग्रज सरकारचा व त्यांचा स्नेह न राहतां त्यांचे वैमनस्य येईल. असा त्यांचे लिहिण्याचा मतलब दिसतो. वऱ्हाड प्रांत परत दिला असतां इंग्रजसरकारचें कांहीं अंशीं नुकसान आहे. ते असें कीं, कापूस उत्पन्न करणारा प्रांत जो आज आपले ताब्यांत आहे तो दुसऱ्याचे ताब्यांत जाणार व इंग्रज लोक जे आज कितीएक वर्षें त्या प्रांतांत कामास लागले आहेत त्यांच्या चाकऱ्या जाणार. यामुळें इंग्रज लोकांस वाईट वाटेल खरें पण विलायतेंतील पुष्कळ लोकांस अन्यायानें लोकाचा मुलुख बळकावून बसावें हें आवडत नाहीं असें कांहीं उदाहरणांवरून आपणास माहित आहे. म्हैसुरचा राजा जिवंत असतां त्याचें राज्य इंग्रज सरकारानें आपले ताब्यांत घेऊन कितीएक वर्षें ठरल्यावरही पार्लमेंट सभेनें परत देवविलें. ही गोष्ट खरी आहे कीं अशीं उदाहरणें फार सापडणार नाहींत. तथापि जीं थोडीं घडून आलीं आहेत त्यावरून लोकाचा मुलुख गिळंकृत करावा अशी इंग्लंडांतील लोकांची इच्छा नाहीं. यावरून असें वाटतें कीं, ही गोष्ट पार्लमेंट सभेपुढें गेल्यास निजामाचा मुलुख निजामास परत द्यावा असाच बहुतकरून ठराव होईल.

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांनीं व. स. छा. छा. प्र. केलें.

REGISTERD NO7, 1874'

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ | अकोला, रविवार ता० १२ माहे जुलै सन १८७४ इ० | अंक २८

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| | रु. |
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| ,, अखेर | ९ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विकावयाच्या आहेत. हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटी प्रमाणे पातळ करून स्नान केल्यानंतर लावावें. किंमत ६ सहा आणे.

हें औषध गजकरणाशिवाय खरूज नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

### लेखक पाहिजेत.

शिळाप्रेसाचे कामाकरितां दोन लेखकांची जरूर आहे. ज्यांचीं मोडी व बाळबोध अक्षरें चांगलीं असतील आणि ज्यानीं प्रेससंबंधी माहिती चांगली असेल त्यांनीं आह्मांकडे अर्ज करावे पगार १२ रुपये पासून २० रुपये पावेतो लायकी पाहून मिळेल. कळावे तारीख २० माहे जून सन १८७४ इसवी

खंडेराव बाळाजी फडके
व० स०चे मालक

### जाहिरात.

आम्ही खालीं सही करणार सर्व लोकांस विनयपूर्वक कळवितो कीं, आम्ही हलीं उमरावतीहून इकडे येऊन वकिलीचें काम सुरू केलें आहे. ज्या कोणाची आह्मास काम देण्याची मर्जी असेल त्यांणीं आह्मास रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचाराचे मालक यांचे घरीं येऊन भेटावे.

| | |
|---|---|
| मुक्काम अकोले तारीख २ जुलाई सन १८७४ | सदाशिव नारायण वकील प्रांत वऱ्हाड. |

### नोटिसा.

नोटिस—मेहेरबान अहमद साहेब जहागिरदार मौजे चितोडे अंबिकापुर मुक्काम बाळापुर यांस पोपटलाल परशराम साहू दुकान पेठ बाळापुर याजकडून देण्यांत येते कीं, गेल्या जानेवारी महिन्यांत भरले ला किस्ती पैकीं तुह्माकडून राजनामे रुपये ८८० आठ शें ऐंशी व शिवाय आजपावेतोंच व्याज येणें असून तुह्मी देत नाहीं याजकरितां तुह्मास कळविलें आहे कीं. आजपासून आठ दिवसांत तुह्मी मुद्दल व व्याजसुद्धां रुपये आणून द्यावे. तसें न कराल तर तुह्मावर ह्या नोटिशीने खर्चासुद्धां एकंदर रकमेची फिर्याद केली जाईल. कळावे तारिख ८ माहे जुलई सन १८७४ इसवी.

(सही) पोपटलाल परशरामजी
दस्तुर कन्हैयालाल वहिवाटदार.

No. 20 of 1874-75.
Poona Office of Secretary to the Dakshina Prize Committee 2nd July 1874.

NOTICE.

1. A prize of Rs. 400 will be given by the Dakshina Prize Committee for the best Marathi poem on "the present Bengal Famine." There must not be less than 1200 lines in the poem, and the metres, the Abhang, the Ovi, and the Anushtup should be excluded from it.

2. Another prize of Rs. 400 will be given for the best Marathi essay in prose (the form of a dialogue would be preferred) on "the importance of encouraging the manufactures of India," and the essay must consist of no less than 200 pages of ordinary size.

3. On receiving a complaint from one of the under-graduates of the University to the effect—that under the existing rules of the Committee, University men, who wish to compete for the prizes, have not fair opportunities of success given them; as from June to December, their whole time is devoted to preparations for the University Examinations the committee have been pleased to decide that competitors be henceforth requested to send in their works on or before the 30th of June, instead of on or before the 31st of March, as hitherto practised.

4. The competitive poems as well as the essays to be sent in to the Office of the Secretary to the committee on or before the 30th of June 1875, in accordance with the above decision.

5. The poems and essays to be each accompanied by a sealed cover containing the author's name and superscribed with a motto.

RAWJI S. GODBOLE
Secretary to the
Dakshna Prize
Committee.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० आपण सर्वांच्या शंका निवारण कर्ते आहात, व अज्ञान दूर करून खरा मार्ग दाखविणारे आहात. या करितां खालीं लिहिलेल्या च्यार ओळीस आपले जगप्रसिद्ध पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

महाराज मला एक शंका उत्पन्न झाली आहे. तिचें निवारण आपण अगर आपले प्रिय वाचक करतील अशा हेतूनें मी आपली शंका पत्र रूपानें आपणापुढें मांडितो ती अशी कीं— आमचे गावांत एक महा तपस्वी वृद्ध तुळशी माळा व पावशेर गोपीचंदन यांणीं सुशोभित झालेले असे प्रसिद्ध साधू आले आहेत. व त्यांणीं आपले नादास बरेच लोकांस लाविलें आहे. त्यांत स्त्रिया तर अतिशयच नादी लागून बोवांच्या शिषिणी बनल्या आहेत. आणि त्या रात्रंदिवस सेवेस तत्पर असतात. त्यांचें उदाहरण पाहून माझी स्त्री फार भाविक व मुमुक्ष असल्यानें तिलाही या गुरु महाराजांचा उपदेश घेण्याची इच्छा झाली व मीही कांहीं अशी बायकोचे स्वाधीन असल्यामुळें तिच्या इच्छेस अनुकूळ होऊन महाराजाकडून उपदेश देवविला. पुढें दोन च्यार दिवस झाले नाहींत. तोंच माझे स्त्रीने व तिच्या गुरूनें ह्मणजे वर सांगितलेले महाराजानीं मलाही खुद उपदेश घेण्याविषयीं आग्रह केला व मी भिडस्त तर उपदेश घेणार होतो इतक्यांत शंका उत्पन्न झाली कीं जर मी महाराजाजवळ उपदेश घेईन तर एका नात्यानें आह्मी स्त्रीपुरुष बहीणभावंडे होऊं आणि या नवीन झालेल नात्यानें जर वागू लागलो तर मला दुसरे लग्न करावें लागेल. परंतु तसें करण्यास सामर्थ्य नाहीं व पत्नीचा आग्रह तर महाराजाजवळ उपदेश घेण्याविषयीं फार आहे. तेव्हां मला आड विहिरे प्रमाणें झालें आहे. ह्मणून ही शंका दूर होण्याकरितां आपणाकडेस धावत आलो आहे तरी आपले कोणी विद्वान वाचकांनीं माझी शंका निवारण करून समाधान करावे. जर कदाचित मी महाराजाचाच उपदेश घेतला तर आह्मी उभयता स्त्रीपुरुषानीं पूर्वींचे नात्याप्रमाणें वागावें किंवा नाहीं. किंवा नवीन होणारे नात्यानें ह्मणजे बहीणभावाप्रमाणें वागावें किंवा काय? कदाचित जरी महाराजानीं मंत्र पालटून दिला ह्मणजे माझे स्त्रीचा मंत्र निराळा व माझा निराळा असें जरी केलें तरी आह्मी बहीणभावंडें होऊं सकणार नाहीं कीं काय? तरी या बदल मेहेरबानीनें खुलासा करावा व खरा मार्ग कोणता तो आधारासह दाखवा ह्मणजे मलाच काय परंतु माझे सारखे आणखी दुसरे जे शंकित असतील त्यासही आपले पत्रांतील उपदेशाप्रमाणें वर्तणूक करण्यास बरें पडेल कळावे पत्रविस्तार फार झाला ह्मणून छापण्याविषयीं हयगई होऊ नये. तारीख ६ माहे जुलई सन १८७४ इसवी.

एक शंकित

### हे तरी मोठेंच नवल!!!

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० खालील मजकूर कृपा करून प्रसिद्ध करावा.

स्वदेशीय वस्तू वापरण्याचे घाटत आहे तोंच परदेशस्थांनीं मोठ मोठीं असोशियशॅन भरवून हिंदुस्थानांत व्यसाहत करावी आणि त्या देशांत सुताच्या, कापडाच्या गिरण्या स्थापन करून त्या व्यापारांत थोडासा हिंदुस्थानांतील व्यापाऱ्यांचा हिस्सा ठेवावा ह्मणून मसलत चालविली, तरी पण आमचे व्यापारी, देशहितेच्छु ही गोष्ट मनावर घेत नाहींत व गिरण्यांची सुरवात करीत नाहींत हें तरी मोठेंच नवल! ह्मणूनच ह्मणतो या सदराखालीं इंदुप्रकाशात पत्र लिहिणाऱ्याच्या लिहिण्याप्रमाणें आजपावेतो एखादाही देशहितेच्छु वर्तमानपत्रकर्त्यानीं देशहितासंबंधी एखादें पत्र काढित नाहीं हें तरी मोठेंच नवल!!!

ज्यांच्या घरीं हजारो रुपयाचा व्यापार चालतो असे व्यापारी आपल्या मुलांस व्यापारांत महत् यातायात पडते ह्मणून व शिलवानें ह्मणा अथवा " दक्षणा: पांतु" देऊन ह्मणा दहा दहा आणि बारा बारा रुपयांवर सरकाराचे दास बनवूं लागले हे तरी मोठेंच नवल!!!

नोकरीमध्यें किती सुख आहे आणि ती कशा प्रकारची हल्लींच्या स्थितींत आहे अशा प्रकारच्या विषयावर व्याख्यानें देऊन,, सेवा धर्मः परम गहनो योगिनामप्यगम्यः" अशा प्रकारचीं वचनें ह्मणून लोकांचीं मनें त्यापासून वळविणारे स्वदेश उपदेशक तो उपदेश एकीकडे ठेऊन एकीचा त्याग करून आपल्या मुलांस नोकर करण्याचे इच्छूं लागले हे तरी मोठेंच नवल!!!

सेकंडक्लास सर्टिफिकट मिळविणाऱ्यांचे सोडा परंतु हल्लींच्या राजाची भाषा शिकून तींत मोठ मोठ्या पदव्या मिळविणाऱ्या लोकांस त्यांच्या योग्यतेनुरूप जागा मिळण्यास फारच कठीण पडते हे तरी मोठेंच नवल!!! इंग्रजी शाळेंत सरकार ठरवील त्याप्रमाणें फी देऊन बराच अभ्यास करून एखादी जागा रिकामी झाली, आणि तिजविषयीं अर्ज केल्यास सरकारांतून जबाब मिळतो कीं" तुह्मी अर्ज करण्यापूर्वींच ती जागा भरली गेली, पुढें जागा रिकामी झाल्यावर पाहूं' या शेऱ्यानें जागा रिकामी होणार केव्हां आणि सरकार पाहणार केव्हां अशा रीतीचा उमेदवाराचा प्रकार झाला असतांही ते नवकरीचा नाद न सोडतां पुन्हा

फुकट त्रास देतात व घेतात हे मोठेंच नवल!!!

आपल्या ढांगेंत दारूचा मक्ता नवता तेव्हां कलेक्टर साहेबांनीं ८ रुपयांवर नोकर ठेवावा आणि त्या करवी दारूची विक्री करावी ह्मणून ठराव झाल्यांत ब्राह्मणजातींतील एक उदरनिर्वाहास्तव कबूल झाला होता, हे तरी मोठेंच नवल!!!

मित्रहो सर्व कर्मात व धर्मात मद्याचा धंदा नीच असताही आपले ब्राह्मण लोक दारूचे मक्ते घेऊं लागले हे तरी मोठेंच नवल!!! मिती अधिक आषाढ वद्य ६ शके १७९६ मुक्काम पिंपळनेर, खानदेश

आपला देशहितेच्छु.

---

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस: —

वि० वि० अकोला इंग्लिशमराठी स्कुलाचे हेडमास्तर मि० सुंदर दामोदर यांची खामगावास बदली झाली त्यामुळे त्या वेळसमयीं त्यांच्या आदरार्थ विद्यार्थी मंडळ व असिस्टंट मास्तर लोक यांनीं एका रविवारीं त्यांस पानसुपारीचा बेत केला होता. तो चांगला झाला व त्याप्रसंगी कित्येक मंडळींनीं भाषणे केलीं. शेवटीं पानसुपारी फळे मिठायी वगैरे वाटून सभा बरखास्त झाली. ती हकिकत फार लांब आहे या साठीं आपण छापण्यास कंटाळाल ह्मणून त्यापैकी येकाने थोड्याशा कविता झटल्या त्यामात्र आपणाकडे पाठवून प्रसिद्ध करण्या विषयीं विनंती करित आहे. कळावे

श्लोक

जो वर्ते सकलेंद्रियीं समरसें
ज्या वर्णिती सर्वही॥
जो वेदा न कळे जयासि मुकले
पावी तसे दुष्टही ॥
ज्याच्या लेश रूपें अगाध तरले
साधू भवा सर्वदा ॥
तो पावो जगदेकराय अमुच्या
विद्यागुरूतें सदा ॥ १ ॥
हे देवा जगदीश्वरा तुज कसें
हें कृत्य वाटे बरें ॥
नेशी कां अमुच्या गुरूप्रति अशी
त्या अन्य ठायीं अरे ॥
त्याची येइ सरी असा कधि मिळे
आह्मा तुझा शिक्षक ॥
नेशी वा तरि ने परंतु यश त्या
दे आणि हो रक्षक ॥ २ ॥
जहाली न जों तीन अर्द्धे तयाला ।
तयी नेतसे दैव कीं त्या दयाळा ॥
जयीं नाहिं आह्मी गुणा वेचियेले ।
गुरूनीस नाहीं कधीं सेवियले ॥ ३ ॥
आह्मी सर्वहि बालकें तुज गुरो
वंदितसों सादरें ॥
ठेवी लोभ दया अह्मावरि सदा
तूं एकचित्तेचि रे ॥
विद्या लाभविली तवा बहु आह्मा
ती काय वर्णू सुखें ॥
नाहीं शक्ति अह्मां तुझी उपकृती
घोषावया या मुखें ॥ ४ ॥

दिंडी

कसा होशी निष्ठूर जगन्नाथा ॥
तुझ्या चरणीं ठेवितो अह्मी माथा ॥
असे आमुची प्रार्थना एक तूतें ॥
परत आणी त्या गुरू सुंदरातें ॥५ ॥

साकी

देवा आह्मी दीन बालके
नमितो तव चरणाला ॥
दीन होउनी हेंचि मागतो ॥
सुखकर होई त्याला ॥ ६ ॥
विद्यादाने त्याचें आहे
श्रेष्ठ पित्यासम मातें ॥
थोर पगारा देउनि येथें ॥
सत्वर आणि तयातें ॥ ७ ॥

आर्या

सुंदर या नामानें,
बोभाती जन अशा गुरू लागी ॥
देई दीर्घायुष्या,
अष्टक हें अर्पिलें तयालागी ॥ ८ ॥

---

## पत्रें पाठविणारास

'एक मास्तरगारू' पत्र पोचलें. प्रीतिसंपादनाचा मार्गावलंबि, थुंकी झेलणारा, चहाडखोर, मुलांस विविध फिडिल करणारा, मुलांचा हितशत्रू, मारका, उदाहरणांतील मराठी शद्वांकरितां साहेबांस व सवाष्कार मिळून पावणेआठ आणे दंड करणारा, इत्यादि उत्तमोत्तम विशेषणांनीं युक्त अकोल्यांत खरोखर कोणी मास्तर असेल तर त्यानें आपली चाल त्वरित सुधारावी.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती अधिकआषाढ वद्य १४ शके १७९६

---

## कापसाविषयींचा वार्षिक रिपोर्ट.

गेल्या महिन्यांत मि० डमलप साहेब इकडील असिस्टंट कमिशनर यांनीं मुंबईच्या चेंबर आफ कामर्स नामक सभेला व ऱ्हाडच्या कापसांविषयींचा वार्षिक रिपोर्ट केला व त्याची एक प्रत यांनीं आह्मास कृपा करून पाठविली असें आह्मी आपले वाचकांस तेंव्हांच कळविलें आहे. आतां त्या रिपोर्टांतील मतलब कळवितो.

गुदस्त साली कापसाची लागवड ज्या की तेव्हांच ती अधिक झाली व त्या मुळे पीक ही अधिक येईल असें आरंभीच डमलप साहेबांस वाटलें होते व तसा मजकुराचा त्यांनीं रिपोर्ट ही केला होता व तो शेवटी खरा झाला ही संतोषाची गोष्ट होय.

कापसाची लागवड वऱ्हाडांत प्रतिवर्षी वाढत चालली आहे हें खालीं लिहिलेल्या सात वर्षांच्या माहितीं वरून दिसून येईल. व गुदस्त साली एकदम २०३४९१ एकर जमीन कापसाच्या लागवडी कडे अधिक आली हेंही दिसून येईल.

| साल | एकर |
|---|---|
| १८६७।६८ | १२९४९९१ |
| १८६८।६९ | १२८६७४२ |
| १८६९।७० | १४१९७०६ |
| १८७०।७१ | १९४७४२७ |
| १८७१।७२ | १४८७६१८ |
| १८७२।७३ | १६०३९१३ |
| १८७३।७४ | १८०७४०४ |

नागपुर प्रांतांतही कापसाच्या लागवडी कडील जमीन थोडथोडी वाढत आहे. पण वऱ्हाडा इतकी विशेष नाहीं. व नागपूर प्रांत वऱ्हाडा पेक्षां फार मोठा असून तिकडे वऱ्हाडाच्या निमेही जमीन कापसाकडे नाहीं ही गोष्ट वऱ्हाडचे वर्चस्वा विषयीं विशेष दिसून येतें. सन १८६७।६८ सालांत नागपुराकडे ७३९६३८ एकर जमीन कापसाकडे होती ती या सालीं ८३०३१९ एकर झाली आहे.

या प्रमाणें लागवड अधिक झाली त्याच मानानें मालही अधिक तयार होऊन तो बाहेर प्रांतीं अधिक जाईल असें अनुमान होतें ते खरें झालें. व आज पर्यंत कधींही इकडून तीन लक्ष गठ्ठे कापुस मुंबईस गेला नाहीं तो साल मजकुरीं त्याहूनही थोडा अधिकच गेला ही गोष्ट वऱ्हाडचे इतिहासांत लिहून ठेवण्या सारखी आहे. आता हे बाहेर रवाना होणारे गठ्ठे कोणते सालीं कसकसे वाढले त्याचें टिपण असें:—

| सन | गठ्ठ्यांची संख्या |
|---|---|
| १८६६।६७ | २७१००० |
| १८६७।६८ | २३०५०० |
| १८६८।६९ | २७९००० |
| १८६९।७० | २१०४४४ |
| १८७०।७१ | २४६१०६ |
| १८७१।७२ | १८२९६४ |
| १८७२।७३ | २४४१८८ |
| १८७३।७४ | ३००६१० |

हा व्यापार हल्लीं जेथें मोठमोठाले कापूस दाबण्याचे फूलप्रेस आहेत व जेथें कापसाचे तग आणि मोठाले बाजार आहेत तेथेंच विशेष वाढत चालला आहे व मागें ल्हान सान गावाहूनही कापूस रवाना होत होता तसा आतां त्या ठिकाणाहून होत नाहीं असे स्टेशनवार वार्षिक याद पाहिली असतां लक्षांत येते. व येकंदर बेरिज पाहिली तर खामगावाहून ११०२३६, उमरावतीहून ८४७२१, शेगावाहून ९००५९, वर्धा आणि हिंगणघाट येथून ३१४९७, व मोर्तिजापूराहुन १४३७४ गठ्ठे या साली रवाना झाले. या सर्व गांवी कापूस दाबण्याचे फूलप्रेस आहेत. यांत शेगावचे पोटीं अकोटचा माल सामिल आहे, कारण अकोटास दाबलेले गठ्ठे ह्या स्टेशनावर येतात. मूर्तिजापूर तर ल्हान गाव आहे पण तेथें यंदाच दोन फूलप्रेस झाले आहेत व त्यांतून सदरीं लिहिलेले गठ्ठे तयार होऊन रवाना झाले.

सालमजकूरच्या तीन लक्ष गठ्ठयांत २९२०२३ गठ्ठे नागपूर रेल्वे वरील आहेत व बाकीचे ८९८७ गठ्ठे नर्मदा व्हालीं प्रांतांतील असून ते जबलपूर लायनी वरील आहेत.

अजून कोठे कोठे हाफप्रेस आहेत व कोठून कोठून डांकेही रवाना होतात पण त्यांची संख्या फूलप्रेसांतील मालाहून फारच कमी आहे. ह्मणजे असें.

| | |
|---|---|
| फूलप्रेस | २८९४१७ |
| हाफप्रेस | १२५९ |
| डोके ४०४० यांचे सुमार गठ्ठे | १३४७ |
| | २९२०२३ |

खामगाव, उमरावती, शेगाव, अकोट एथील हाफप्रेस तर अजीबाद बंद झाले. व सालमजकुरीं इतक्या ठिकाणाहून एक देखील हाफप्रेसचा गठ्ठा रवाना झाला नाहीं. नर्मदा प्रांताकडे मात्र अजून प्रेसाची उभारणी झाली नाही त्यामुळें तिकडील सर्व माल डोकऱ्यांनीं बाहेर जातो.

पूर्ववऱ्हाडात कापसाचें बी अजून पुष्कळ वाईट आहे. ते काढून टाकून त्या जागीं दुसऱ्या चांगल्या बीजाची खटपट केली पाहिजे. ह्मणून रेसिडेंट साहेबास निजामाकरितां त्यांनीं लोकांस नवें चांगले बीज घेऊन देण्याकरितां तुकावी देण्याचे सांगशन केलें आहे व त्याप्रमाणें तें बीज लोकांस देण्याची सुरवात झाली आहे. या वरून उमेद आहे कीं पुढील सालांत वाईट कापुस फारच क्वचित आढळण्यांत येईल. आणि तसें आढळलेंच तर दुसरे वर्षी तरी तें समूळ नाहींसें होईल.

वऱ्हाड व नागपूर इकडचा कांहीं कापूस वायव्य प्रांताकडेही जाते परंतु त्याची संख्या फारच थोडी ह्मणून वेळोवेळचे पत्रकांत त्याची दखल होत नाहीं. तरी त्याचें सरसालचें टिपण असें.

| कोठून | कोठें | डोके |
|---|---|---|
| गाराबारा | मिर्जापूर | १०१९ |
| ,, | अलाहाबाद | १५ |
| बागरा | मिर्जापूर | ८७ |
| बंकेरी | ,, | ५४ |
| सोहागपूर | ,, | १६२ |
| खागगाव | ,, | २ |
| | | १३३९ |

या शिवाय हिंगणघाटाहून कानपुरास ५५५ फुलपेस गठ्ठे रवाना झाले. वरील डोकऱ्यांचे ४४५ गठ्ठे धरले ह्मणजे १००० गठ्ठयाचा वायव्य प्रांताशीं व्यापार झाला असें दिसून येतें.

याप्रमाणे कापसा संबंधी हकीकत आहे.

---

## वारेन हेस्टिंग.

(लिहून आलेला मजकूर.)

मिस्तर मेकाले साहेबानीं वारेन हेस्टिंग्स या पुस्तकामध्यें अज्ञानानें ह्मणा किंवा दुसऱ्या देशाची निर्भर्त्सना करून आपल्या देशाचा पोकळ अभिमान मिरविण्याकरितां ह्मणा ज्या कित्येक गोष्टी लिहिल्या आहेत त्या खोट्या असून कांहीं अंशीं निंद्य आहेत असें आपल्या वाचकांस कळवावें अशी आमची इच्छा आहे. आतां आपण कदाचित विचाराल कीं अशा गोष्टी लोकांच्या नजरेस आणण्याचा हेतु काय? तर याला दोन हेतु आहेत. पहिला आमच्या देशांतील लोकांची नीति फारच कोती, आमचे लोक सर्व लोकांपेक्षां छक्केपंजी करणारे व पहिल्या प्रतीचे लबाड त्या प्रमाणेंच एखादे दुष्ट कृत्य करण्याच्या कामी मोठे धाडस असे जे त्या साहेबांनीं जागोजाग लिहिले आहे ते केवळ खोटें आहे. व खोटें आहे इतकेंच नाहीं तर आमच्या हिंदुस्थानापेक्षां

इंग्लंदातील लोक वर सांगितलेल्या दूषणास अधिक पात्र आहेत असें सर्वांस कळावें हा, आणि दुसरा असा आहे कीं आपल्याला जर एखाद्या गैर माहित गांवीं जावयाचें असेल तर आपणाला प्रथम त्या गांवची माहिती करून घ्यावी लागते. त्याप्रमाणे इंग्लंदाहून इकडे जे लोक येतात त्यांनाही आपण ज्या देशांत जाणार या देशांतील लोक वगैरे कसे असतील याची माहिती करून घ्यावी लागते. आतां हिंदुस्थानामध्यें राज्य संपादिलें क्लैव साहेबांनीं व त्याची उत्तम प्रकारें व्यवस्था केली वारन हेस्टिंग साहेबांनीं तेव्हां अर्थातच या दोन पुरुषांची चरित्रें वाचिलीं असतां सर्व माहिती मिळेल असें तिकडून इकडे नवीन येणाराला वाटतें हें साहजिकच आहे पण ज्या अर्थी या दोन पुस्तकांमध्यें हिंदुलोकांना फारच निंदा करून सोडिलें आहे त्याअर्थी येण्यापूर्वींच पूर्वकल्पित हिंदुलोक वाईट असा त्यांचा ग्रह झालेला असतो. मग काय विचारतां? एकदा हुद्यावर येऊन दाखल झाले की हाताखालच्या लोकांची तीन दिवसांत खोड काढितात आणि रात्रंदिवस सर्व प्रजेला त्रास देतात. याच कारणानें कित्येक साहेबापासून आह्मावर पराकाष्ठेचा जुलूम होतो तो सर्वांस कळवावा हा एक या लिहिण्याचा दुसरा हेतु आहे. दोष दाखविण्यापूर्वीं आपल्या प्रिय हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाकडे आपण वळूं या. आपला हिंदुस्थान देश पृथ्वीच्या पाठीवर जे पुरातन देश आहेत त्यापैकी एक आहे. जे इंग्लिश लोक सध्या आपल्या देशावर राज्य करीत आहेत ते फारच अलिकडील आहेत. त्यांची रानटी अवस्था जाऊन त्यांना राज्य ह्मणजे काय आणि धर्म ह्मणजे काय इत्यादि गोष्टी ज्या वेळेस कळूं लागल्या त्या वेळेस आमचा हिंदुस्थानदेश सुधारणेच्या भरांत होता. आपलें धर्म पुस्तक ज्याला वेद असें ह्मणतात तें झाल्यानंतर पुढें सुमारें चवदाशें वर्षांनीं ख्रिश्चन धर्मपुस्तक ज्याला बायबल असें ह्मणतात तें झालें, असा बेतास असा सुमार आहे. आतां भवचक्राच्या नियमाप्रमाणें क्रमाक्रमानें कांहीं राष्ट्रें प्रथम नीचावस्थेत असतात व पुढें तीच भरभराटीस येतात आणि पुन्हा धुळीस जाऊन मिळतात. मागचे इतिहास पाहिले तर आपणास सहज कळून येतें कीं पूर्वीं ग्रीस आणि इटली या देशासारखे पराक्रमी दुसरे देशच नव्हते. परंतु आतां ते मुळीच प्रबळ नाहींत. त्या नंतर फ्रान्स व इंग्लंडदेशांचेंच वर्चस्व झालें. या सृष्टीचा नियम असा दिसतो कीं कोणतीहि गोष्ट एकाच बऱ्या किंवा वाईट अवस्थेमध्यें सर्वकाळ कधींही राहावयाची नाहीं. आतां लार्ड मेकाले साहेबांची जन्मभूमि जो इंग्लंददेश तो भरभराटींत आहे येवढ्याच आधारावरून त्यांनीं आमच्या देशांतील लोकांच्या आचरणाची तसबीर इतक्या उलट रीतीनें काढावयाची मजह तो. आह्माला वाटतें कीं लार्ड मेकाले साहेब हिंदुस्थानामध्यें जरी नऊ दहा वर्षें होते तरी तितक्यानें त्यांना हिंदुलोकांचा वर्तनक्रम चांगलासा कळला नाहीं, व असा तर्क केला जातो कीं त्यांना कांहीं कामामध्यें कांहीं हलकाडाशीं गांठी पडल्या असतील व त्यावरून त्यांनीं सर्व हिंदुस्थानांतील लोकांच्या वर्तणुकेला आणि नीतीला एकदम दोष लाविला पण हें त्यांनीं बरोबर केलें नाहीं.

(पुढें चालेल)

## वऱ्हाड.

सुमारे वीस दिवसांत पाऊस अगदीं न व्हता परंतु ईश्वरकृपेनें तो पुन्हा शुरू झाला. शुक्रवारीं बहुतेक सांज्या रात्रभर बारीक भीजपाऊस पडत होता, काल थोडा पडला व आज पडण्याचें चिन्ह आहे. इवेत गारठा चांगला आला आहे. वसमोवारही बराच पाऊस पडल्याची वार्ता समजण्यांत आली आहे. आमचे राजेश्वराचे देवळांत ग्रामस्थ मंडळींनीं पर्जन्य लवकर पडावा ह्मणून भजनाचा सप्ताहही सुरू केलेला आहे व तो संपण्या पूर्वींच पर्जन्य आला ही संतोषाची गोष्ट आहे.

—000—

रिविन्यु कमिशनर कचेरीस क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा भास्कर सखाराम जयवंत शुक्रवारीं येथें येऊन शनवारीं जुडिशियल कमिशनर आफिसांतील क्लार्क आफ धि कोर्टचे कामावर हजू झाले. व त्याच दिवशीं रा. रा. माधवराव हरी सहस्रबुद्धे डिपुटी कमिशनर आफिसांत हजू झाले, आतां रा. रा. विष्णु सखाराम बापट लवकरच उमरावतीस जातील. व ते तेथें डिपुटी कमिशनर आफिसांत हजू झाल्यावर मग रा. रा. केशव जयकृष्ण देशपांडे हे रिविन्यु कमिशनर आफिसांत जातील. त्यांचें प्रोबेशन तीन महिन्यांचें पेशजी लिहिलें होतें परंतु तें सहा महिन्यांचें आहे असें समजतें. पुढें ही ते आपली हुशारी दाखवून त्या कामावर मुक्रर होवोत असें आह्मी इच्छितो.

—000—

खान बहादूर नवाब महमद शाबुद्दीन साहेब उमरावतीचे अस्याबी रजेवर गेले होते ते परत येऊन आपले कामावर हजू झाले.

—000—

मि० इलियट साहेब विद्या खात्याचे इन्स्पेक्टर बुलढाण्याकडे गेले होते ते परत आले.

—000—

येथें रा. रघुनाथ बाबाजी नवरंगे मुंबईचे फोटोग्राफर दोन अडीच महिने झाले आले आहेत. व ते आपलें काम चांगलें करितात. कित्येक युरोपियन व बहुत नेटिव लोकांचे फोटोग्राफ त्यांनीं घेतले. आतां ते लवकरच येथून जाणार आहेत. याजकरितां कोणास त्यापासून फोटोग्राफ काढवावयाचे असतील तर त्यांनीं ही संधी गमाऊं नये.

—000—

मुंबईच्या इंदुप्रकाश व नेटिवओपिनियन या पत्रांवरून असें कळतें कीं, उमरावतीस सुताची व कापडाची गिरणी काढण्याकरितां मुंबईच्या सावकाराची तयारी झाली आहे; व त्या कंपनीचे शेरही भरले ही गोष्ट ऐकून आह्मास फार संतोष होतो व त्याविषयीं अधिक बारकाव्याची माहिती आह्मी मिळूं इच्छितो. उमरावतीस जी गिरणी होणार तिचे पुढारी वालकार्ट, त्याचे बंधू आणि मि. कावसजी जहांगीर हे आहेत. तसेंच मेसर्स गाडम आणि कंपनी यांच्याही एका गिरणीच्या स्थापनेविषयीं तजवीज झाली आहे. मिळून दोन गिरण्या उमरावतीस होणार हें खचीत दिसतें. मग आमच्या कालिन साहेबांच्या खटपटीची तिसरी होणार किंवा नाहीं तें कांहीं कळत नाहीं.

याच प्रसंगीं आह्मी हीही एक आनंदाची गोष्ट आमचे वाचकांस कळवितो कीं, नागपुरासही दोन कापडाच्या मोठाल्या गिरण्या होण्याची तयारी झाली आहे व त्याकरितां सोळा लक्ष रुपयांचें भांडवलाचे शेरही भरले असें समजतें. या व्यापाराचें पुढारी कोणीही असोत व स्वदेशीय कदाचित नसले तरी निदान आमचे इकडील गरीब लोकांस येणेंकरून मजूर काम मिळेल. व कापडही अंशतः स्वस्त होईल यांत संशय नाहीं.

—000—

उमरावतीच्या हाय स्कुलाला नवीन इमारत बांधण्याचा ठराव झाला व त्याप्रमाणे कामाचीही लवकर सुरुवात होणार असें कळतें. जें हाय स्कूल राहील किंवा नाहीं असा संशय होता तें राहिलें एवढेंच नव्हे पण चांगलें चालेल अशी खात्री झाली व त्यामुळें त्याकडे पाचपंचवीस हजार रुपये खर्चण्यास सरकारास धीर आला हें पाहून आह्मास संतोष वाटतो. पण हें फळ कशाचें? आमच्या विद्वन्माणि रा. रा. श्रीराम भिकाजी जटार यांच्या श्रमाचें व कौशल्याचें. हें वरिष्ठाचे मनांत चांगलें बाणो व त्या योगें जटार यांस उत्तम फळ होवो असें आह्मी सोत्कंठ इच्छितो.

—000—

अकोल्याच्या तुरुंगांत सुमार ५०० कैदी आहेत तितक्यास ही लिहिणीं वाचणारे करण्याकडे मि० नौलिस साहेब सुपरइंटेंडेंट यांचे लक्ष लागलें आहे ही गोष्ट चांगली आहे. दररोज एक तास त्यांस शिकविणार व त्या करितां पुस्तकें स्लेटी वगैरे आणविण्याची योजना झाली आहे. अकोल्याच्या तुरुंगांत सतरंज्या पोपरीच्या रंगाच्या चांगल्या होतात व दुसरेंही बहुत सामान देशस्थिती प्रमाणें चांगलें होतें. व स्वच्छताही तेथें फार उत्तम प्रकारची राखली जाते.

—000—

गेल्या आठवड्यांत पोस्टाकडील सब इन्स्पेक्टर यांची पहिल्या पृष्ठावर मोठे टाईपानीं जाहिरात छापली आहे. ती बाहेर गावच्या हरळ मेलेनर करितां होय. शहरास व पोस्ट आफिसाचे गावास ती लागू नाहीं असें लोकांस कळविण्याविषयीं आंह्मांस शिफारस झाली आहे.

—000—

मेळघाटांत १६ शेराचे आंत धान्याचा भाव आहे ह्मणून शिपाई लोकांना महागायी भत्ता मिळण्याचा ठराव आहे तो हालिचपुरचे डिपुटी कमिशनरांनीं अमलांत आणावा असा हुकूम झाला आहे.

—000—

यवतमाळचे डिपुटी कमिशनर मे० स्पार्क्स साहेब विलायतेस रजेवर जाणार व त्यांचे जागेवर अकोल्याहून क्या०। मेकंजी साहेब जाणार व अकोल्यास क्या० बुलक साहेब डिपुटी कमिशनर होणार असें वर्तमान आहे.

—000—

वाशिम [मित्राकडून] ता. ९ जुलै १८७४ गावांत अलीकडे डोकें दुखणें, पडसें ताप खोकला आणि हागवण वगैरे बऱ्या रोगांनीं आपला शिरकाव केला आहे. त्यापैकीं डांग्या खोकल्यानें बरींच मुलें अत्यंत आजारी आहेत या रोगास चांगलें औषधच नाहीं असें बहुतेक वैद्यांचें सांगण्यावरून मुलांचे आईबाप मुलांस कांहीं औषधोपचार न करितां स्वस्थ बसतात. या रोगावर आपले वाचकांपैकीं कोणास चांगलें रामबाण औषध माहित असेल तर मेहेरबानगी करून वर्तमानपत्रद्वारें त्यांणीं प्रसिद्ध करावें. ह्मणजे आह्मी त्यांचे फार आभारी होऊं.

एथील नेटिव लायब्ररी ज्या जागेवर बांधली आहे त्या जागेविषयीं एथील एका ब्राह्मण्यानें डिपुटी कमिशनर साहेबाकडे फिर्याद केली आहे. तो तंटा हल्लीं चालू आहे. त्याचा निकाल बहुतेक या महिन्यांतच होईल असें वाटतें.

एथील तहशिलकचेरींतील एका कारकुनानें एका मांगणीपासून, तिचा कांहीं एक तंटा होता तो मोडून देतो असें ह्मणून तिजपासून कांहीं रुपये घेतले. परंतु त्याजकडून तें काम न झाल्यामुळें तिनें ते रुपये परत घेतले याबाबतींत त्या कारकुनाचा कांहीं संशय येऊन त्याची चौकशी डिप्पुटी साहेब यांजपुढें होऊन सदहू कारकुनास दोषमुक्त केलें. हल्लीं असें ऐकण्यांत आलें आहे कीं, त्या कारकुनास पुन्हा सस्पेंड केलें. खटल्याचा निकाल झाल्यावर त्यास सस्पेंड कां केलें कांहीं समजत नाहीं.

एथील जेलखान्याकरितां नवीन इमारत नुक्तीच तयार होऊन त्यांत जुन्या जेलांतून कैदी व इतर सामान थोड्या दिवसांपूर्वीं नेलें. ही इमारत चांगली झाली आहे.

येथें एकानें खासगी पत्रावर सरकारी तिकिटें लाविलीं होतीं ह्मणून मागें कळविलेंच आहे त्याची चौकशी डे० कमिशनर साहेबाकडे होऊन सदहू गृहस्थास दोषमुक्त केलें.

खनिन्यांचे पहाऱ्याकडे असलेल्या पोलिस कानस्टेबलांपैकीं एक कान्स्टेबल आपल्या खटल्यासह तहशिलकचेरीजवळ रहात होता. तो एके दिवशीं आपले बायकोस अतिशय मारूं लागला तेव्हां एथील नायबतहशिलदारांनीं त्यास मना केलें. तें त्यानें न ऐकतां उलटी त्यांजवर बंदुक उचलली सबब त्याजवर फौजदारी मोकदमा होऊन डे० कमिशनर साहेबांनीं त्याजला ७ महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा दिली. पोलिस हे केवळ मनुष्याचे शरिराचे व मालमत्तेचे रक्षणाकरितां असून तेच लोक जर अशीं कामें करूं लागतील तर मोठी आश्चर्याची गोष्ट आहे!!

## वर्तमानसार

कराचीस गेल्या बुधवारी मोठें नक्षत्र दिसलें.

सरमन मेजर राजेंद्र चंदर एम.डी. विलायतेस रजेवर आहेत त्यांनीं तिकडे एका युरोपियन स्त्रीशीं विवाह केला. ती बारिस्टराची मुलगी आहे. या गृहस्थाला मिदनापुराला अकटिंग सिविल सरजन नेमिलें आहे.

ग्रेटब्रिटनचे एप्रिल तागाइत जून अखेर तिमाही उत्पन्न १७,६२,९०,००० रुपये झाले.

पंजाबचे सिविलियन मि० मेक्विल मुसलमान झाले. व नोकरी सोडून निघून गेले. त्यांचा पत्ता लागावा अशी सरकारची इच्छा होती. हल्लीं असें समजलें आहे कीं तो मुसलमान साहेब देहरा येथें आपल्या नव्या संसार खटल्यांत दंग आहे. व शेतकाम आणि दुसरी जुमली कामे करित आहे.

क्या० हेग रायल इंजिनियर विलायतेहुन ड्युक आफ एडिंबरो याजबरोबर इकडे आले होते त्यांस, हैदराबादेस निजाम सरकारचे टयुटर ( शिक्षक )नेमणार.

रा० सा० चिंतामण नारायण भट यास सातार जिल्ह्यांत अष्टे येथें सबार्डीनेट जड्ज नेमल्याप्रमाणें ते आपले कामावर रुजू झाले.

विलायतेस गिलख्रिस्त नामे एका उदार गृहस्थानें हिंदुविद्यार्थ्यांस सहाय व्हावें म्हणून स्कालरशिपा काढलेल्या आहेत त्यांपैकी एक स्कालरशिप सालीना एक हजार रुपये पगाराची यावर्षी मुंबईचे एम. एन. दलाल यांस मिळाली. ती त्यांकडे ५ वर्षे चालेल व त्यांनीं तावत्काल विलायतेंत राहून विद्याभ्यास करावा असा नियम आहे.

नवीन गिरणी— मुंबई येथें एक नवीन गिरणी लवकरच निघणार आहे तींत बारिक कापड, छींट वगैरे निघेल असें म्हणतात.

बाबू प्रतापचंद्र मुजूमदार हे विलायतेस पोंचून त्यांचा उपदेश वगैरे करण्याचा झपाटा चालू झाला.

नव्हदेशाच्या राजानें बंगालच्या दुष्काळ फंडास दहा हजार ६० पाठविले असें कळतें.

निजामाची फौज— स्वसिद्धायरी व कंटिनेंट या फौजा खेरीज करून निजाम सरकारानजवळ ३६,४०० पायदळ; ८,२६२ स्वार; २९९ गोलंदाज व ७३४ तोफा याप्रमाणें फौज आहे.

नागपुरांत दोन सुताच्या व कापडाच्या गिरण्या निघणार व यांपैकीं एकींचे भांडवल नऊ लक्षांचे व दुसरीचे सात लक्षांचे आहे असें बा. ग्या. च्या एका पत्र लिहिणाऱ्याच्या पत्रावरून समजलें. या दोनही गिरण्यांचे शेर भरले असेंहि कळतें.

महाशेकडे जमीनींत खळगे करून त्यांत लोखंडाचे गज पुरून वर वेळूच्या कामटयांचे शाकण करून माती टाकून सारवून त्यास गोंठयाप्रमाणे स्वरूप देऊन तेथें एखादें जनावर बांधून ठेवून वाघ खळग्यांत धरून मारण्याची कल्पना आलीकडे चालू झाली आहे असें समजतें.

लार्ड नार्थब्रूक यांनीं नवीन असा हुकूम फिरविल्याची वार्ता आहे कीं, जे कोणी सरकारी अंमलदार उन्हाळ्या दिवसांत सरकारी कामावर डोंगरावर राहावयास जातात त्यांचा दर शेकडा तेहतीस टक्यां प्रमाणें पगार कापला जाईल. हा हुकूम लेफ. गवर्नरापासून सर्वांस लागू आहे असें लाहोरचा एक पत्रकर्ता ह्मणतो. इं. प.

दस्तैवज वगैरे रजिस्टर करण्याबद्दलच्या १८७१ च्या ८ व्या आक्टाच्या ७७ व्या कलमाप्रमाणें कोणत्या दस्तैवजाच्या रजिस्टरास किती फी द्यावी याबद्दल नियम करून ते गेल्या सरकारी ग्याझेटांत छापले आहेत. त्यांत फीचे दर असे ठरविले आहेत कीं,

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५० | रुपये पर्यंत | | | ८४ |
| ५० | पासून | १०० | पर्यंत | ८८ |
| १०० | ,, | २०० | ,, | १ |
| २०० | ,, | ३०० | ,, | १८८ |
| ३०० | ,, | ४०० | ,, | २ |
| ४०० | ,, | ६०० | ,, | ३ |
| ६०० | ,, | १,००० | ,, | ४ |
| १,००० | ,, | १,५०० | ,, | ५ |
| १,५०० | ,, | २,००० | ,, | ६ |
| २,००० | ,, | ३,००० | ,, | ८ |
| ३,००० | ,, | ४,००० | ,, | १० |
| ४,००० | ,, | ५,००० | ,, | १२ |
| ५,००० | ,, | ७,००० | ,, | १४ |

विशेष माहिती ग्याझेट पाहिले ह्मणजे समजेल.

मुंबई इलाख्याच्या सरकारावर सर्व खात्यांतील हरएक प्रकर्णाच्या संबंधानें ज्या फिर्यादी व्हावयाच्या त्या योग्य आहेत कीं नाहीं हें प्रथमतः तपासून सांगण्याच्या कामावर मि० नेलर यांची नेमणूक केली आहे. व सर्व खात्यांतील लोकांकडे असें सर्क्युलर फिरविलें आहे कीं, सदरहू साहेबाच्या पसंती शिवाय जे खटले कोर्टांत जातील त्यांजविषयीं यापुढे सरकार जबाबदार नाहीं.

मद्रास येथें एक टाऊनहाल व एक मार्केट बांधण्याविषयीं विचार चालू आहे.

युनाइटेड स्टेटसमध्यें दिवसें दिवस अफू खाण्याचा प्रकार विशेषें करून वायकांत फार वाढत चालला आहे. तीस वर्षांच्या पूर्वीं जितकी अफू तेथें खपत होती त्यापेक्षां हल्लीं दसपट अफू जास्त खपते मद्यपान बंद करण्याविषयीं हल्लीं अमेरिकेंत बायका प्रयत्न करीत आहेत, असा फार गवगवा आहे. परंतु अफूवर त्यांची इतकी कृपा कां असावी हें समजत नाहीं.

मि. ए. सी. होप्टन सुरत येथील मिशन स्कूलचे हेडमास्तर हे आपल्या शाळेंतील मुलांवर फार कडक अम्मल ठेवितात. मुले उशीरानें आलीं किंवा आजाराच्या कारणानें किंवा दुसऱ्या कांहीं कामाकरिता गैरहजर राहिलीं असता त्यांस दंड करितात. व दुसऱ्या अनेक प्रसंगीं फार निर्दयपणानें छडीचा उपयोग करितात. दौलतराम रतनराम नावाच्या मुलास फार मारिल्यावरून तो मास्तरावर फिर्याद करणार आहे. याप्रमाणें मजकूर गु. मि. वरून कळतो. ज्या मास्तर लोकास आपलें कर्तव्य कोणत्या रीतीनें बजवावयाचें हें कळत नाहीं त्यांजकडून अशीं अघोर कृत्यें होऊन त्यांचे परिणामही अघोर होतात.

रा० नारायणराव खारकर यांस नवानगर एथील कारभाऱ्यांची जागा मिळेल अशी वदंता आहे.

लंडनच्या २७ व्या तारखेचे तारेवरून असें कळतें कीं मुंबईच्या कौंसिलांमध्यें मा. जेम्स गिब्स यांस सभासद नेमिलें.

गेल्या दोन वर्षांत विलायतेस २० कोटि रुपयांची दारू जास्त खपू लागली, व मागच्या वर्षीं विलायतच्या लोकांस एकंदर सुमारे १४६ कोटि रुपयांची दारू लागली!!! पृथ्वींतील इतर सर्व देशांतील लोकांपेक्षां विलायतचे लोक पहिल्या प्रतीचे मद्यपी आहेत असें दिसतें.

सुमारे ६ लक्ष रुपयांची अंडी फ्रान्स मधून इंग्लंडास रोज जातात. व प्रतिवर्षीं सुमारे ४ कोटि रुपयांची कोमडी वगैरे पक्षी व सुमारे दीड कोटीचें लोणी फ्रान्स मधून इंग्लंडांत विकावयास जातें.

अ. द.

थोडे दिवसांपूर्वीं मुंबई एथील आर्ट स्कुलांतील मि० टेरी साहेब यांस मुंबईच्याच मातीचीं चिनई भांडीं होतात कीं नाहीं तें करून पहाण्याची परवानगी मिळाली होती त्याप्रमाणें त्यांणीं आपले शाळेत सदरहू तऱ्हेचीं भांडीं करून पाहिलीं व आतां त्या शाळेंत फुलें ठेवण्याच्या कुंड्या, व खुजे वगैरे सामान फारच चांगलें होतें व गिऱ्हाईकेही बरींच येतात. असें मुंबई ग्याझेट पत्रांत लिहिलें आहे.

वायव्य प्रांतचे लेफ्टिनेंट गवरनर ह्यांनीं सरकारास अशी सूचना केली आहे कीं, कर्जाबद्दल तुरुंगाची शिक्षा देऊं नये.

गढूळपाणी निवळण्याची युक्ती— हातांत चांगला बळकट धरतां येईल असा फटकीचा खडा घेऊन तो ज्या भांड्यांत गढूळ पाणी असेल त्यांत न टाकतां सभोंवार दोनचार वेळा हातांत धरून फिरवावा असें केलें असतां अजमासे एका तासाचे आंत पाणी खासें निवळ होतें.

वकिलीच्या परिक्षेस येण्याबद्दल अयोध्येच्या चीफ कमिशनरानें ५० रुपये फी ठेविली आहे. मुंबई इलाक्यांत ७ रुपये फी आहे.

गेल्या गुडफ्रायडेच्या दिवशीं आस्ट्रियाच्या राजानें १२ वृद्ध स्त्रिया व १२ वृद्ध पुरुषांचे पादपूजन करून प्रत्येकास तीस तीस रुपये दक्षणा दिली.

सिव्हलद्वीपांतील एका वर्तमानपत्राचा बातमीदार लिहितो कीं तेथील मुंगियंगण नामक बुधधर्मी, देवालयांतील मूर्तींतून ज्वाला निघाल्या हे प्रत्यक्ष दोनवेळ पाहिले. ज्वाला सुमारे दीड तास निघत होत्या.

अमेरिकेंत, जमीनींतील मिश्र धातूपासून लोखंड तयार करण्याच्या ४६६ भट्या चालू होत्या त्या पैकीं २६६ बंद पडल्या असून हल्लीं २०० भट्या सुरू आहेत.

ने. ओ.

राजकोट एथील राजकुमार कालेजांत विद्यार्थ्यांची संख्या चांगली वाढली आहे. सरकारची इच्छा अशी आहे कीं गुजराथेंतील सर्व राजपुत्र व त्यांच्या मानकरी लोकांचे पुत्र ज्यांना तेथील खर्च पोसत असेल अशांस विद्याभ्यासाठीं अगत्य येथेंच गेलें पाहिजे. सरकारच्या स्वाधीन अल्पवयामुळें जितके राजकुमार आहेत त्यांस तर १० व्या वर्षांत कालेजांत पाठविण्यांत येते; पण ज्या दुसऱ्या ठाकूर लोकांस पुत्र आहेत त्यांच्यावर पोलिटिकल एजंटनीं कुमारांस कालेजांत पाठविण्याविषयीं सक्ती करावी; असा सरकारचा हेतु आहे आणि गवरनर जनरल असा कायदा करणार आहेत कीं, '१८ वर्षांचे वयापर्यंत तेथें अभ्यास करावा पुढे हिंदुस्थानांतील दुसरे प्रांत पहाण्यासाठीं एक वर्ष प्रवास करावा; ह्मणजे विद्येची संपूर्णता झाल्यासारखें होईल' २१ वर्षांचें वय राज्याचा कारभार हातीं घेण्यास योग्य आहे त्या वयांत त्यांचा मुलूख त्यांचे स्वाधीन करावा असा ठराव आहे.

स्थावर व जंगम मालमत्ता विकरी, गहाण, व मोबदला यां संबंधानें सरकारास देण्याची असल्यास जें खत करावें लागतें त्यावर स्टांप लागत असे तो बंद करण्याचा हिंदुस्थान सहकारानें हल्लीं ठराव केला आहे.

सु. प.

रशियाचा बादशहा इंग्लंडाहून परत जातांना फ्रान्सचे बाजूनें गेला पण फ्रान्सांत गेला नाहीं यामुळे फ्रेंच लोकांस वाईट वाटलें. त्यांनीं आपला वकील बादशाहाकडे पाठविला होता. त्यास बादशाहानें मी फ्रान्सचा शुभचिंतक आहे ह्मणून सांगितलें.

मि० धरमशी पुंजाभाई चार कापड विणण्याचीं यंत्रें स्थापन करणार आहेत असें समजतें.

हत्तींविषयीं—ह्मैसूर प्रांतांत जंगलांतून हत्तींचे कळप आहेत. त्यास सौदागर लोक सरकारच्या परवानगीनें हत्ती पकडणारे यांजकडून धरवितात. त्याप्रमाणें साल मजकुरीं एकंदर ५३ हत्ती मोठ्या युक्तीनें फसवून धरले. त्यांत १२ हत्तिणी मोठ्या दाताच्या आहेत व कांहीं लहान पिल्लीं आहेत. त्यांस पाणसाळून नंतर विकतात. त्यांची किंमत ह्मैसुरास ४०००० हजार रुपयांची झाली आहे.

काबुलाहून व बुखाऱ्याहून प्रति वर्षीं हिंदुस्थानांत एकंदर घोडे ३५०० येतात पैकीं ५०० घोडे हैदराबादेस निजाम सरकाराकडे, सुमारे १००० बाटेल त्या किमतीस नेटिव राज्याकडे व ९०० हिंदुस्थानांतील इंग्रज सरकारचे घोडेस्वारांचे पलटणींत जातात. व बाकी राहिलेले फुटकळ लोक घेतात.

ज्ञा० प्र०

सय्यद महमद बरगनशी नांवाचा शारब व्यापारी ज्यास एथील हाय कोर्टानें फलूकसुर नांवाच्या स्त्रीस पळवून आणल्याबद्दल २ वर्षांच्या कैदेची शिक्षा दिली होती, त्याविषयीं इजिप्तच्या बादशहानें विलायत सरकारास लिहिल्यावरून विलायत सरकारच्या हुकूमानें आतां त्या मनुष्याची शिक्षा रद्द करून त्यास कैदेतून मुक्त केलें.

मीर अहदखान या नांवाच्या पठाण मुसलमानानें एका मिसेस लेनन नांवाच्या युरोपियन मुसलमानीण झालेल्या स्त्रीसोबर व्यभिचार केल्याचा खटला चालू सेशनांत तपासला गेला. पठाणावर व्यभिचाराचा गुन्हा शाबीत होऊन त्यास ६ महिन्यांची साधी कैद झाली.

सोलापूर—रा० रा० मुरारजी गोकुळदास यांचीं नवे वेशीबाहेर देशी कापडाची नवीन होणाऱ्या गिरणीविषयीं जागेचीं वगैरे आजपर्यंत सरकारांत वाटाघाट चालली होती. हल्लीं सदरची गिरणी बांधण्याबद्दल सदहू गृहस्थास परवानगी मिळाली आहे. आतां या गिरणीच्या कामाची सुरुवात लवकरच होणार आहे. या सर्व कामाचे व्यवस्थापक व एजंट रा० रा० गणेश बाबाजी माटे वकील यांस नेमिलें.

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प. छापलें.

REGISTERD NO 7, 1874'

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ | अकोला, रविवार ता० १९ माहे जुलै सन १८७४ इ० | अंक २९

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १।८ |
| ,, अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीन नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपली व माझी जरी ओळख नाहीं तत्रापि मी आपल्यास नावानीं ओळखतो या ओळखीवर मी आपल्यास चार ओळी पाठविल्या आहेत त्यांचा स्वीकार करून येते अंकीं छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

मलकापूर एथे कचेरीस व स्टेशनाला जाणारी सडक मोठी ह्मणजे सुमारे दोन बैलगाड्या बरोबरीनें जातील अशी आहे. त्या सडकेवर पाणी तुंबू नये ह्मणून लोकलफंड इंजिनियर यांनीं मोरी बांधण्याचा विचार ठरवून सुमारे दहा हात लांब व सहा हात रुंद व एक पुरुषभर खोल असा तळगा खाणीला आहे त्याचें काम आज सुमारे महिना झाला चालू आहे परंतु अद्याप संपलें नाहीं त्या योगानें त्या सडकेने जाणार येणारांस रात्री अंधारांत फार त्रास पडतो व पडण्याची भीति वाटते या खळग्याविषयीं परगावचे लोकांच्या मनांत हो नसून उतारू लोक गाडीवरून उतरून रस्त्यानें चालत असतां एकदम खळग्यांत पडतात. पहा आज रोजीं रात्रौ एक मुसलमान आठ वाजण्याचे सुमारास आगगाडीवर बसण्याचे हेतूनें त्याच सडकेनें येत असतां सदर्हू खळग्यांत पडला त्यामुळें त्यास फारच इजा झाली व अंधारामुळें त्यास वर निघण्यास कोठेच मार्ग सापडेना नंतर आंत इकडे तिकडे अंधळ्याप्रमाणें चाचपून पंधरा वीस मिनिटांनीं वर निघाला. त्या वेळेस काय त्या बापड्याची अवस्था झाली असेल याचा वाचकांनीं विचार करावा. या मोरीचें काम संपे तोंपर्यंत तेथें रात्रभर दिवा असावा अशी मामनांत उत्कंठा झाल्यानें मी मलकापूरवासी लोकांस विनंती करितो कीं सर्व लोकांनीं शक्तीनुसार वर्गणी देऊन दीपलाघवास प्रारंभ करावा. व या कामाचे पुढारी आपचे हुशार रा. रा. बापूजी रंगनाथ ए० अ० क० व रा. रा. त्रिंबकराव तहशिलदार व बाळाजी नरसिंह हेड मास्तर हे होतील अशी आशा आहे हे पत्र लिहिण्याचा माझा पहिलाच प्रसंग असल्या कारणानें पत्रांत चुका असतील त्याची माफी असावी कळावे तारीख ११ माहे जुलै सन १८७४

आपला
मलकापुरकर क्ष

## होईल काय!

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. खालील मजकूर कृपा करून प्रसिद्ध करावा.

आपल्या हिंदुस्थानचे अधिपति जे इंग्रज सरकार त्यांच्या मनांत आपल्या हिंदुस्थानाविषयीं दया उत्पन्न होण्याजोगे आपल्या हिंदुस्थानाच्यानें कांहीं होईल काय?

हल्लीं आपल्या हिंदुस्थानांतील उत्तम उत्तम कारागीर लोकांस कांहींच धंदा नसल्यामुळें ते अन्नास महाग झाले आहेत तर याविषयीं हिंदुस्थानाधिपतीस दया उत्पन्न होईल काय?

महत् प्रयासानें आणि मोठ मोठ्या उदार गृहस्थांच्या साह्यानें वऱ्हाडांत सुताची गिरणी स्थापन होणार त्याप्रमाणें आमच्या खानदेशांत एखादी तरी सुताची गिरणी स्थापन होईल काय?

सांप्रत खानदेशांतील कीर्तन करणारे 'रिसबूड आणि मोहनी' हे उभयता स्वदेशहितेच्छु हरिदास सर्व खानदेशभर फिरून मोठमोठ्या गावांत आणि शहरांत मोठमोठ्या शेट साहुकारांस स्वदेशहिताच्या कामीं झटण्याविषयीं सदुपदेश करतील असें त्यांच्यानें होईल काय?

आह्मी स्वदेशहितेच्छु आणि आर्यजननीचे खरे पुत्र असें ह्मणणारे आणि स्वस्थ उदरभरणांत काळ घालविणारे ढोंगी मित्र, यांच्या व्यर्थ दांभिकपणानें हिंदुस्थानचें हित होईल काय?

स्वदेशहित करा, असाबद्दल लोकांस उपदेश करावयाचा, आणि आपण स्वत: इंग्रजी वस्तु वापरावयाच्या, असाने लोकांच्या मनावर स्वदेशहिताचा ठसा उमटून लोक स्वदेशहिताच्या कामीं झटतील असें होईल काय?

उमरावतीस ज्याप्रमाणें कालिन साहेबांनीं आमची दया बाळगून तेथें कापडाची गिरणी स्थापन करण्याबद्दल प्रयत्न चालविले आहेत, त्याप्रमाणें खानदेशांत कोणी परोपकारी युरोपियन कामगार मनावर घेतील असें होईल काय?

परवा मी एका चवाट्याचे जागीं असलो असतां एक उंच बुढ्ढा म्हातारा कोणाशी ह्मणत होता कीं, 'ए क्या खुदाकी लगाई है दर रोज शाहोंक्या कलमा टपालमें और गाड्यांपर आत्या है, बेनाहक ऐसे कामके वास्ते लोगोंकू हैरान करना, ए क्या बात है? त्यावरून मी जाणिलें कीं मूरसाहेबांनीं शाळांच्या कामीं सक्त मेहेनत चालविली आहे. तसेच आमचे दयाळू लोकप्रिय मूरसाहेब कालिन साहेबाप्रमाणें आमच्या देशांतील बडे बडे लोकांस स्वदेशहिताच्या कामीं उपदेश करतील तर फार चांगलें होईल; पण हिंदुस्थानाविषयीं त्यांच्या मनांत दया उत्पन्न होईल काय?

आपण उमरावतीस कापडाच्या गिरणी निमित्त सभा भरते वेळीं जाणार आणि तेथें त्या लोकांस स्वदेश हिताच्या कामीं झटण्याविषयीं उपदेश करणार तसे आमचे खानदेशवैभवकर्ते आपल्या कर्तव्यकर्माप्रमाणें शेट साहुकारांस उपदेश करतील तर बरें. धुळ्यास ऐक्यवर्धिका सभेमध्यें कधीं कधीं देशहितासंबंधी विषय निघतात परंतु त्या सभेमध्यें खानदेशवैभवकर्त्यांनीं एक क्षणभरही व्याख्यान दिल्याचें स्मरत किंवा ऐकिवांत नाहीं. तर ह्या प्रसंगीं त्यांकडून आपलें कर्तव्यकर्म रास्त रीतीनें बजावण्याचें होईल काय?

आज पाठविलेल्या चार ओळीचा स्वीकार होऊन पुढें आणखी शक्तीनुसार लिहित जाईन त्याचा स्वीकार होईल काय?

मिती अधिक शुद्ध १२ }
शुक्रवार शके १७९६ }
मुक्काम पिंपळनेर. खानदेश.

आपला
देशहितेच्छु

मोर्तिजापुर ता. २९ जून १८७४

मे० करदाम वराडसमाचारके एडिटर

आदाब बंदगी—क्यंव एडिटर महाराज दुनिया आबाद तो है! आप लोग हव के येही दुनियेमें हमारा मकाम चंदरोज होकर ह्यांकी कुच खबर मालूम नहीं होती. न्याहिपत खुशी हय के मोर्तिजापुरके बीचमे एक छोटीसी लायब्ररी हुई है और बावजुदके लोगोंकू अबतक सच्चा शोख पैदा नहीं हुवा. बहोतसे आदमी उस अकबारखानेमें जाकर पढते है. बंदेका कडकामी व्हां ज्या करता हय और बाकि दाकेतें कुच कुच खबरें कहता है. अब तो एलम बहोत चला हय. ख्याल करनेकी बात हय के बिलकुल बुढ्ढे अइफोकू ज्यो हाल मालुम नही हय वो सब हालके लडकोंकु मालुम हय. पेशतरके लोक नहीं जानतेथे के क्या लंडन, क्या इंग्लिस्तान चीज हय, लेकीन अब तो कुल दुनियाकी अउर आस्मानकी खबर मकतबके हुषार छोकरोंकु होती हय. हमारे वालिद कहतेथे के एलम शिकनेसे बच्चा नामर्द होता है. मायने शिपायीके कामका नहीं होता, और सच्चा येही सबब हय के पेस्तर मुसलमीनके लडके और खुसुसन येही वराडमे अलेफ, बे नहीं जानतेथे. काजीके या मुल्लाके लडके एक दो सिप्पारे कुरानके शिवाय कुच नहीं जानतेथे. लेकीन अब तो इंग्रज सरकार बहादूरने सब ज्याय मद्रसे कायम किये हय, और अच्छे मदरस हाशील होनेके लीये नारमल स्कूलभी मुकरर हुवा हय, वास्ते एलम बढने लगा. उमेद हय के चंदरोजमें मुसलमीन लोक बहुतसे हुन्नर पैदा करेंगे हुनरोंकु और एलमकू तरक्की होनेका लायब्ररी एक छोटासा इषारा हय. ये तारिफका और एहसानका काम तहशिलदार महमद मुबारक अली साहेबने बडे कोशीससे उठाया हय. वास्ते गरीब लोकोंपर उनकी मेहेरबानी समजना चयाहिये.

जैसा ये लायब्ररीका काम हुवा हय उस तोरसे अगर शफाखानेकी तजवीज जम जाय तो हम मोर्तिजापूरके रहिवासोपर सरकारका बडा एहसान होगा. करीब बरसका अर्सा हुवा कुच तजवीज चली रही, लेकीन उसका अंजाम कुच मालुम नहीं हुवा. ये तालुकेका गाव होके ह्या शफाखाना नहीं होना ये निहायत रंजकी बात हय. ह्यां कोई बेमार हुवा तो बगर उमरावती, अकोला या कारंजाके इलाजकेवास्ते कुछ सुरत नहीं हय. अब बेमार आदमीकु आगगाडीमें लेजानेकू क्या मुश्किल हय ये हमेशाके रेलवालेकामदारके बरतावीसे जाहिर हय, बलके बेमारने रेलपर और खुसूस थर्ड या फोर्थ क्लासमे स्वार होनेसे मकानमे इंतकाल होना बेहेत्तर. एडिटर महाराज, आप मुनसिब चाहो तो शफाखानेके वास्ते कलमकू इशारा फर्माना. बडी मेहेर्बानी होगी.

आपका एक
बुढ्ढा जईफ.

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि० वि० आपण तारीख ३१ माहे मे सन १८७३ इसवीच्या वऱ्हाडसमाचारांत अकोला जनरल लायब्ररीविषयीं जो मजकुर छापून प्रसिद्ध केला त्याविषयीं विचार करण्याकरितां तारिख ७ जुलै रोजीं लायब्ररीच्या म्यानेजिंग कमिटीची सभा भरली होती. तिजमध्यें बादांतीं खालील ठराव पास झाले. ते कमिटीचे आज्ञेवरून प्रसिद्ध करण्यासाठीं आपणाकडे पाठविले आहेत.

१. जनरल कमिटीची सभा सहासहा महिन्यांनीं भरते ह्मणून तारिख ३१ मेच्या पूर्वी भरली नाहीं. म्यानेजिंग कमिटीची सभा एप्रिल महिन्यांत भरावाची परंतु त्यावेळीं एक दोनच मेंबर्स येण्याजोगे असल्याकारणानें भरली नाहीं; ती पुढें जून महिन्यांत भरली.

२. धर्मार्थ वर्तमानपत्रें येत होतीं तीं बंद करून लायब्ररींत तीच विकत घेतलीं या गोष्टींत पैशाच्या संबंधानें नुकसान झालें खरें परंतु वर्गणीदारांच्या वेळेकडे आणि सोयीकडे लक्ष दिलें ह्मणजे नुकसान होत नाहीं.

३. एक सहा रुपयांचा व एक तीन रुपयांचा असे दोन मनुष्यें लायब्ररींत ठेविले हे लायब्ररीच्या वाढलेल्या कामामुळें रास्त आहे.

४. सेक्रेटरीस मनुष्य लावणें किंवा काढणें हा अधिकार नाहीं. तरी सेक्रेटरी

चे अधिकार म्यानेजिंग कमिटीनें न ठरविल्यामुळें आणि मनुष्य कामला काढण्याने लायब्ररीचें नुकसानही झालें नाहीं. म्हणून सेक्रेटरी दोषास पात्र नाहींत.

५. जरी एक दोन प्रसंगीं लायब्ररीचा मनुष्य सेक्रेटरीनीं घरच्या कामास लावला असेल तरी तो त्या कामांत गुंतलेला नसे.

६. लायब्ररीच्या खोलीला कुलूप आणि किल्ली सेक्रेटरीच्या घरीं अशी स्थिति एक दोन दिवस झाली होती; लायब्ररींत दिवाही त्यावेळेस नव्हता.

७. पहिल्या प्रतीच्या कोणीही वर्गणीदारांनीं लायब्ररीची स्थिति वाईट झाली असें समजून नांवें काढलीं नाहींत व वसूल होण्यासही हरकत होत नाहीं.

अकोला—
तारिख १४ माहे जुलै
सन १८७४ इसवी.

हुकुमावरून
हरि मोरेश्वर
सेक्रेटरी.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ६ शके १७९६

### वऱ्हाड परत जात नाहीं.

आम्हांस एका थोर गृहस्थानीं असें कळविलें आहे कीं निजाम सरकारास वऱ्हाड परत न देण्याचा इंग्लिश सरकारचा ठराव झाला. व याचें कारण असें सांगतात कीं दोन सरकारांच्या एकवाक्यतेनें जो तहनामा झाला तो एकटें निजाम सरकार बदलूं पाहतें हें इंग्लिश सरकारास संमत नाहीं. सबब निजाम सरकार रोख पैसा देतें त्याची इंग्लिश सरकारास जरूरी नाहीं.

## प्ररोपरीचे रंग देण्याचें नवीन यंत्र.

आमचा हिंदुस्थान देश अलिकडे व्यवहारोपयोगी विशेष सोयी व सुधारणा करण्याचे कामीं ज्यास्ती झटत आहे व त्या प्रमाणानें त्याला बरेंच यशही येत आहे. व लोकांच्या उद्योगाचें पाऊल दिवसानुदिवस पुढें पडत आहे हें पाहून आम्हांस मोठा संतोष वाटतो.

आमचे स्वदेशीय लोक या कामीं जितके झटत आहेत त्याहून अधिक परदेशीय लोक हिंदुस्थानची व्यवहार संबंधी सुधारणा व्हावी म्हणून झटत आहेत. आतां यांत त्यांचा 'स्वहित' हा हेतु आहे पण तेणेंकरून आपले नेटिवांचें आम हित आहे असें नाहीं. देशी सर्वथैव आळशी रहाण्यापेक्षां त्यांत परकीय लोकांचे जरी उद्योग चालू रहातील तरी ते फायदेशीर होतील यांत संशय नाहीं म्हणून परदेशीय लोक जे हिंदुस्थानांत युक्तिप्रयुक्ती चालू करण्याचे कामीं झटतात त्यांची तारीफ करूं नये असें कोणी म्हणणार नाहीं.

आज आम्ही रंगाच्या एका नवीन यंत्राविषयीं लिहित आहों. आपल्या देशाचा रंग देण्याचा प्रकार बहुत वाचकांस ठाऊक असेल. कुसुंब मळणें, झोळ्या बांधणें, रस्त्यावरून वस्त्रें वाळवीत उभे रहाणें वगैरे त्रासकारक कृत्यें त्यांत फार आहेत हें मनांत आणून मि० डब्ल्यु जे अडिस साहेब जे ठाण्यास मागें लोकलफंड इंजिनियर होते व ज्यांनीं कळेची नवीन तऱ्हेची गाडी वगैरे केल्याची प्रसिद्धी आहे या गृहस्थांनीं रंग देण्याच्या कामाचे यंत्राचा एक नमुना तयार केला आहे. व तो मुंबईच्या बहुत मोठे सावकार लोकांस व गिरण्या वगैरे यंत्रें चालविणाऱ्या लोकांस दाखविला व त्यांतून कांहीं वस्तुही रंगऊन दाखविल्या तेणेंकरून त्यांना फार संतोष वाटला व या नमुन्याचीं मोठालीं यंत्रें होतील तर फार चांगलीं असें त्यांनीं बोलून दाखविलें.

अडिस साहेबांनीं जो यंत्राचा नमुना केला आहे तो फुटास दोन इंच या स्केलचा केला आहे तरी त्यांत एके वेळीं ४० वार कापड कसल्याही रंगानें १० मिनिटांत रंगवितां येतें. व आतां ते जें मोठें यंत्र तयार करीत आहेत तें चालविण्यास बैलाच्या दोन जोड्या लागतील. आणखी अडिस साहेब असें सांगतात कीं त्या यंत्रानें कितीही सावकाश काम चाललें तरी रंगारी एक दिवसांत जें काम करील त्याचे दसपट काम होण्यास हरकत पडणार नाहीं. शिवाय रंगारी एक कापडावरच रंग चढवितो पण या यंत्रानें लोकर, सूत, रेशीम, ताग, कापड, कातडी इत्यादि बहुत वस्तूंवर रंग देतां येतात. व रंग चढण्याचेच प्रसंगीं त्या वस्तु स्वच्छ होणें, वाळणें, त्यांना चकाकी येणें, व त्यांच्या घड्या होणें या कृति त्या यंत्रानेंच होत असतात, दुसरा एक फायदा त्यांत असा आहे कीं शेकडो वार कापड किंवा दुसरी कांहीं वस्तु असली तरी ती मध्यें न फाडतां रंगवितां येते, तसाच तिसरा एक विशेष उपयोग त्यापासून असा आहे कीं पावसाचे दिवसांत आपले रंगारी लोकांचीं कामें चालत नाहींत ती हरकत या यंत्राला मुळींच नाहीं. बारा महिने दिवस रात्र या यंत्राचें काम चालविलें असतां चालेल. असें अडिस साहेब लोकांनां कळवितात

इत्यादि प्रकारावरून पाहिलें असतां हें रंगाचें यंत्र आपले देशास फार उपयोगी पडेल यांत संशय नाहीं. रंगाची माहिती आपले देशांत चांगली नाहीं. व त्यावर कोठें ग्रंथ नाहींत. अलिकडे डाक्टर नारायण दाजी यांनीं मात्र परोपरीचे रंगाची कृति करून पाहून त्याचे मासले मुंबई, लंडन व वियेना येथील प्रदर्शनापुढें ठेविले होते व त्यासंबंधी माहितीचीं टिपणें ही तयार करून प्रदर्शनास पाठविलीं होतीं; पण ही अडिस साहेबाची योजना त्यांहून विशेष दिसते. सबब ही चांगल्या प्रकारें सिद्धीस जाऊन तिच्या योगानें त्यांचा व आपले देशाचा फायदा होवो. व तें यंत्र पाहून तशीं दुसरीं यंत्रें करण्याची लोकांस उमेद येवो व त्यापासून त्यांस फळ होवो असें आम्ही इच्छितों.

मि० अडिस साहेब हे सरकारी नोकरींतून हल्लीं दूर झालेले आहेत व त्यावर फौजदारी खटलाही झाला होता हें आमचे वाचकांस ठाऊक असेल. व त्यांनीं तो खटला आपणावर अकसानें उपस्थित केल्याबद्दलचें नुकसान १०००० रुपये व पगाराची बाकी, आणि सरपिंडी व बरतर्फी संबंधी नुकसान मिळून सुमार २३००० रुपयांचा दिवाणी दावा विलायतेंतील हल्लीचे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांजवर मुंबईच्या हायकोर्टांत केला होता हेंही लोकांस ठाऊक असेलच त्याचा निकाल असा झाला कीं, सन १८६९ सालीं हिंदुस्थानसरकारानें लोकलफंड कमिट्यांचा कायदा केला व त्या कायद्याप्रमाणें कमिट्या नेमिल्या व त्यांत पाहिजे त्या नोकरास नेमण्याचा व काढून टाकण्याचा अधिकार दिला तेव्हांच या गोष्टीची जबाबदारी सरकारावरून सुटून कमिट्याकडे गेली. यास्तव अडिस साहेबांनीं जी नोकरी केली ती स्टेट सेक्रेटरीची केली नाहीं सबब ते त्याच्या पगारास व नुकसानीस जबाबदार नाहींत. तसेंच वादीचें म्हणणें होतें कीं पहिले स्टेट सेक्रेटरी ड्युक आफ आर्गाईल यांनीं द्वेषबुद्धीनें आपणावर फौजदारी मुकद्दमा करविला त्याबद्दल जडजांनीं ठराव केला कीं ती गोष्ट ड्युक आफ आर्गाईल यांस लागू आहे त्यांजवर पाहिजे असल्यास फिर्याद करावी. हल्लींचे स्टेट सेक्रेटरी लार्ड स्यालिसबरी यांजवर ही फिर्याद गैरवाजवी आहे सबब खर्चासुद्धां काढून टाकिली असा निकाल नुकताच झाला आहे. त्यावरून आमचे मि० एडिस साहेब निरुद्योगी व बेरोजगारी झाले आहेत सबब आतां नोकरी संबंधी सर्व खटपटी सोडून देऊन रंगाचीं यंत्रें, कळेच्या गाड्या वगैरे परोपरीचीं कौशल्याचीं कामें करून या देशांत आपलें नाव चिरकालिक करून ठेवतील व त्या योगें आपलाही फायदा करून घेतील असें आम्ही इच्छितों व तसें अवश्य करण्याविषयीं त्यांस शिफारस करितों.

## सुताचे व कापडाचे यांत्रिक कारखाने.

देशाची संपत्ती वाढण्यास देशामध्यें परोपरीचे यांत्रिक कारखाने सुरूं झाले पाहिजेत. व इतर चैनीच्या सर्व वस्तूपेक्षा मनुष्यास अन्न आणि वस्त्र यांची विशेष अवश्यकता आहे म्हणून या संबंधी कारखाने आपले देशांत जितके अधिक होतील तितकें देशाचें अधिक कल्याण होईल. अन्नोत्पादक या देशाची जमीन चांगली आहे. पण तिजवर यांत्रिक कारखाने अजून कोठें चालू झाल्याचें विशेष ऐकण्यांत नाहीं. वाफेचे नांगर अजून आपले देशांत झाले नाहींत. तसेंच पेरण्याचीं, उखरण्याचीं, बखरण्याचीं, कापणीचीं, व खळ्याचीं यंत्रें जीं जुनाट शेकडो वर्षें चालत आलीं आहेत. तींच अजून आहेत. त्यांत सुधारणा, किंवा त्यांच्या कामीं वाफेच्या शक्तीचा प्रयोग करणें अजून कोणास ठाऊक नाहीं. व तें ठाऊक करण्याकडे कोणाचें विशेष लक्ष लागून गेलें आहे असेंही पहाण्यांत नाहीं. अस्तु. प्रथम अवश्यकतेच्या गोष्टीकडे जरी लोकांचें अजून लक्ष गेलें नाहीं तरी दुसऱ्या वस्त्रसंबंधीं कारागिरीकडे लोकांनीं अलिकडे बरेंच लक्ष दिलें आहे असें दिसून येतें. व त्याबद्दल आम्हास फार संतोष वाटतो.

आमचे हिंदुस्थानचे लोक आळशी व त्यांच्या निरुद्योगपणाच्या पूर्वापार चालीच्या योगानें ते इतर देशांपेक्षा अलीकडे सुधारणेंत मागें राहिले आहेत हें सर्व जाणतात. तरी गरीब बिचारे हिंदू लोक एकादा उद्योग देशाच्या हिताच्या संबंधानें करूं लागले कीं, विलायतच्या लोकांच्या कपाळास तिडिक चढते हें मोठें आश्चर्य होय. दहा वर्षांपूर्वीं आमचे हिंदुस्थानांत एकही सुताची व कापडाची गिरणी नव्हती, अलिकडेच कोठें थोड्या बहुत झाल्या आहेत. तसेंच आमच्या देशाचा कापूस विलायतेस जाणाऱ्या अमेरिकेतल्या कापसापेक्षा निकृष्ट आहे, गिरण्याचीं यंत्रें विलायतेपेक्षां येथें महाग पडतात, यंत्रें चालविण्यास लागणारा कोळसा लागतो तो आमचे देशांत विलायतेपेक्षां महागच आहे, यंत्रें चालविण्याकरितां हुशार लोक पाहिजेत त्यांचें सहाय विलायतेपेक्षां आमचे हिंदुस्थानास कमी आहे, उत्तम कारागिरीचें व बारीक कापड तर विलायते सारखें हिंदुस्थानांत निघतच नाहीं, व तें निघण्याकरितां समुद्र किनाऱ्याचा एक प्रकारचा कापूस एकंदर कापसांत मिश्र करावा लागतो तो वर हिंदुस्थानास मिळणेंच नाहीं, व हिंदुस्थानांत कोठें जाडें भरडें कापड नुकतें च निघावयास लागलें आहे पण तितका देखील हिंदुस्थानचा उत्कर्ष विलायतच्या व्यापाऱ्यांस सहन न होऊन त्यांनीं पुकारा केला कीं विलायतच्या कापडावर शेकडा ५ रुपये जकात आहे ती माफ करावी म्हणजे आमचें कापड हिंदुस्थानांत हिंदुस्थानच्या कापडापेक्षांही स्वस्त द्यावयास पुरवेल असें ते म्हणतात हा त्यांचा केवढा अप्पलपोटेपणा आहे याचा आमच्या वाचकांनीं विचार करावा. विलायतेहून १७ कोटि रुपयांचें कापड प्रतिवर्षीं हिंदुस्थानांत येतें व हिंदुस्थानच्या गिरण्यांतून अजून एक कोट रुपयांचेंसुद्धां कापड निघत नाहीं तसेंच हिंदुस्थानांत यंत्रावर जाड कापड जरी निघतें तरी तें छापण्याचें काम, तसेंच नाडें पण कारागिरीचें व उंची दराचें कापड काढण्याचें काम अजून आमच्या देशांत होत नाहीं असें असतां विलायतवाल्यांनीं जो हव्यास मांडला आहे तो त्यांचा त्यांसच शोभू जाणे! आम्हाला वाटतें कीं सरकारानें आपली जकात कधीं कमी करूं नये, व ती करून सरकार आपला तोटा करून घेईल असे दिवस आतां राहिले नाहींत. इतर पदार्थांवर १० रुपये जकात असून कापडावर ५ रुपये आहे ती वास्तविक वाटेल असतां १० रुपये व्हावी असेंही कित्येक म्हणतात. अस्तु. ती गोष्ट स्वतंत्र आहे. व तिचा कधीं दुसरे प्रसंगीं विचार करूं. आतां आपले देशांतील सुताच्या व कापडाच्या का

रखान्यांविषयीं जी माहिती मिळाली आहे तिजविषयीं दोन शब्द लिहू.

बंगाल इलाख्यांत किंवा उत्तर हिंदुस्थानांत कापड विणण्याचीं वाफेचीं यंत्रें आहेत किंवा नाहींत हें आह्मीं समजलें नाहीं पण बहुधा नसावींत असें वाटतें. तसेच मद्रास इलाख्यांतही त्यांची भरमसाट नाहीं नुकतीच मुंबईचे व्यापाऱ्यांनीं तेथें एक सुताची व कापडाची गिरणी माडण्याची तयारी केली आहे. तेव्हां या गोष्टींत मुंबई इलाख्यास मोठें श्रेष्ठत्व आहे यांत संशय नाहीं. मुंबईत कापड विणण्याचीं वाफेचीं यंत्रें होऊन दहा वर्षें झालीं. मुंबईस याप्रकारचे चालू कारखाने आज मितीस १३ आहेत. व त्यांजमध्यें सुमार दोन कोटि रुपये भांडवल पडलेलें आहे. व त्यांपासून ते चालविणारास चांगला नफा होत आहे. त्यांतही पांच कारखाने फारच चांगले आहेत. त्यांचीं नांवें:— अलेक्झांड्रा, अल्बायन्स, ओरियेंटल, रायल,व धरमसी; या पांचही कारखानेवाल्यांनी आपल्या कारखान्याच्या इमारती अधिक वाढवून त्यांजमध्यें अधिक चात्या व अधिक माग मांडून कारखाने मोठाले वाढविण्याची तजवीज केली आहे. ह्मणजे त्यांनीं हे आणखी इतके नवेच कारखाने घातले असें समजलें पाहिजे. अलेक्झांड्रा कारखान्यामध्यें १९६३२ चात्या होत्या त्या आतां २९६३२ होणार. अशीच दुसऱ्या कारखान्याची वाढ आहे. त्याशिवाय मुंबईचेच व्यापाऱ्यांनीं बाहेरप्रान्तींही या कामाचे पुष्कळ कारखाने ठेवण्याची तजवीज केली ते सुमार एकवीस आहेत त्यांची नावनिशी येणेंप्रमाणें:—

१ खानदेश मिल ( जळगाव येथें); २ मद्रास युनैटेड मद्रासेस; ३ आर्देसर वाडिया ( कुरल्यास ) ४ सोलापूर; ५ विक्टोरिया; ६ सासून; ७ कुलाबा मिल ( मेसर्स रेमिंगटन आणि को );८ हैड्रालिक ( निकल आणि को); ९ करशेटजी कामा; १० जूट कंपनी; ११ उमरावती [मेसर्स वाल्कर्ट, बंधू, आणि कावसजी जांगिर; ] १२ मोतीराम भगुभाई; १३ गाडम आणि कंपनी; १४ होर्मसजी सखादवाला; १५ मंचाराम बाबा; १६ मालगाव; १७ महादेव हुजामजी; १८ मुकुंद सामु यांची खासगत गिरणी; १९ हिंदुस्थान; २० न्याशनल; २१ आणि युनाइटेड.

याशिवाय गुजराथेंत सुरत, भडोच आणि अमदाबाद येथें एक एक गिरणी चालू आहे.

येकंदर सर्व गिरण्या मिळून भांडवल ४३८१०००० रुपये आहे. सात लक्ष चात्या आहेत व पांचहजार माग आहेत.

याप्रमाणें २१ नवीन गिरण्या सुरू होताहेत, १३ मुळच्या आहे, व ६ आणखी होण्याची वाटाघाट चालू आहे. हें ऐकून आह्मांस फार संतोष वाटतो, पण याजबरोबरच बिच्यारी लोकांस एक भीति वाटते कीं ही गडबड वाढत वाढत सन १८६६ सालांतील शेर मार्केटाच्या धरतीवर जाईल की काय! कारण अजून कांहीं गिरण्यांची स्थापनाही नाहीं तोंच यांचे शेराची किंमत वाढत चालली आहे कोणा कोणा गिरण्याच्या हजार रुपयांच्या शेराला तेरा चवदा शे रुपये पडूं लागले आहेत. ही धांदल काय व बिच्या पोरी कांहीं किंमिष आहे कीं काय? तें समजले पाहिजे व त्याचा बंदोबस्त झाला पाहिजे; नाहींपेक्षां त्यांतील कोणी कावेबाज लोक आपलीं घरें भरतील आणि साऱ्या राष्ट्रावर आग पाखडतील; आणि मिलपतच्या कारखानेवाल्यांची पोळी पिकवितील; दयाळु ईश्वर तसा प्रसंग आमच्या गरीब हिंदुस्थानावर न आणो.

आतां या नवीन कारखाने घालणारे लोकांस आमची अशी शिफारस आहे कीं त्यांनीं सर्वांनीं एक जाडे कापडच काढित बसू नये; बारीक कापडाचे, छिटाचे, लोकरीच्या कापडाचे वगैरे तऱ्हेतऱ्हेचे प्रकार चालू करावे ह्मणजे त्यांत त्यांचा व देशाचा मोठा नफा होईल.

## वऱ्हाड.

या आठवड्यांत दोन तीन दिवस पाऊस चांगला पडला एक दिवस अंबीच इंच झाला. शेतकरी लोकांचा आतां कांहीं बोभाट नाहीं. बाहेर गांवींही पाऊस उत्तम आहे

—ooo—

येथील साहू शेट गंगाधर जोगावरमल यांस आफूचे मुकदम्यांत पुन्हा २०० रुपये दंड झाला. नुकताच १९० रुपये झाला होता. अफूच्या बाबतींत हा तिसऱ्यानें मुकदमा यांजवर आहे. अकोल्यास सावकार लोकांची नांवें निघाल्यास गंगाधर शेटचें नांव पहिल्यानें निघतें आणि त्यांची लायकी या प्रकारची! हें ऐकून लोकांस वाईट वाटतें पण त्यांचे त्यांस वाटेल तर अशा गोष्टी पुन्हां करणार नाहींत. उदमी व्यापाऱ्याला ही मोठी लाजिरवाणी गोष्ट आहे.

—ooo—

रा० रा० गोविंदराव भय्या येथील तहशीलदार यांस उमरावतीस नेमणार व उमरावतीचे मि० इनायत हुसेन यांस चिखलीस व चिखलीचे मि० अबदुलबारी यांस अकोल्यास नेमणार असें प्रमोदसिंधूंत लिहिलें आहे परंतु त्याबद्दल अजून प्रसिध्द रीतीची आफिशियल बातमी कांहीं नाहीं असें ह्मणतात.

—ooo—

रा. रा. विष्णु सखाराम बापट क्लार्क आफ धि कोर्ट यांनीं ६ दिवसांची प्रिवेटरी रजा घेतली आहे व ते उमरावतीस एकदा जाऊन आले. आतां आपले कामावर रुजू होण्याकरितां आज जातील.

—ooo—

जुडिशियल कमिशनर आफिसांतील डिपुटी क्लार्क आफ धि कोर्टची जागा ७५ रुपयांची केली आहे. तिजवर रा. रा. कृष्णाजी हरि कोल्हटकर बुलढाण्याचे डिपुटी क्लार्क यांस नेमिलें असें कळतें. कृष्णाजी हरि हुशार असून या जाग्यास योग्य आहेत व त्यांस शाळाखात्यांतून सरींच वर्षें इकडे आल्यापासून बढती मिळाली नव्हती ती मिळाली हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

—ooo—

जुडिशियल कमिशनर साहेबाची स्वारी देशाला करितां २५ वे तारखेस उमरावतीस व २७ वे तारखेस इलिचपुरास जाणार असें कळतें.

—ooo—

रेल्वे रेसिडेंट इंजिनियर मि० वार्ड साहेब यांची मुंबईस बदली झाली व त्यांचें काम पहाण्याकरितां मि० एडवर्ड साहेब रेसिडेंट इंजिनियर यांस नेमिलें आहे व ते येथें येऊन कामावर रुजू झाले.

—ooo—

मि० डनलप साहेब असिस्टंट कमिशनर यांस उमरावतीस जाण्याचा हुकूम झाला व त्याप्रमाणें त्यांणीं काल रोजीं मि. डेविस साहेबांस आपले कामाचा चार्ज दिला.

—ooo—

रा. बाळकृष्ण श्रीधर वकील जिल्हा उमरावती यांची सनद रद्द केली असें कळतें.

—ooo—

शुक्रवारीं सायंकाळीं उमरावती कडील प्यासेंजर ट्रेन अकोल्यास येत असतां बोरगावाजवळ इंजिन चालेनासें झालें. मग गाडी मागें नेऊन दुसरें इंजिन जोडून प्यासेंजर ट्रेन आणिली व त्या मुळें एक तास उशीर लागला.

—ooo—

देऊळगाव राजा येथील स्कूल मास्तर रा० रा० गंगाधर सिताराम शास्त्री यांस देऊळघाटास व देऊळघाटचे रा. गंगाधर रामचंद्र जोशी यांस देऊळघाटास नेमिलें.

—ooo—

वाशिम (मित्राकडून)तारिख १६ माहे जुलै

आर्द्रा नक्षत्रांत तर पावसाचा थेंबही पडला नाहीं; परंतु पुनर्वसु नक्षत्रांत अलिकडे ३।४ दिवसांत चांगला पाऊस पडूं लागला आहे. पावसानें पुन्हा कृपा लवकर आणि वेळेवर केल्यामुळें शेतकरी लोकांचीं मनें प्रफुल्लित झालीं आहेत. परवाचे रात्रीं तर इतका पाऊस पडला कीं, असा या पावसाळ्यांत कधींच पडला नाहीं. चोहोंकडे जलमय होऊन गेलें होतें. गावांतील रोग अद्यापि कमी झाले नाहींत; परंतु पाऊस आणखी कांहीं दिवस पडला तर रोगांस आपली बिछायत उचलणें भाग पडेल.

एथील लायब्ररीचे नांवेंवर फिर्याद झाली आहे ह्मणून मागचे पत्रीं कळविलें आहे. हल्लीं लिहिण्यास आनंद वाटतो कीं, त्या फिर्यादीचा निकाल लायब्ररी तर्फे झाला. फिर्यादी वांहरी अकोल्यास अपील करणार आहे असें समजतें. निकाल काय होईल तें पहावें. एक संकटांतून तर लायब्ररी पार पडली.

एथील दवाखान्यांत आजपावेतों एकच नेटिव डाक्टर होता, हल्लीं दोन आहेत असें समजतें. एकाचपुरतें काम इस्पितळांत असून दोन ठेवण्याचा काय हेतु असेल तो असो.

इं० मराठी शाळेपासून डेपुटी कमिशनर कचेरीपर्यंत सडक आहे. परंतु ती सडक इतकी खराब झाली आहे कीं थोडासा पाऊस पडला तर घोट्याबरोबर अथवा त्याहूनही अधिक चिखल असतो. व त्यामुळें कचेरीस जाणाऱ्या येणाऱ्या लोकांस फारच त्रास होतो. याजकडे आमचे योग्य अधिकारी लक्ष पुरवितील काय? परवाचे रात्रीं जो पाऊस पडला त्यानें तर कित्येक ठिकाणीं अर्धे सडकेवरील माती पाण्याबरोबर वाहून जाऊन मोठमोठाले खळगे पडून रस्ता अगदी अकुंचित झाला आहे.

पोस्टाकडील व्यवस्थेकडे अलीकडे तिकडील अधिकाऱ्यांचें बरेच लक्ष पोहोचलाचें दिसतें ही मोठी आनंदाची गोष्ट आहे वाशिम जिल्ह्यांत नुकतेच नवीन दोन पोस्ट आफिसें एक अनसिंग येथें व दुसरें उमरखेड येथें बसविलीं आहेत. अनसिंग हा गाव मोठा नसून येथें पोस्ट आफिस कां ठेविलें हें समजत नाहीं. यापेक्षां तेंच पोष्टआफिस मंगरूळ पीर येथें असतें तर फार चांगलें होतें. मंगरूळ पीर हा गाव मोठा असून बरीच व्यापाराचीही जागा आहे. तेव्हां या ठिकाणीं पोष्टआफिस ठेवल्यापासून सरकारास बराच नफा होऊन लोकांसही बरेच सोयवार होणार आहे. मंगरूळ पीरपासून सुमारें १० कोस पर्यंत कोठेंच पोष्ट आफिस नाहीं.

येथील म्युनिसिपाल कमिटीनें लोकांवर बसविलेले पट्टीविषयींही मोठा गवगवा आहे. अकोल्यास झाल्याप्रमाणें येथील सरकारी नोकरावरील पट्टी कां माफ होऊ नये कांहीं समजत नाहीं. म्युनिसिपाल कमिटीचे कराचा बोज्या मुळींच नाहींसा होईल तर फार लोकांवर सरकारचे उपकार होतील.

येथें ७ वे तारखेस आग लागून एक घर जळालें. आग विझल्यानंतर पोलिसचे लोक बरेच जमले होते.

येथील शाळेजवळ खेळण्याची जागा आहे तेथें तालिमखाना होण्याविषयीं वाटाघाट चालली आहे.; खेळाचें सामान वर्गणीनें जमा करणार.

गोमुखी स्वामी येथें आले आहेत १९ दिवस झाले पुड्यांचा सपाटा चालू आहे. त्यांनीं येथें मठाकरितां जागा तयार केली आहे.

बरसातींत लायब्ररींत सभा भरणार होती परंतु अजून भरत नाहीं.

## वर्तमानसार

रा. बा. गोपाळराव हरि देशमुख यांचे चिरंजीव रा. रा. रामचंद्र गोपाळ एल एल बी यांनीं हाय कोर्टांत वकिली करण्याची सनद घेतली. यांचे एक बंधु रा. रा. कृष्णराव गोपाळ बारिस्टर आहेत.

सुरतेस बडोदे सरकारचे दुकान आहे तेथील मुनिमानें ७ लक्ष रुपये चोरले. याला पकडलें आहे. हें दुकान नवीन राणी लक्ष्मीबाई यांच्या नावानें चालू आहे.

निजाम सरकार या महिन्यांतल्या शेवटल्या शनिवारीं हैद्राबाद शहर पहाण्याकरितां बाहेर निघणार आहेत. समारंभ मोठा होईल.

हैदराबादचे दिवाण सर सालरजंग हे रेसिडेंट साहेबासहित कागनी नदीच्या पुलावरून आगगाडी चालविण्याची शुरुवात करण्याकरितां १९ वे तारखेस जाणार होते ही नदी हैदराबाद रेल्वेच्या मध्यावर आहे.

“होमन्युस” वरून असें समजतें कीं, आलिकडेस बाबू प्रतापचंद्र मुजूमदार या ब्राह्मधर्मोपदेशक साधूनें लंडन एथील सेन्ट मार्जच्या हॉलमध्यें ब्राह्मधर्मावर इंग्लिशभाषेमध्यें व्याख्यानें देऊन उपदेश करण्याचा क्रम चालविला आहे. यांनीं ता० ३१ मे रोजीं क्रोइन फ्री ख्रिश्चियन चर्च नामक मंदिरांत एक रसभरित व्याख्यान दिलें,

रे. नारायण शेषाद्री यानीं आपल्या युरोप व अमेरिका येथील प्रवासाच्या संबधानें मुंबईंत गेल्या गुरुवारीं लेकचर दिले.

बुधवारच्या टाइम्समध्यें कापडाच्या गिरण्याविषयींची माहिती लिहिली आहे तिजवरून कळतें कीं मुंबईस व नजीक मिळून १३ गिरण्या आहेत. व नवीन १७ होण्याची तयारी झाली आहे. व आणखी सहा होण्याची घाडाघाट आहे. यांतील कित्येकांच्या मालकाची व शेराची आणि भांडवलाची वगैरेही माहिती त्यांत लिहिली आहे.

मतबंदीचे नवीन ठराव— आमच्या मुंबई सरकारानें पुणे व सोलापूर जिल्ह्यापैकीं काहीं तालुक्यांतील गावांच्या मतबंदीच्या दरांचा पुनः नवा ठराव करून तो हवेली, शिरूर व करमाळें या तालुक्यांतील गावांत तीस, मावळांतील गावांत दहा, खेड तालुक्यांतील गावांस मऊ, व जुन्नरपैकीं गावांत सात वर्षें मुकरर केलेला जाईल म्हणून गेल्या सरकारी ग्याझेटांत करार प्रसिद्ध केला आहे.

सर्व प्रकारच्या मतांचे एतद्देशीय व परदेशीय ख्रिस्ती लोक या हिंदुस्थानांत सुमारें १७,२९,३११ आहेत. व बाकीचे लोक ह्मणजे यहुदी सुमारें ८,०००; पारशी ७०,०००; मुसलमानांची संख्या ४,०८,६६,०३४ आहे. जातीविरहित असे रानटी लोक १,४२,१८,१९८; बौद्ध व जैन २६,३०,०००; शीक १२,९०,०००; व हिंदु सर्वांपेक्षां जास्त ह्मणजे सुमारें तेरा कोटि आहेत. या नवीन खानेसुमारींत एतद्देशीय गाडीलोक संस्थानांतील लोकांची गणती धरली नाहीं.

महाराणी विक्टोरियाची धाकटी मुलगी बीआट्रिस हिजबरोबर लग्न करण्याविषयीं तिघे तरुण उमेदवार राजपुत्र तयार आहेत. एक माजी फ्रान्स देशाचा बादशहा नेपोलियन याचा पुत्र, दुसरा रशियाच्या झाराचा धाकटा मुलगा व तिसरा प्रिन्स आफ मेक्लनबर्ग स्ट्रॅलिझ. या तिसऱ्याशीं राणीचें आप्तिकाचें नातें आहे.

सु. प.

वेळू चहूंकडे असल्यामुळें त्याचा उपयोग या जगांत कितपत आहे हे लिहिणें नको. हिंदुस्थान, चीन व इतर प्रदेशांतील गोरगरीब प्रत लोकांचीं घरें बहुतकरून याचींच असतात. व आणखी याचे उपयोग पुष्कळ आहेत, तथापि हल्लीं याचा नवीन शोधून काढलेला उपयोग असा आहे कीं, याचे तुकडे वर्तुळाकाति करवतानें कापून ते तळास नाकेची नळी असणाऱ्या एका पिपांत घालतात, व नंतर थंड पाणी व कास्टिक सोडा वेळूच्या तुकड्यांच्या मानाप्रमाणें त्यांत घालून या दोहोंच्या योगानें च्यार पांच दिवस ते शिजवितात. पुढें कढलेलें सर्व पाणी काढून टाकून गोड पाणी आंत घालून आणखी च्यार पांच दिवस कढवितात. हा क्रम त्या वेळूंतील कास्टिक सोड्याचा सर्व अंश नाहींसा होईपर्यंत सुरू ठेवून नंतर वेळू दाबण्याचे यंत्राखालीं दाबणें वगैरे असीं काहीं कामें केल्यावर त्यापासून उत्पन्न झालेले तंतु रंगऊन कापसांत, लोकरींत व रेशमांत सामील करून याचे कपडे तयार होतात.

अयोध्येच्या बादशहाची पत्नी मुलकजहान हीस वर्षाला ९०००० रुपये पेनशन होते तें सरकारानें बंद केलें, ह्मणून सदहू बाई सेक्रेटरी आफस्टेट यांजकडे अपील करणार आहे.

काठेवाडांत हालार परगण्यांत ९ मनुष्यें वीज पडून मरण पावलीं.

कलकत्त्यास लाख तयार करण्याचे कारखाने आहेत. सन १८७१–७२ सालीं १७२८८४ रुपये किमतीची ११६६४ मण लाख परमुलखीं गेली होती. सन १८७२–७३ सालीं २९६३१७ रुपये किमतीची १९३९४ मण लाख गेली.

मि० रुस्तमजी पेस्तनजी जिजीभाई या नांवाचे पारशी गृहस्थ काहीं दिवसांपूर्वी पंजाबांतील काहीं कामाचे संबंधानें पार्लमेंट सभेस अर्ज करण्याकरितां तेथून विलायतेस गेले होते. तेथें गेल्यावर त्यांणीं एका युरोपियन बायकोशीं लग्न लाविलें व तिला घेऊन निजाम सरकाराचे राज्यांत आले. तेथें त्यास मोठा हुद्दा मिळून त्या युरोपियन बायकोपासून काहीं मुलें झालीं व काहीं दिवसांनीं ही युरोपियन बायको वारल्यानंतर पुनः विलायतेस जाऊन तिच्या बहिणीशीं स्विट्झर्लंडांत लग्न लाऊन पुनः हिंदुस्थानांत परत आले व हल्लीं ते नवीन कुटुंबासह निजाम सरकारचे राज्यांत आहेत. या गृहस्थाची सदरहु दोन लग्नें होण्यापूर्वीं लग्न झालें असून पारशी ज्ञातींतील त्यांची बायको व काहीं मुलें मुंबईस आहेत त्यांस ही हकीकत कळल्यावरून त्यांचे मुखत्यार मि० फ्रामजी रुस्तमजी जिजीभाई मुंबई हायकोर्टाचे बारिस्टर हे सदरील झालेलीं लग्नें रद्द करण्याकरितां विलायतेस गेले आहेत.

**लोहचुंबकाची गुहा**—या गुहेबद्दल "सतमकीक इंडिपेंडंट" नांवाच्या क्यालिफोर्नियाच्या पत्रांत अशी हकीकत लिहिली आहे कीं, काहीं मनुष्यें त्या प्रांतांतील एका गुहेमधून जात असतां अजमासें सवा मैल चालून गेल्यावर ते एका लांबट व अरुंद कोठडीसारिख्या जागेंत आले. तिच्या भिंती पिवळट भुरक्या रंगाच्या होत्या. या जागेंत शिरण्या बरोबर त्यांच्याजवळील होकयाचा कांटा कसा फिरतो आहे हे दिसेना. मानेपासून नखांपर्यंत सर्वांस थंडगार भासूं लागलें, व कांहीं पुढें गेल्यावर त्यांचे शरीरास चमत्कारिक तऱ्हेचा भास होऊं लागला तो त्यांस सहन होईना. इतकेही सहन करून ते जसजसे पुढे जाऊं लागले तसतशी त्या कोठडीच्या भिंतीची आकर्षणशक्ति अधिकाधिक होऊं लागली; व ती इतकी झाली कीं त्या पैकीं एका जवळ चांकस होतें तें लोहचुंबकाच्या खडकानें घेतलें. तें खडकास इतकें चिकटलें कीं च्यार आसामिनी ओढीलें तरीं सुटेना. एकाच्या खिशांतला चाकू जोरानें खालीं जाऊन तळास चिकटला. त्या मनुष्यां पैकीं कोणाच्यानें ही तो काढवला नाहीं व शेवटीं त्यांस तो तेथेंच टाकून जावें लागलें. दुसऱ्या एकाच्या पायांत खालींत घालून जाण्याचा बूट होता व त्यास सभोंवार तळास खिळे मारलेले होते त्यामुळें तो जमीनीस एकदम चिकटून बसला. ज्याच्या पायांत बूट होता त्यानें होईल तितका जोर केला तरी त्यास पाय वर उचलतां येईना. शेवटीं त्यास बुटांतून पाय काढून घ्यावे लागले. याप्रमाणें होऊं लागले व पुढें गेले असतां भलतेंच कांहीं होईल अशी भीति वाटून तीं मनुष्यें पुढें न जातां परतून गुहे बाहेर निघालीं.

आस्ट्रिया आणि प्रशिया यांचे बादशहा येते उन्हाळ्यांत भेटणार आहेत असे पक्के आधारावरून समजतें.

ट्रावनकोरचे युवराजानीं 'हिंदु लोकांच्या रीति भाती' या विषयावर ट्रिव्हेंड्रम डिबेटिंग सोसायटींत फारच सुरस व्याख्यान दिलें. युवराजाचे विचार त्या सभेंतील सभासदांनीं फारच पसंत केले.

फ्रान्स— प्रशिया व फ्रान्स यांची सन १८७४ सालीं जी लढाई झाली ती संपल्यावर, पारिस शहरीं कम्युनिस्ट लोकांनीं बंड केलें व आपसांत कांहीं दिवस लढाई होऊन बंड मोडल्यावर, फ्रान्सदेशांत हल्लीं ही राज्यव्यवस्था सुरू आहे ती स्थापन झाली. त्यानंतर आजपर्यंत बरेच दिवस लोटले परंतु अजून राज्यव्यवस्था कोणत्या तरी एका पथास लागत नाहीं. सदरहू लढाई होण्यापूर्वीं फ्रान्स देशांत बादशाही होती व हल्लीं प्रजासत्ताक राज्य स्थापन झालें आहे परंतु तें किती दिवस राहील हें सांगवत नाहीं. या देशांत दोन तीन पक्षांचे लोक आहेत. कित्येकांचे मत असें आहे कीं, हल्लीं स्थापन झालेलें प्रजासत्ताकराज्य कायम करावें. कित्येकांचें मत आहे कीं, माजी नेपोलियन बादशहाच्या मुलास गादीवर बसवून प्रजासत्ताक राज्य मोडून टाकावें. कित्येकांच्या मतें फ्रान्सच्या जुन्या राजघराण्यांतील वंशास राज्यपद द्यावें. याप्रमाणें आपसांतच मतभेद असल्यामुळें, व निरनिराळ्या पक्षांचे लोक आपला हेतु सिद्धीस जाण्याकरितां अनेक प्रकारच्या उलाढाली करीत असल्यामुळें, अजून कोणच्या तरी एका प्रकारच्या बळकट राज्याची स्थापना झाली नसून पुढें लवकर होईल असेंही चिन्ह दिसत नाहीं. लढाई आटपून कम्युनिस्ट लोकांचें बंड मोडल्या नंतर एम. थायर्स नावाच्या गृहस्थास प्रजासत्ताक राज्याचे अध्यक्ष नेमले होते. याच्या हातीं राज्याधिकार असतां त्यांनीं, आपल्या बुद्धिचातुर्याच्या व शाहाणपणाच्या बळानें, २०० कोटि रुपये, प्रशियाच्या लढाई बद्दलची खंडणी तीन वर्षांच्या आंत देऊन टाकली परंतु कांहीं महिन्यांपूर्वीं यांस काढून, त्यांच्या जागीं मार्शल मेकमोहन यांस अध्यक्ष नेमलें. हे गृहस्थ मिलिटरी असून त्यांनीं अध्यक्षाचें काम ७ वर्षें करावें, असा, फ्रान्सच्या पार्लमेंट सभेनें ठराव केला होता परंतु तारीख ८ माहे गजकूरच्या तारेवरून असें कळतें कीं, हा ठराव सभेनें फिरविल्यामुळें, मार्शल मेकमोहन, यांनीं पहिल्या ठरावाप्रमाणें, आणखी सात वर्षें काम करणार असे, पार्लमेंट सभेस सांगून पाठविलें. सर्व अधिकार व फौज मेकमोहन यांच्या हातीं आहे व कायदे करण्याचे व कर बसविण्याचें काम सभेचें आहे. तेव्हां, इंग्लंडांत क्रामवेल साहेबानें फौजेच्या साह्यानें, ज्याप्रमाणें, राज्याधिकार आपल्या हातीं घेतल्यामुळें आपसांत लढाई लागली होती त्याप्रमाणें फ्रान्स देशांतही होण्याचें लक्षण दिसत आहे. असें झालें असतां फ्रान्स देशाच्या शत्रूंस बहुत आनंद होईल यांत संशय नाहीं. परंतु जोंपर्यंत, फ्रान्स देशांत कोणच्या तरी प्रकारच्या बळकट अमलाची स्थापना होत नाहीं तोंपर्यंत, युरोपांत स्वस्थता राहणें कठीण ह्मणून, फ्रान्सच्या स्थितीकडे सर्वांचें लक्ष लागलें आहे.

इंग्लंड व रशिया— युरोपखंडांतील सुधारलेल्या लोकांचे बाहेर गौर असतें परंतु अंतर्याम किती कृष्ण असतें त्याचें चित्र जर्मनींतील एका वर्तमान पत्रानें दोन देशच्या राजांविषयीं छापलें आहे तथापि तें सर्वत्र लागू आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. या लोकांचा अनुभव असा आहे कीं, शद्बपांडित्यांत कमीपणा नसतो परंतु एकमेकांचे कंठच्छेद करण्याचे आंतील नेत वेगळेच असतात. हल्लीं युरोपांत सर्वत्र स्वस्थता आहे व प्रत्येक देशाचा राजा, दुसऱ्या राजाचा परम स्नेही ह्मणवितो, व स्वस्थता राखण्याचा आमचा निश्चय आहे असें ह्मणतो, तथापि युद्धाच्या तयारींत, व जास आपण परमस्नेही ह्मणवितो त्याचा प्रसंगीं घात करण्याच्या राजकीय कसबांत व एकदां दिलेलीं वचनें मोडण्याचीं पुढील धोरणे बांधण्यांत यत्किंचितही कमीपणा नसतो. रशिया व इंग्लंड यांचा हल्लीं कोणच्या प्रकारचा संबंध आहे हें वाचकांच्या लक्षांत असेल. फ्रेंच व इंग्लंडानें, क्रिमियाची लढाई करून जो तह करून घेतला होता तो, फ्रेंच व प्रशियाच्या माजी लढाईच्या अखेरीस, इंग्लंडच्यानें कांहींएक व्हावयाचे नाहीं अशी संधी पाहून, रशियानें कारणावांचून मोडिला. मध्य एशियांतील खिवाच्या खानास योग्य शिक्षा मात्र करूं, परंतु त्याचा मुलुख घेणार नाहीं असें रशियानें वचन दिलें असतां, तें त्या देशच्या बादशाहानें अखेरीस राखलें नाहीं. याप्रकारचा हल्लीं इंग्लंड व रशियाचा संबंध आहे. इंग्लंड स्वतः समर्थ असतें व त्यास मदत मिळण्याचा संभव असता तर सदरहु दोन कारणावरून रशियाबरोबर लढाई झाल्या खेरीज राहिली नसती. परंतु या सर्व गोष्टी पोटांत घालून, इंग्लंड व रशिया या राजकुळांचा विवाह संबंध झाला इतकेंच नाहीं परंतु रशियाचे बादशाहा थोड्या दिवसांपूर्वीं विलायतेस गेले होते तेव्हां त्यांचे आगतस्वागत इंग्रज लोकांनीं चांगले केलें. याप्रकारची इंग्लंड व रशियाची आंतील व बाहेरील स्थिति वेगळ्या प्रकारची आहे, हें दाखविण्याकरितां सदरहु पत्रानें चित्र काढलें आहे तें असें. इंग्लंडचें राजचिन्ह सिंह असून रशियाचें अस्वल आहे. शरीर सिंहाचें व तोंड विक्टोरिया राणीचें काढून अस्वलाच्या शरीरावर, रशियाच्या बादशाहाचा चेहरा काढला असून हीं एकमेकांस, युरोपांत आलिंगन देतात व एशिया खंडांत एकमेकाचा प्राण घेतात असें खालीं लिहिलें आहे याप्रमाणे इंग्लंड व रशियाची मार्मिक थट्टा केली आहे, परंतु हें मर्म युरोपांतील सर्व राजवाड्यांस लागू आहे असें चित्त काढणाराच्या लक्षांत असावें.

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केलें.

REGISTERD NO 7,1874'

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ८ अकोला, रविवार ता० २६ माहे जुलै सन १८७४ इ० अंक ३०

## जाहिरात

### वऱ्हाडसमाचाराचीकिंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साळअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| "अखेर | २ |

### नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्रजी लिपींत दर ओळीस | ०४ |
| "दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

आह्मी खालीं सही करणार सर्व लो कांस विनयपूर्वक कळवितों कीं, आह्मी हल्लीं उमरावतीहून इकडे येऊन वकिलीचें काम सुरू केलें आहे. ज्या कोणाची आह्मास काम देण्याची मर्जी असेल त्यांणीं आह्मास रा. रा. खंडेराव बाळाजी फडके वऱ्हाडसमाचाराचे मालक यांचे घरीं येऊन भेटावें.

मुक्काम अकोलें तारीख २ जुलई सन १८७४ } सदाशिव नारायण वकील प्रांत वऱ्हाड.

## नोटिस.

नोटिस—हरजिवनदास जगजिवनदास मुनीम निसबत कादरभाई महमदअल्ली साहू दुकान अकोलें यांस राव जगदेव राजे मानसिंगराव जाधव जमीदार अज्ञान पालन करणार मातोश्री राणी अहिल्याबाई जाधव जमीदार सरकार दौलताबाद वगैरे महालांत मुक्काम औरंगाबाद यांजकडून—आपण वऱ्हाडसमाचार तारिख ५ माहे जुलै सन १८७४ चे २७ व्या अंकांत आह्मास नोटिस दिली तिचें उत्तर:—

तुह्मास संस्थानचे कामीं नेमल्या बद्दल करार तुमचे व आमचे दरम्यान होऊन संस्थानचा कांहीं माल तुमचे कबज्यांत देऊन वहिवाटही तुह्मास दिली असतां तुह्मी कोणतेही प्रकारें संस्थानचें नौकरलोक व साहू वगैरेचे देण्याचा बंदोबस्त न केल्यामुळें पुढें तुह्माकडोन संस्थानचें काम चैत्र अखेरचे पूर्वी काढून त्या कामावर दुसरे इसमाची नेमणूक केली आहे. याजमुळें आतां करारनामा रजिस्टर करून देण्याचें कारण आह्मास मुळींच राहिलें नाहीं.

तुमचे पूर्वीचें जें कर्ज आमचेकडे हिशोबाअन्वये निघेल ते तुह्मास संस्थानच्या कामीं नेमिल्यापासून तों दूर केले तारखेपावेतों जे संस्थानांत तुमचेकडून नौकर असतील त्याचा पगार व त्याप्रमाणें खर्च असा एकंदर हिशोबाअन्वये तुमचे आमचे रुजूनें जो पैसा निघेल तो आह्मी देण्यास कबूल आहोत.

संस्थानाचे जवाहिरांपैकीं दागिन्याची पेटीही तुमच्या ताब्यांत मुळींच दिली नव्हती मग आपण आमचे ताब्यांत असतां माल जप्त झालेला तुह्मी परभारा खुदावंत डिपुटी कमिशनर साहेब बहादूर यांचे मार्फतीनें घेतला असोन लिहितां हें कशावरून तें समजत नाहीं. पूर्वीपासून दागिन्यांची पेटी आमचे ताब्यांत रहात असून त्याजवर मोहोरा वगैरे आमच्या असतात. त्याप्रमाणें जप्तीसमयीं होत्या, यास्तव त्या मालाबद्दल आपणास विचार करण्याचें कारण नाहीं.

संस्थानचा व देण्याघेण्याचा बखेडा न तोडल्यामुळें पूर्वी काम आपणाकडील काढून या पूर्वी आपणास आठ दिवसांचे मुदतीचा हुकूम असून त्याप्रमाणें वर्तणूक न झाल्यामुळें संस्थानचें काम आपले कडोन काढिलें यामुळें आह्मी नुकसानीचा पैसा देण्याचे जबाबदार नाहींत.

ही नोटिस पोंचल्यापासून एक महिन्याचे आंत आपले हिशेब वगैरे देऊळगाव मुक्कामीं समजाऊन देऊन आपले पैशाचा निकाल करून घ्यावा. दरम्यान आपण फिर्याद केल्यास त्याचा खर्च आपणास सोसावा लागेल आह्मी बिलकूल देणार नाहीं.

तारीख १६ माहे जुलै सन १८७४ इ.

(सही) राव जगदेव राजे मानसिंग राव जाधव अज्ञान पालन करणार मातोश्री राणी अहिल्याबाई जाधव

## पत्रव्यवहार

या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

तारीख १४ माहे जुलै सन १८७४ इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० ह्या पंधरवाड्यांत पाऊस अगदींच नव्हता परंतु अलीकडे चार दिवसांत चांगल्या रीतीनें वृष्टी होत आहे. तेणेंकरून सर्व लोक मोठ्या आनंदानींत आहेत.

तारीख ६ माहे मजकूर रोजीं म्युनिसिपालिटीची म्यानेजिंग कमिटी भरली होती तींत राघोपंत कमिटीचे कारकून यानीं आपल्या मुखत्यारीनें कांहीं कामें केल्याबद्दल व वहिमी वर्तणुकीबद्दल तीन चार्ज ठेऊन येथील सिव्हील सरजन व्हाईट साहेब यांनीं येऊन त्या पैकीं एक शाबीत केला व साहेब मजकूर यानीं सदहू कारकून यास एकदम कामांतून काढून टाकावे ह्मणून मत दिलें परंतु कमिटींतील इतर सभासदांचे तसें मत नसल्यामुळे सदहू मनुष्यास क्षमा मिळाली. अशाच प्रकरणावरून मागें एक दोन वेळा यास सक्तीचे हुकूम मिळाले होते व कांहीं दिवस पगारही कमी केला होता परंतु कमिटीनें तोही पुढें माफ केला याप्रमाणें त्यास किती वेळा माफी होईल कोण जाणें.

मागें वाशिमचे एक पत्र स्वच्छता नसल्याबद्दलचें वऱ्हाडसमाचारांत प्रसिद्ध झालें होतें व तें पत्र येथें येऊन पावल्या बरोबर गोप्या मुरलीधरापासून जुन्या बालाजी पर्यंत रस्ते व बोळ सफा झाले आहेत. परंतु बाकी पुष्कळ ठिकाणीं अस्वच्छता आहे तिकडे जर कमिटीचे सेक्रेटरी लक्ष पुरवितील तर बरें होईल?

हल्लीं पोट दुखणें व ढाळ होणें या प्रकारचे पुष्कळ रोग उत्पन्न झाले आहेत. तेणेंकरून गावांतील लोक मोठे दुःखी आहेत. डाक्तर लोकांच्यानीं या रोगाचें मुळींच शांतवन करवत नाहीं.

हल्लीं धारण येथें बरीच स्वस्थ आहे.

लिहू इच्छिणारा
एक वाशिमकर

## मनुष्यमात्रास अवश्यक दोन बंधू

रा० रा० वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि० वि० खालील मजकूर कृपाकरून प्रसिद्ध करावा.

एखादा मनुष्य कोणाचेंही साह्य घेतल्या वाचून हरएक काम करील तर त्याचें बिलकुल चालावयाचेंच नाहीं. या कारणानें प्रत्येक मनुष्यांस कोणाचें तरी साह्य आहेच.

हल्लींच्या मानानें कोणास भाऊ, कोणास दादा, इत्यादि नातें लाऊन आलेला प्रसंग टाळावा लागतो. त्यांत आपल्या कळकळीची नातलगांतलीं माणसें अशा वेळेस संकटसमयीं ह्मणा अथवा हरएक कामांत उपयोगीं पडतात.

परमात्म्यानें आह्मा दोघां बांधवांस उत्पन्न करून प्रत्येक प्राण्याच्या तसेंच जीव, जंतु, श्वापदे यांच्या हरवखत उपयोगी पडावें ह्मणून आह्मा केलें त्या आज्ञे प्रमाणें आह्मी उभयतां वारंवार झटत असतो.

परमात्मा दयाळूच पहा, त्यानें आमच्या तैनातीस दोन दोन दासी देऊन त्यास आमचें सर्व काम सोपून दिलें आहे आमच्या गृहसंबंधी केरकचरा काढण्याविषयीं व आह्मास केरकचरा यापासून त्रास न होण्याविषयीं कृपाघन असा, जो जगन्नाथ त्यानें नेमलेल्या दोन दासी वारंवार जपत असतात; त्यापैकीं सदोदित आह्मा दोघा बंधूंस चिकटून रहाणारी आणि जिच्या नांवाचा अंत "णी" हा आहे अशी दासी आमच्या फारच उपयोगी आहे, एखादे वेळेस भय प्राप्त झालें असतां आह्मा दोघां बांधवांस ज्याच्या त्याच्या ताब्यांत असलेली दासी आवरण घालिते यामुळें आमचे भय कमी होऊन आह्मी त्या दासीस नेहमीं शाबासकी देतों.

वर सांगितलेली दासी आमची निजण्याची वेळ झाली ह्मणजे आह्मास ह्मणते कीं, महाराज, चलावें निद्रेचा समय प्राप्त झाला आहे. कदाचित तिच्या ह्मणण्या प्रमाणें आह्मी न चाललों तरी पण बसले त्या ठिकाणींच ती आह्मास सुख देण्यास तयार होते.

आह्मी ज्या ज्या वेळीं ह्मणजे रात्रीं अगर दिवसा निजलों ह्मणजे ती आह्मास ऊन, वारा, केर, कचरा, ह्याचा त्रास न व्हावा ह्मणून आपण स्वतः आवरण घालिते.

अशा प्रकारची, रात्रंदिवस आमच्या हिताकडे दृष्टी देणारी व झटणारी दासी आह्मी उभयतां बंधूनीं जवळ ठेविली आहे अस्तु. पञ्चमत प्राणी मात्रास जीं जीं कामें होतात तीं तीं आमच्या साह्या वाचून कदापिही व्हावयाचीं नाहींत.

किंबहुना कमनशिबानें ज्या ज्या मनुष्याचेठायीं आह्मा दोघांही बंधूचें बळ नाहीं तीं मनुष्यें जगांत ज्या ज्या विवेकी वस्तु निर्माण केल्या आहेत त्या वस्तुस मुकून जगांत आल्या न आल्या सारखींच झालीं !!! यावरून आह्मी उभयतां बंधू नसतो तर प्राणीमात्रांचे कशाप्रकारचे चाललें याचा विचार वाचकांवर करण्याचें सोपवितो.

व्यवहारसंबंधी हरएक कृत्य आह्मा उभयतां बंधुतून एकाच्या तरी साह्यावाचून घडतेंच. दयाळू परमेश्वरानें आह्मास उत्पन्न केलें नसतें तर त्यानें ज्या हेतूनें हें विश्व उत्पन्न केलें, तो त्याचा हेतु सिध्दीस जाता ना.

प्रिय बंधुवर्गांनो, ज्या आह्मापासून तुह्मास इतका उपयोग आहे कीं, आमच्या वाचून तुमचें एकक्षणभरही चालवयाचें नाहीं, आह्मी उभयतां बंधु अगदी शेजारीं असतांही आह्मा परस्परांची भेट होत नाहीं आह्मा उभयतामध्यें एक लहानशी भिंत आडवी आल्यानें परस्पर भेटीचा योग घडणें ही महत दुर्घट गोष्ट आहे. भेटीकरितां मध्यंतरीं आडवी आलेली भिंत पाडावी तर तसली भिंत पुन्हा न बनून घर विद्रूप दिसणार; यामुळें आमच्या मनांत असलेली भेटीची आशा निष्फळ होते, तथापि जनहिताविषयीं उचललेला विडा ग्रहण करून असलेलें दुःख एकीकडे ठेऊन बंधुवर्गांस विनंतीनें सुचवितो कीं, कितीही संकट आलें तरी परकेपणानीं एकमेकांनीं एकमेकांचें साह्य करावें यांत देशाचें हित, लौकिक, कां होणार नाहीं! होईलच होईल मग मागे कां सरता!

मिती अधिक आषाढ वद्य १४ रविवार १७९६ पिंपळनेर जिल्हा खानदेश.

आपला
देश हितेच्छु

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. आपणा कडेस खालीं लि

हिलेल्या चार ओळी पाठविल्या आहेत त्या येत्या अंकीं छापून प्रसिध्द कराल या आशेनें लिहित आहे.

महाराज हा वऱ्हाडप्रांत मुलूक अमानी ह्मणविला जातो व ह्या प्रांतांतील जी जमा उत्पन्न होते त्यांत खर्च वजा होऊन बाकीची शिलक निज्याम सरकारास मिळत असते. आतां ह्या प्रांतांतील पहाडपट्टीचे जंगलांतील फळफळावळ व शिंदीच्या पनोळ्या व टोपाल्य जे गरीब लोक विकण्यास आणतात त्यांजपासून कर घेण्याविषयीं इंग्रेज सरकारानीं नियम काढला आहे व त्याप्रमाणें अमल चालू झाला आहे ह्यापासून गरीब रयत लोकांस किती त्रास सोसावा लागतो ते आपणास लिहून कळविण्यास अति दुःख वाटतें. ज्या लोकांस केवळ शिंदीच्या टोपल्या किंवा चटया विकून आपला निर्वाह करणारे गरीब कैकाडी वगैरे लोक यांजला वास्तवीक त्या प्रत्येक टोपल्याची किंमत पाव आणा किंवा अर्धा आणा मिळते. तस्मात अशा हलक्या मालावर सरकारानें कर घेणें किती अश्लाघ्य हें विचारांअंतीं कळेल. महाराज, मी असा प्रकार पाहिला कीं एका इसमानें जंगलांतील फळांपैकीं जांभळें विकण्यास आणिलीं, याजबद्दलचा कर न दिल्यामुळे त्याजवर व टोपल्या व चटया विकणारे लोकानीं कर न दिल्यमुळें त्याजवर फौजदारी होऊन दंड झाले आहेत तेव्हां सरकारानीं किती अडचण रयतेवर केली आहे. वास्तवीक पाहिलें असतां ज्या वस्तूचा उपयोग सरकारामें मक्त्याने वगैरे देऊन किमतींत आणला नाहीं व ज्याची किंमतही मानिता येत नाहीं तशी वस्तु नाशास पावली तर त्याबद्दल सरकारास कांहींच वाईट वाटत नाहीं परंतु रयतेने जर आपल्या पोटासाठीं त्या वस्तूचा उपयोग केला तर मात्र गुन्हेगार होतो. अशा वस्तूवरील कर माफ केल्यापासून इंग्रेज सरकारास नुकसानी नसून जी शिलक निजाम सरकारास द्यावी लागते त्या रकमेतही ह्या शुष्क बाबेपासून कांहीं तोटा येईल असें नाहीं या साठीं महाराज, आपण हा मजकूर मेहेरबान नै भाडे साहेब बहादूर रेव्हिन्यु कमिशनर यांचे कानावर घालून रयत लोकांवरील जुलमी कर फारेष्ट खात्याकडील आहे तो रद्द होण्याची तजवीज करवाल तर रयतेवर मोठा उपकार होईल.

मुक्काम हिवरखेड तारीख १९ जुलई सन १८७४

दुःख पाहाणारा क्ष.

# वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध १२ शके १७९६

## कापडाच्या गिरण्यांच्या मालकांस सूचना.

प्रयत्नानें लोककल्याणार्थ जरी एखादि गोष्ट पुढें येते तरी तिच्या मार्गे अडचणी जोडा चढऊन असतातच हें पाहून अंतःकरण किंचित व्यग्र होतें.

हल्लीं १३ गिरण्या मुंबईकडे चालू आहेत. व पंचावीसाहून अधिक नवीन होणार आहेत असें खालील एकंदर तपशिलाच्या यादीवरून वाचकांस दिसून येईल परंतु आतांच आह्मांस असें समजलें आहे कीं इकडील ह्मणजे या देशांतील गिरण्या फक्त जाडे सूत व जाडें कापड काढितात व त्याचा फार खप होत नाहीं त्यामुळें दहा पंधरा हजार जाड्या कापडाचे व सुताचे बोजे मुंबईच्या बाजारात शिलक पडले आहेत त्यांस कोणी गिराईक नाहीं. ही गोष्ट खरी असेल तर आणखी पंचवीस गिरण्या उत्पन्न होऊन तेच जाडे सूत व जाडें कापड त्या काढतील तर त्यांची निभावणी कशी लागेल व त्यांचा माल कोण घेईल? हें उघड दिसतें. सबब त्यांनीं या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे, हें योग्य दिसतें. कोट्यावधि रुपये या कामांत घालावयाचे आहेत व ते फसले असतां केवळ त्यांच्या मालकाचाच तोटा होईल असें नाहीं साऱ्या देशाचा त्यापासून तोटा होणार आहे. व परदेशांतील व्यापारी येऊन अधिक छातीवर बसणार आहेत मग तें दुःख अनिवार व चिरकालिक होईल. यास्तव आम्ही नव्या गिरण्यांचे मालकास विनंती करितो कीं, त्यांनीं जुन्या गिरण्याप्रमाणेच जाडें सूत व जाडें कापड काढण्याचा विचार सोडून द्यावा. आणि बारीक तऱ्हेतऱ्हेचें कापड, धुवट कापड, लोकरीचें कापड, परोपरीचीं छिटें हीं नव्या गिरण्यांतून निघतील अशी तजवीज करावी. आतां त्यांस येणेंकरून खर्च अधिक लागेल व कदाचित जिकीर ज्यास्त पडेल असें असल्यास दोन दोन कंपन्यांचें भांडवल एकत्र करावें म्हणजे, २५ चे ठिकाणीं दहा बारा जरी गिरण्या झाल्या आणि त्यांत सदरीं सांगितल्याप्रमाणें तऱ्हेतऱ्हेचा माल निघू लागला तर त्या गिरण्या त्यांच्या मालकास व देशास अधिक श्रेयस्कर होतील सबब ही गोष्ट झाली पाहिजे असें आह्मी सोत्कंठ इच्छितो व मुंबईचे नामांकित पत्रकर्तेही या गोष्टीविषयीं गिरण्याचे मालकास बोध करिताहेत त्याअर्थी त्यांचा कांहीं उपयोग होईल अशी आशा करण्यास जागा आहे. हितकर्त्यांच्या मार्गीं सर्वकाळ मागणें व अडचणी आहेतच. वांझेला पुत्र होत नसेल तर तो व्हावा ह्मणून तिच्या हितेच्छूचें देवाजवळ मागणें असतें. बरें, ईश्वरकृपेनें पुत्र झाला तर तो आरोग्य असावा ह्मणून मागणें व काळजी आहेच. बरें निरोगी झाला तर पुढें भाग्यशाली व दीर्घायु व्हावा ह्मणून मागणें आहेच. तशीच तऱ्हा देशहितेच्छूची आहे. पहा, देशांत गिरण्या व्हाव्या ह्मणून मागणें मागितलें व ईश्वर कृपेनें त्या झाल्या; आतां त्यांत कापड भरड निघतें व त्याचा खप कमी होतो ह्मणून पुन्हा देवाजवळ मागणें आलें कीं चांगल्या बारीक कापडाच्या गिरण्या घालण्याविषयीं त्यांच्या मालकास बुद्धि द्यावी. व त्याप्रमाणें त्यानीं केल्यास पुढेंही त्यांच्या कामांत त्यांस यश यावें व त्यांपासून देशाचा फायदा व्हावा यासाठींही देवाजवळ मागणें आहे. अस्तु. देव परम दयाळु आहे व त्यानें आमच्या गरीब व गांजलेल्या हिंदुस्थान देशावर आतां कृपा करून त्यास भाग्यशाली करावे ह्मणून आह्मी वारंवार मागणें मागितलें असतां व त्याच्या इच्छेनुरूप वर्तलों असतां केव्हां ना केव्हां तो आपल्या गरजा पुरवील यांत संशय नाहीं. पण आह्मी वहकून मात्र नये.

आतां गेल्या आठवड्यांत गोळाबिरजेनें जें गिरण्यांचें वर्णन केलें त्याची विशेष माहिती ह्मणजे प्रत्येक कारखानेवाले कोण, त्यांचें भांडवल किती, त्यांचे कारखान्यांत चात्या किती व माग किती चालतात त्याविषयीं समजलें आहे तें असें:—

मुंबई शहरांत व आसपास चालू असलेल्या गिरण्या.

| नावे. | भांडवल रुपये | चात्यांची संख्या. | माग |
|---|---|---|---|
| बांबे मिल्ल | ५५००००० | २९००० | ० |
| अलायन्स मिल्ल | १२५०००० | २०८०० | ० |
| बांबे रायल कंपनी | १५००००० | ३५०८४ | ७४८ |
| माणकजी पेटिटसमिल्ल | २५००००० | ६०००० | ८४८ |
| ओरियंटल कंपनी | २५००००० | ५०२१४ | ९२० |
| बांबे युनायटेड कंपनी | ९००००० | २१००० | ३५१ |
| ग्रेट इस्टर्न कंपनी | १५००००० | ३०६६४ | ६०८ |
| आलेक्झांडरा कंपनी | ९००००० | १५६३२ | ९०० |
| आल्बर्ट कंपनी | ८००००० | १८८०० | ० |
| व्हिक्टोरिया मिल्ल | २७५००० | ९६०० | ० |
| मुरारजी गोकुळदास मिल | १०००००० | २६००० | २०८ |
| जीवराज बाळू मिल्ल | ७५०००० | २३३०० | .... |
| सुंदरदास कंपनी | १०००००० | २०६३२ | .... |
| धर्मसीमिल (कुरला) | ५०००००० | ७५००० | १००० |
| | २०४२५००० | ४३५७२६ | ४८८३ |

बाहेर गावीं चालू असणाऱ्या गिरण्या

| | | | |
|---|---|---|---|
| ज्याफर अली कंपनी ( सुरत ) | ६००००० | १०४६४ | ९० |
| ब्रोच मिल्ल [भडोच] | ३६०००० | १७००० | .... |
| अमदाबाद मिल | ३००००० | १३१०० | .... |
| बेचरदास मिल | ४००००० | १३००० | .... |
| | १६६०००० | ५३५६४ | ९० |

चालू गिरण्यांची वृध्दी

| | नवीन फंड | चात्या | माग |
|---|---|---|---|
| अलायन्स | १० लक्ष | ५ हजार | .... |
| बांबे रायल कंपनी | १ लक्ष ७५ हजार | ० | .... |
| ओरियंटल कंपनी | ५ लक्ष | १० हजार | .... |
| आलेक्झांडरा मिल | २ लक्ष ७५ हजार | १० हजार | १५० |
| मुरारजी गोकुळदास | १ लक्ष | १० हजार | .... |
| व्हिक्टोरिया मिल | १ लक्ष | ५ हजार | .... |
| जीवराज बाळूकंपनी | २ लक्ष पन्नास हजार | .... | २॥ शें |
| धर्मसीमिल | ५ लक्ष | २५ हजार | .... |
| | २२ लक्ष | ७५ हजार | ४ शें |

चालू करण्यास बहुतकरून तयार झालेल्या नवीन गिरण्या.

| | | | |
|---|---|---|---|
| दि हिंदुस्थानी मिल्ल | १० लक्ष | २५ हजार | .... |
| मुकादम शामसमिल्ल | ६ लक्ष | २० हजार | .... |
| कुलाबामिल्स | ९ लक्ष | ३५ हजार | ३ शें |
| गुलामबाबास मिल [सुरत] | ६ लक्ष | २० हजार | .... |
| ग्रीव्हस मिल्ल | २ लक्ष | ७॥ हजार | .... |
| भावनगर कंपनी | १६ लक्ष | .... | .... |
| | ४९ लक्ष | १ लक्ष ७ हजार | ८शें .... |

नवीन स्थापल्या जाणाऱ्या गिरण्या ( मुंबईत व दुसरे ठिकाणीं. )

| नावे | भांडवल | स्थापन करणारे |
|---|---|---|
| एल्फिन्स्टन कंपनी | ८ लक्ष | एच एन स्वाक्लायवाला |
| न्याशनल ,, | ६ लक्ष | जहांगिर हामर्सजी |
| सासून ,, | १५ लक्ष | मेसर्स सासून |
| कुलाबस्यांड कंपनीस मिल्ल | १० लक्ष | ‟रिमिंगटन आणि कं. |
| खेतो मेकंशी ,, | १० लक्ष | खेतो मेकंशी |
| आर्देसरवाडियास ,, | ८ लक्ष | आर्देसर वाडिया |
| माझेगाव कं ,, | १० लक्ष | डो पुंजाभाई |
| प्रिन्स आवबेंतलसक ,, | ७५ लक्ष | जी पंडयसी कं |
| फियरल्यांड बरील मिल्ल | ५५ लक्ष | जी पुंजाभायी |
| भगुभागस मिल्ल ,, | ६२ लक्ष ५ हजार | मोतीदास भगुभायी |
| जलगांव ,, | ६३ लक्ष ५ हजार | सुंदरदास मुळजी |
| सोलापूर ,, | ५ लक्ष | मुरारजी गोकुळदास |
| उमरावती ,, | १० लक्ष | कावसजी जे. जसवाला |
| नागपूर ,, | ९ लक्ष | नसरवानजी तात्या |
| नागपूर नंबर २ ,, | ७ लक्ष | ( नांव माहीत नाहीं ) |
| मद्रास कं ,, | ३७ लक्ष ५ हजार | दयाळ रतनसी |
| मद्रास यु. कं ,, | ५५ लक्ष | सुंदरदास मूळजी |
| | १५०२५००० | |

# उमरावतीचीम्युनिसिपाल कमीटी.

या कमीटीचें उत्पन्न सार्‍या वऱ्हाडांत पहिल्या प्रतीचें आहे. व हें शहर मोठें आणि येथें बंदोबस्त चांगला रहावा याजकरितां दरमहा दोन शें रुपये पगाराचा एक सेक्रेटरीही नेमलेला आहे. असें असतां तेथील शहरदुरुस्तीच्या कामीं वारंवार बोभाट ऐकूं येतात हें सेक्रेटरीचें काम करणारे मि. कालिन साहेब यांस दूषण आहे; परंतु ते पडले साहेब व बडे पगारदार ह्मणून नेटिवासारखी तादृश रीति बाळगण्याचें [illegible] कारण नाहीं असें ते कदाचित समजत असतील; पण ते साहेब केवळ साहेबलोकांचे चाकर नव्हेत, उमरावतीच्या सार्‍या कर देणाऱ्या लोकांचे चाकर आहेत हें त्यांणीं चांगलें लक्षांत ठेवावें. व कमिटीचीं कामें विन बोभाट करावीं. आजचे काळाला दोन शें रुपये पगार आणि तोही म्युनिसिपालिटी सारख्या कारखान्यांतून मिळणें ह्मणजे सामान्य गोष्ट नाहीं. इतर ठिकाणीं सेक्रेटरीचीं कामें कित्येक गृहस्थांनीं आनररी पत्करूनही फार चांगलीं केलीं आहेत आणि पगारदार नोकराच्या कामांत बोभाटा असावा ही गोष्ट वाजवी नाहीं. गेल्या आठवड्याच्या प्रमोदसिंधूंत लिहिलें आहे कीं, 'म्युनिसिपल कमिटीस आह्मी अनेकवार सूचना केल्या पण ती जागृत होत नाहीं. वाः! केवढी जबरदस्त झोंपही! शहरांत रस्ते दुरुस्त नाहींत, चोहोकडे मुरूम पसरला नाहीं तेणेंकरून पावसाळ्यांत लोकांस फार यातना भोगाव्या लागतात व त्याकडे म्युनिसिपलकमिटी लक्ष देत नाहीं' असें आमचे बंधू ह्मणतात. या गोष्टीचा विचार कमिटीनें जरूर केला पाहिजे. व बरसातींत लोकांस जो ताप भोगावा लागतो तो दूर केला पाहिजे. सध्यां आह्मी इतकेंच लिहून थांबतों.

## वऱ्हाड.

विनंती—आमचे टाइप फार जुने होऊन गेल्यामुळें आह्मी नवे आणविण्याची तजवीज केली, व त्याप्रमाणें ते कालरोजीं आमचे हातींही आले. पण त्याबरोबरचें सामान हातीं येण्यास एक दोन दिवसांचा अवकाश आहे. व जुने टाइप काढून टाकून नव्याची व्यवस्था लावण्यास ४।५ दिवस पाहिजेत याजकरितां पुढच्या रविवारचें पत्र निघण्यास हरकत होईल त्याविषयीं वर्गणीदाराकडून माफी असावी.

—000—

या आठवड्यांत पाऊस ह्मणण्यासारखा पडला नाहीं. काल दोनप्रहरीं भीमपास तरी हवेत गारठा बराच आहे.

—000—

कारंजाचे वकील रा. बाळकृष्ण श्रीधर घुडे यांची सनद रेसिडेंट साहेबांनीं रद्द केली. तिचें कारण असें ऐकण्यांत आलें आहे कीं वकील मजकुरानीं दरखास्तीचे कागदांत कांहीं खाडाखोडी केली होती व ... ज्या लिलावाच्या व्यापारांतही त्यांचा कांहीं हात होता व एकंदरीत त्यांचें गैरवर्तन दिसून आलें यावरून ते वकिलीच्या कामास नालायक आहेत असें रेसिडेंट साहेबानीं ठरविलें. ही गोष्ट सर्व वकिलांनीं ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. दुर्वर्तनानें कधीं कधीं फायदा होत असेल परंतु तें परिणामीं सुखकर नाहीं. कांहीं वकील पूर्व पुण्याईनें ह्मणा किंवा दुसऱ्या कशानें ह्मणा खरोखरीच भाग्यशाली आहेत कारण त्यांच्या विद्वत्तेवर नजर दिली तर कित्येकांस पंध्ररा वीस रुपयांची कारकुनीही मिळणार नाहीं पण ते समदेच्या सौभाग्यावर शेकडो रुपये मिळवितात, आतां ते त्यांस मिळू नयेत असें आह्मी ह्मणत नाहीं पण त्यांनीं अधिक हाव सोडून नीतीनें वागावें, व साक्षराच्या वर्गांत जाण्यास काळजी व श्रम घ्यावेत तद्विपरीत राहू नये. व सर्व प्रसंगीं आपली योग्यता लक्षांत ठेवावी अशी आमची तशा प्रतीच्या लोकांस शिफारस आहे.

—000—

बुलढाणें जिल्ह्यांत मलकापूर तालुक्यांत एक खून झाला होता त्याचे आरोपी पकडण्याचे कामांत तिकडील पोलिस इन्स्पेक्टर मि. करीम खान व चीफ कानस्टेबल मि. शिवरामसिंग यांनीं एक मुसलमान देशमुखाच्या मदतीनें च्यार मनुष्य वहिमी धरिले व त्यांकडून खुनाचा गुन्हा कबूल करविला पुढें त्यांपैकीं एक आरोपितानें आत्मघात करून घेतला व बाकी राहिलेल्या तिघांची मॅजिस्ट्रेट मि० दस्तुर बहिमनजी साहेब यांजपुढें चौकशी होऊन त्यांनीं त्यांस सेशन कमिटही केलें. परंतु त्यांस त्यांत संशय आल्यावरून त्यांनीं पोलिसाच्या मदतीशिवाय स्वतंत्रतेनें त्या गावीं जाऊन बारीक चौकशी केली व एक आरोपी पकडला आणि त्याची चौकशी करून त्यास सेशन कमिट केलें. मयत मनुष्याचे भावाचाही त्यावर शक होता व तो मनुष्य आपण एकट्यानें खून केला असें सेशन जजापुढेंही कबूल झाल्यावरून त्यास फाशीची शिक्षा ठरली आहे. रेसिडेंट साहेबाची मंजूरात आल्यावर अमलांत येईल. पण बाकीच्या तीन मनुष्यांस पोलिसानें खुनी ह्मणून जें पकडलें ते खून न करितां आह्मी केला असें ह्मणून विनाकारण कंटाळले होत्साते पोलिसापुढें येऊन आपल्या माना पुढें करते झाले असें थोडेंच घडलें असेल. तेव्हां त्यावर जबरदस्त्या रट्यांची अतिशय गर्दी उडाली असेल असें वाचकांस सहज दिसून येईल. एक मनुष्यानें तर त्या प्रसंगीं जीवही दिला आहे. त्यावरून या गोष्टीचे भयंकर स्वरूपाची चांगली कल्पना होते. अस्तु. त्या तीन मनुष्यांच्या आयुष्याच्या दोऱ्या तुटल्या न हत्या ह्मणून बहिमनजी साहेबांचे मनास प्रेरणा होऊन ते जास्ती तपासास लागले, त्यांत खरें बाहेर निघालें, त्यांस यश आलें, व तीन निरपराधी जीव बचावले. व पोलिसाचीं भयंकर कृत्यें उघडीस येण्याच्या रंगास आलीं ही गोष्ट बहिमनजी साहेबास मोठी भूषणाई आहे यांत संशय नाहीं. त्यांनीं मागें अकोले जिल्ह्यांतही पोलिसास अशा निरपराध्यावर आग पाखडून आपली पोळी पिकविण्याच्या कामीं पकडलें आहे. अस्तु. पोलिसावरील या मुकदम्याची बुलढाण्यास डिपुटी कमिशनर साहेबापुढें उद्यापासून चौकशी होणार आहे ती झाली ह्मणजे आह्मी आपले वाचकांस समग्र कळवू.

—000—

रा. रा. गोविंदराज अण्णा येथील तहशिलदार यांच्या बदलीची वार्ता निराधार आहे असें आमच्या उमरावतीकर बंधूनेंही गेल्या सोमवारीं लिहिलें आहे. आतां आह्मास अशा प्रकारच्या सांग्या बातम्या समजण्यास आधार काय तो उमरावतीचाच आहे. कारण रेविन्यू कमिशनर ह्मणजे अशा बातम्यांचें आगर ते तेथें आहे. अकोल्यास या घडामोडीचा आतां कांहीं संबंध नाहीं.

—000—

आजचे अंकांत पत्रव्यवहार सदरालालीं " दुःख पाहणारा क्ष" या सहीचें पत्र छापलें आहे तें मेहेरबान कमिशनर साहेबानीं विचार करण्यासारखें आहे. खरेंच गति दरिद्री लोकांस केवळ उदरभरणाकरितां हा जंगली लहानसान, आते अल्प किमतीच्या वस्तू त्या त्यांनीं फुकट घेऊं द्याव्या, त्याकरितां त्यांवर कर बसवू नये. अशा करानें गरिबास ताप होतो व सरकाराचाही त्यांत मोठासा फायदा होत नाहीं. सबब अशा गोष्टी वर्जाव्या तें चांगलें.

—000—

बाळापूर —(तारीख २३ जुलै सन) १८७४ —येथील तहशिलदार कचेरीतील माजी पोतदार रा. झनुलाल यांनीं स्वेच्छेनें राजिनामा दिल्यावरून रेसिडेंट साहेबांनीं सरकारानें ६० रुपये त्यांस इनाम दिले. सदहू गृहस्थानें नोकरी १८ वर्षें केली.

—000—

अकोल्याच्या म्युनिसिपाल सेक्रेटरीची जागा मि. पांडुरंग दामोदर दवणकर यांनीं सोडण्याविषयींची आपली इच्छा कळविली आहे. यांणीं सेक्रेटरीचें काम मेहेनत घेऊन चांगलें केलें सबब असा सेक्रेटरी कमिटीस यापुढें फुकटाबारी मिळणें दुर्लभ आहे. हे पदरच्या खर्चानें वाहनें मिळवून कमिटीचे कामीं खपत व त्याकरितां एक वेळ त्यांस दहा रुपये अलावन्स द्यावा असा कमिटीनें विचार केला होता पण त्यांणीं तो घेण्याचें कबूल केलें नाहीं. ही त्यांच्या थोरपणाची गोष्ट आहे. आतां कोण सेक्रेटरी होतात पहावें. सेक्रेटरीचें काम फार जिकीरीचें व श्रमाचें आहे सबब आह्मास असें वाटतें कीं, फुकट कोणी कबूल न करिता अलावन्स घेऊनही कबूल न करील तर बाहेरून एकादा ओव्हरसियरच्या कामाचाही माहितगार असा चाळीसपासून पन्नास रुपयेपर्यंत पगाराचा एक स्वतंत्र सेक्रेटरी आणवावा. ह्मणजे व्यवस्था चांगली राहील. व इतका खर्च नवाच करावा लागेल असें नाहीं. इस्टाब्लिशमेंटांतही कांहीं नवे जुने केले असतां त्याच्या निम्याशिम्या पगाराची भरती होईल असें आह्मांस वाटतें.

### मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—गुलाबचंद मिगानी मारवाडी दुकान तेल्हारे यास नोटिस देणार सेवाराम जमनादास साहू दुकान तेल्हारे तुह्मास कळावें कीं रुपये तुमचेकडे खातें बाकी येणें असून तुह्मी देतों देतों ह्मणतां परंतु देत नाहीं त्याजवरून तुह्मास नोटिस देण्यात येते कीं सदरहू नोटिस दिल्याचे तारखेपासून पंधरा दिवसाचे आंत रुपये व्याजासुध्धां चुकते करून देणें जर असें न केलें तर रीतिप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारीख १२ माहे जुलई सन १८७४ इसवी.

(सही) सेवाराम जमनादास साहू
दुकान तेल्हारे दस्तुर अनंदरा
व अंबादास गुमास्ते.

नोटिस—लाझारस साहेब ओव्हरसियर इंजिनीयरखाते मुकाम अकोलें यास नोटिस देणार गणेशदास भिवराज मारवाडी दुकान शेगाव तालुके बाळापूर याजकडून देण्यांत येते कीं तुह्मी आह्मापासून वेळोवेळ कर्जाऊ रकमा घेतल्या त्याजबद्दल गेल्या मे महिन्यामध्यें खामगाव मुकामीं तुह्मी येऊन हिशेब रुजू करून ६९२ रुपये १० आणे ६ पै बाकी काढून त्याजबद्दल वहीवर स्टांप लाऊन सही करून दिली तेव्हां असा तोंडी करार केला कीं आठपंधरा दिवसांत व्याजासुध्धां रुपये देतों ह्मणून कबूल केलें परंतु त्याप्रमाणें दिलेत नाहीं. पाचच्यार वेळां तुह्मास मागणें सक्तीनें केलें असतां देऊं दिलाऊ करीत गेले याजकरितां हल्लीं मुद्दाम तुह्मास नोटिस देण्यात आली आहे तरी आठ दिवसांत तुह्मी आमचे दुकानीं येऊन सदरील बाकीची व्याजासुध्धां अदाई करावी. असे मुदतींत तुमचेकडून न होईल तर तुमचेवर दिवाणींत फिर्याद करून सर्व खर्चासुध्धां रकम घेण्यांत येईल कळावें तारीख २१ माहे जुलई सन १८७४ इसवी.

(सही) गणेशदास भिवराज मारवाडी
दस्तुर मगळचंद गुमास्ते.

## वर्तमानसार

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं हैद्राबाद स्टेट रेलवेवरून १० वे तारखेस गाडी चालऊन पाहिली. सरास काम बरसात अखेर पर्यंत चालणार नाहीं असें ह्मणतात प्रथम दिवशीच्या समारंभास दिवाण साहेब व सर सालरजंग व दुसरे कित्येक सरदार गेले होते. कागना नदीचे पुलावरून नानापुरापर्यंत गाडी आणिली होती.

सर बार्टल फ्रियर साहेब यांस लंडनचे फ्रीडम आफ धि सिटी हा किताब मिळाला.

मुंबईच्या मुसलमानांच्या दंग्याचे बाबतींत विलायत सरकारचा ठराव झाला कीं—

पोलिस कमिशनरांनीं दंगा न होऊं देण्याचा योग्य बंदोबस्त केला नाहीं. रागांत पारशी लोकांस त्यांनीं शब्द बोलले हें चांगलें नाहीं. तथापि दंग्याचा शेवट करण्यांत त्यांनीं फार शौर्य दाखविलें. सर फिलिप उडहाऊस यांस एकंदरीत दोष देण्यासारखें कांहीं नाहीं तरी त्यांनीं लष्करी लोक लवकर बोलाविले नाहींत व पारशी लोकांबरोबर योग्य भाषण केलें नाहीं ह्या गोष्टीबद्दल ते दोषास पात्र आहेत. पारशी लोक राजनिष्ठ सहनशील आहेत त्यांनीं तसेच नीट वागून सूड उगाविण्यासाठीं दंगा करू नये.

सर होप ग्रांट साहेब हिंदुस्थानचे कमा

दर इनचीफ होणार अशी विलायतेंत बातमी आहे.

पतियाळ्याच्या राजाचा एक मुलगा मरण पावला.

एके ठिकाणीं साहेब लोक चेंडू खेळत असत, व तो फार लांब गेला म्हणजे तो आणून देण्याबद्दल ८= मजुरास देत असत. या ठिकाणीं एका गृहस्थाचा कुत्रा असे तो मजुरापेक्षां लवकर चेंडू आणून देऊं लागला. पुढें कुत्र्याचे मालकानें दर एक खेपेस २ आणेप्रमाणें चेंडु आणण्याबद्दल बिल केलें ते चेंडू खेळणाऱ्या क्लबच्या सेक्रेटरीनें नाकारल्यावरून मालकानें कोर्टांत फिर्याद केली व कोर्टांत खर्चासुद्धां पैसा द्यावा असें ठरलें. कुत्र्यास फिर्यादी म्हणून कोर्टांत नेलें होतें.

अमेरिकेंतील फिलाडेल्फिया येथें डाक्टर मार्श आपडाइक व त्याचा मुलगा यांणीं असा निश्चय केला होता कीं, बापलेकांपैकीं जो अगोदर मरेल, त्यास जिवंत राहील त्यानें, पुरण्याबद्दल जाळावें. मुलगा अगोदर मेल्यामुळें, त्याच्या प्रेतास बापास जाळावें लागलें. आमच्या इकडे लाकडाची चिता रचून जाळतात त्याप्रमाणें न जाळल्यामुळें खर्च फार आला. लोखंडाच्या पेटींत प्रेत बंद करून पेटी भट्टींत घातली. दहनानंतर पेटी उघडून पहातां तींत थोडी पांढरी रक्षा मात्र सांपडली. ही रक्षा बापानें एका सुंदर पेटींत घालून तिजवर मुलाचें नांव कोरून ती आपल्या पुस्तकालयांत ठेवली आहे.

निवाडा व मिनीट यांच्या नकला देण्यास ष्टांप घेऊन खेरीज लिहिणावळ व कागदाचा आकार वगैरे घेण्याची वहिवाट दरएक जिल्ह्यांनीं दरएक कोर्टांत आजपर्यंत चालू आहे परंतु ती वहिवाट कायदेशीर नाहीं असें ठरून सातारचे जिल्हे जडजांनीं नकलांस स्टांप दिले म्हणजे खेरीज कोणताही खर्च पक्षकारावर न पडतां नकला त्यास फुकट मिळत जाव्या म्हणून हुजूर दप्तरास हुकूम दिला.

ने. ओ.

हैदराबाद एथील एक तरुण युरोपियन स्त्री महमदी धर्म स्वीकारून एका मुसलमानाबरोबर तेथून दुसऱ्या ठिकाणीं राहवयास गेली.

कलकत्ता एथील मेडिकल कॉलेजमध्यें यावर्षीं वैद्यशास्त्राचा अभ्यास करण्याकरितां २९४ नवीन तरुण उमेदवार घेतले आहेत. हल्लीं या वैद्यपाठशाळेंत एकंदर १,४४१ विद्यार्थी आहेत.

अर्काट एथील हिंदु विद्यार्थ्यानें म्याट्रिक्युलेशनची परीक्षा मद्रास युनिवर्सिटीच्या संबंधानें किंबकवर्षें पसार झाली नाहीं म्हणून विहिरींत जीव दिला.

कोढावर रामबाण औषध— झांशी येथील एका रहिवाशानें वरील रोगावर रामबाण औषध शोधून काढलें आहे. औषध कशाचें करतो हें तो सांगत नाहीं. या औषधानें लोक बरेच बरे झाले. पुष्कळ गृहस्थांचे समोर पुष्कळ दिवसांचे कोढ असलेल्या मनुष्यावर औषधोपचार केला. तेव्हां त्याचे हात, पाय, व सांधे यांस क्षतें पडलीं आहेत असें दिसलें. पुढें पंधरा दिवसांनीं तो रोगनिमेवर बरा झाला. पुष्कळ रोगी या वांछित रोगापासून बरे केले; त्यांत एकास सहा वर्षांचा रोग होता. तोही बरा झाला. औषध पुष्कळ लोक घेत आहेत व ते दिवसांदिवस बरे होत चालले आहेत.

आह्मांस असें समजलें आहे कीं, मि० गोविंद विठ्ठल करकरे बी. ए. पाहिले नेटिव बारिस्टर यांस सुरतेस हेड मास्तर नेमिलें. पळस कोंकणांतून देशावर गेला तरी त्यास पानें तीनच!

मुंबईच्या स्वदेशीय मालाचा व्यापार करणाऱ्या मंडळीच्या दुकानावरून कोणी दगलबाजानें मी विनायकराव वासुदेव यांचा मेहुणा आहे व सोहळ्याच्या अहेराकरितां कांहीं कापड घेणें आहे, असें सांगून सुमारें ९० ९०० चें कापड पसंत करून दुकानावरील दुसरा कारकून बरोबर घेऊन पैका घालून या बरोबर लावून देतों असें सांगून कापड व कारकून यांस गाडींत घालून निघून गेला; पुढें त्या कारकुनास परळाकडे नेऊन मार दिला व आपण कापडासहित नाहींसा झाला. कारकून परत आल्यावर पोलिसास वरदी दिल्यावरून पोलिसांत तो दगलबाज पकडण्याची तजवीज चालली आहे. बगीत्याला पकडला आहे.

एक गृहस्थ असें कळवितो कीं, मुंबईतील गिरण्यांमध्यें जें कापड व सूत निघत असतें तें सगळें विकत नाहीं. मुंबई बाजारांत हल्लीं सुताचे गट्ठे सहा हजार व कापडाचे गट्ठे आठ हजार शिल्लक आहेत. मालक ते कमी किंमतीस विकीत नाहींत. तरनवीन २० गिरण्या होणार आहेत त्यांच्या मालकांनीं वरील स्थितीकडे लक्ष द्यावें असें तो सुचवितो.

शिल्लक माल विलायतेहून आलेला असेल; जें कापड व सूत येथील गिरण्यांतून निघतें तें सर्व विकतें ते शिल्लक रहात नाहीं असें आमचें ऐकण्यांत आहे.

सु. प.

---

## सदसद्विवेक.

(अकोल्याचे सभेंत वाचलेला)

निबंध

मनुष्याला ज्या कित्येक मनोवृत्ति आहेत त्यांपैकीं सदसद्विवेक ही एक मनोवृत्ति आहे. व हिच्या हुकुमाप्रमाणें मनुष्य सर्वकाळ वागेल तर त्याचे इहलोकींचें व परलोकींचेंही कर्तव्यकर्म त्यानें बजाविलें असें होईल. परंतु सर्वत्र तसें घडत नाहीं ही मोठी नाइलाजाची गोष्ट आहे.

सदसद्विवेक या शब्दाचा अर्थ असा आहे कीं, सत् आणि असत् म्हणजे चांगलें वाईट किंवा योग्य अयोग्य, त्याचें विवेचन म्हणजे निवडणूक होय व ती निवडणूक करण्याची ज्या मनोवृत्तीला शक्ति आहे तिला सदसद्विवेक असें म्हणतात.

मनुष्य प्राणी इतर सर्व प्राण्यांहून श्रेष्ठ आहे तथापि अपूर्ण आहे. कारण चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें त्याला कळतें तरी कित्येक प्रसंगीं वाइटापासून तो पराङ्मुख न होतां त्यास अनुसरतो. तसेंच चांगलें त्याला कळतें तरी तो सर्वकाळ तिकडे धाव न घेतां कधीं कधीं उदासीन रहातो. आतां अशी स्थिति कां असावी हें आपणास चांगलें कळत नाहीं.

मनःपूतंसमाचरेत् असें नीतिवाक्य आहे तें फार उत्तम आहे. तें असें म्हणतें कीं, मनुष्यानीं आपल्या मनाला म्हणजे सदसद्विवेकाला जें पूत म्हणजे पवित्र वाटेल त्याप्रमाणें सर्व गोष्टींत वर्तावें म्हणजे त्याला कसलें भय नाहीं. अशा उत्तम बोधाचाही बहुत लोक अंधेर करितात एवढेंच नव्हे, हें वाक्य हल्लीं उलट्या अर्थाचें झालें आहे. म्हणजे कोणी असें म्हणतात कीं, अमका मनुष्य अगदीं बहकून गेला आहे. त्यानें ताळ सोडला, कोणाचें ऐकत नाहीं कांहीं नाहीं. मनःपूत वागतो. येथें मनःपूत वागणें म्हणजे बिघडणें असा अर्थ करितात.

असें दिसतें कीं, मनुष्याला बाळपणापासून जसें वळण लागतें तसा तो बनतो. म्हणजे तो चांगल्या मनुष्यांच्या मेळांत असला, उत्तम विद्या शिकला, नीतीचा ठसा त्याच्या ठायीं चांगला उपतिष्ठला असला, तर त्याचें मन म्हणजे सदसद्विवेकही त्याला सर्वकाळ चांगल्याकडेसच प्रवृत्त करितो. म्हणजे तो वाइटाकडे वळण्याचा संभव क्वचित असतो. यासाठींच मुलांना सुशिक्षण अवश्य आहे. कित्येक लोक याच्या उलट असें म्हणतात कीं, मांग रामोशाचा मुलगा चोरी करणें दरोडे घालणें, वाटा मारणें, खून करणें, खोटें बोलणें व दुसरीं बहुत पापकर्में करणें यांस वाढला असला व सुसंगतीचा आणि सुनीतीचा वाराही त्याला लागला नसला तर त्याचें मन म्हणजे सदसद्विवेक त्याला तीं कर्में करूं नको अशी आज्ञा देणार नाहीं उलटें उत्तेजन देईल.

तेव्हां या सदसद्विवेकाविषयीं काय समजावें व त्यापासून काय गुण घ्यावा? असें कोणा कोणास वाटतें. तसेंच रामोशाच्या मुलाला त्याचा सदसद्विवेक दरोडे घाल म्हणतो, न घातल्यापासून तुला कांहीं मिळणार नाहीं, तू उपाशी मरशील, तुझा तोटा होईल असें सांगतो व तो मुलगा त्या विवेकाच्या आज्ञे प्रमाणें अकृत्रिम वर्ततो तर तो निर्दोष कां नसावा? पण तसें घडत नाहीं, कारण राजनियमाप्रमाणें त्यानें चोरी केली कीं तो दोषी होतोच व त्यास कैदची वगैरे शिक्षा होतेच. मग सदसद्विवेकानुरूप वर्तण्याची मातबरी काय राहिली? कांहीं नाहीं असा बहुतांचा समज आहे परंतु थोडा अधिक विचार केला तर आपल्याला स्पष्ट समजेल कीं तो दोष सदसद्विवेकाकडे मुळींच नाहीं. कारण मनुष्यमात्रामध्यें सदसद्विवेक जागृत होण्याला कांहीं ज्ञान यावें लागतें व तें त्याला येईपर्यंत त्याजमध्यें सदसद्विवेकाची जागृती नसते. कां तर त्या शब्दाचा अर्थ आहे तोच स्पष्ट वदतो कीं चांगलें कोणतें व वाईट कोणतें हें सांगण्याचें काम सदसद्विवेकाचें आहे; तर रामोशाचे मुलाला चोरी म्हणजे काय व ती करूं नये म्हणजे काय याचें जर ज्ञान नाहीं तर त्याचा दोष त्या मनोवृत्तीकडे काय आहे? त्याजमध्ये ती मनोवृत्तीच जागृत झाली नाहीं. अज्ञान मूल विस्तव हातांत घेतें व हात पोळला म्हणजे रडूं लागतें याचें कारण काय? याला ज्ञान नाहीं व त्यामुळें सदसद्विवेकाची त्या कालीं त्याजमध्यें जागृती नाहीं. ती कालांतरानें व ज्ञानसंवर्धनें येतें. म्हणून आपण असें म्हणूं कीं त्या रामोशाच्या त्या कृत्याचा दोष सदसद्विवेकाकडे मुळींच नाहीं. कारण त्याचे ठायीं सदसद्विवेक उपतिष्ठला नाहीं. त्या मुलास लागलेल्या दुष्ट वळणाकडे तो सर्व दोष आहे. वाईट वळणानें अंतःकरणही दूषित होतें यांत संशय नाहीं. व तेंच अंतःकरण ज्ञानाच्या प्रकाशानें शुद्ध होतें. वाल्या कोळी यानें सहस्रावधि हत्या केल्या व तेणेंकरून दोषांच्या राशी शिरावर घेतल्या पण शेवटीं नारद सद्गुरूपासून ज्ञान झालें तेव्हां पश्चात्तापी होऊन शुद्धी पावला व दोषमुक्त झाला हाच दृष्टांत दरोडे खोर मुलाला लागू करून त्याला त्याच्या त्या कृत्याबद्दल एकवार न्यायाधिशाकडून शासन मिळालें म्हणजे जर तो शुद्धीवर येतो तर ते दुष्ट वळण घालविण्यास तोच याला ज्ञानाचा प्रकाश झाला असें समजावयाचें. मग पुढें दुसरे प्रसंगीं तो दरोड्याविषयीं मनांत आणील तर त्याचा सदसद्विवेक त्यास लागलीच सांगेल कीं बाबा असें करूं नको. तेणेंकरून कुल्यावर फटके बसतील, कैदेंत जावें लागेल, सक्त मजुरी करावी लागेल व तें त्यानें ऐकिलें तर त्याचा शिक्षेपासून बचाव होईल; नाहीं पेक्षां अधिक ज्ञानानें विवेकाबरही युक्ती लढविली म्हणजे असें मनांत आणिलें कीं छीः विवेक काय सांगतो. एकवेळा फसलों म्हणून दरवेळीं आपण फसतों कीं काय? जरा जपून वागू व युक्तीनें, सावधगिरीनें आणि बेतावातानें काम करूं म्हणजे आपण कोणाच्या हातीं लागणार नाहीं व आपल्यास अल्प श्रमानें मोठे डबोले मिळेल. अशी कल्पना करून तो त्या कामास प्रवृत्त होतो व तें काम करून पुन्हा पेचांत पडतो. हें सदसद्विवेका विरुद्ध वागल्याचें त्यास फळ मिळतें.

सदसद्विवेका विषयीं अधिक विचार केला असतां असें दिसतें कीं मनुष्यास तो प्राप्त झाल्यावर अमुक काम कर व अमुक करूं नको असें तो सांगत असतो. व त्याचें सांगणें सर्व चांगलेंच असतें पण त्याप्रमाणें वर्तण्यास आपण अवकाश केला व दुसरे विचार काढिले तर इतर मनोवृत्ति त्या विवेकाला जिंकू पाहतात व कधीं कधीं त्याच्या आज्ञेचा पाडाव करितात यावरून इतकें दिसतें कीं विवेक ही अति उत्तम शक्ती मनुष्यामध्यें आहे पण ती दुर्बळ आहे आपला हुकूम त्या मनुष्याकडून अमलांत आणविण्याचें सामर्थ्य तिजमध्यें तादृश आहे असें दिसत नाहीं. राजाचे कायद्याप्रमाणें आपण न वागलो तर राजा आपणास तात्काळ शिक्षा करितो. हें सामर्थ्य सदसद्विवेकामध्यें असतें तर त्याची आज्ञा उल्लंघन करण्यास बहुत लोक भ्याले असते व तेणेंकरून ते शुचिर्भूत होऊन नीतीचे पुतळे व सदासुखी असे बनले असते पण मनुष्यामध्यें सद्वृत्ती बरोबर दुसऱ्या असद्वृत्तीही बहुत आहेत आणि त्या जोर करितात तेव्हां विवेकाला मुके राहावें लागतें. त्यामुळेंच जगांत चांगल्यापेक्षां वाइटाची प्रवृत्ती विशेष होऊन अविवेक, दुःख, शोक, संकटें, अभक्ती, घातपात इत्यादिकांच्या टोचण्या मोठ्या चढवून मनुष्याच्या पाठीस लागतात.

(पुढे चालू.)

---

हें पत्र अकोला येथें खंडेराव बाळाजी फडके यांचे व. स. छा. छा. प्र. केलें.